कथा झरना - प्रस्तावना

गोष्टींचा हा झरा झुळूझुळू वाहत तुमच्याकडे येत आहे. गोष्टींचं हे अनोखं जग, शंभर गोष्टी एकत्रित केलेला हा संच, मुलांपर्यंत पोचवण्याचा हा एक प्रयत्न आहे.

या संचाची वैशिष्ठये:

- मुलांचं जग डोळ्यासमोर ठेवून यातील गोष्टी आणि कोडी अगदी साध्या सोप्या भाषेत लिहिण्यात आली आहेत.
- प्रत्येक गोष्ट एका स्वतंत्र कार्डावर छापली आहे, म्हणजे मुलांना हवी ती गोष्ट स्वत: शोधून वाचण्याचा आनंद मिळेल, आणि लहान लहान गटांत त्यांना त्यावर चर्चाही करता येईल.
- प्रत्येक गोष्टीत रंगीत चित्रे आहेत आणि मुलांसाठी गोष्ट मुद्दाम मोठ्या अक्षरात छापली आहे.
- प्रत्येक वर्गातील मुलांसाठी माफक किंमतीत दर्जेदार वाचन साहित्य उपलब्ध करून देण्याचा हा एक लहानसा प्रयत्न आहे.
- भारतात गोष्टींचा मोठाच खजिना आहे आणि अनेक वर्षांपासून गोष्टी सांगण्याचे असंख्य प्रकार आपल्याकडे प्रचलित आहेत. मुलांना आपल्याकडच्या या परंपरेची माहिती व्हावी या उद्देशाने हा संच तयार करण्यात आला आहे.
- यात विनोदी गोष्टी, पुराणातील गोष्टी तसेच लोककथा अशा सर्व प्रकारच्या गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे.

कथा झरना कशासाठी?

- ग्रामीण भागातील बहुतांश मुले ही शिक्षणाच्या प्रवाहातील पहिल्याच पिढीतील मुले आहेत. त्यांना शाळेत आणि घरी देखील पाठ्यपुस्तकांखेरीज इतर कोणतीच पुस्तके मिळत नाहीत.
- मुलांना अभ्यासाव्यतिरिक्त अनेक प्रकारची पुस्तके वाचायला मिळाली तर त्यातूनच त्यांची शैक्षणिक क्षमता वाढते. गोष्टी वाचून केवळ भाषाज्ञान वाढते इतकेच नव्हे, तर या गोष्टींमधून त्यांना जगाकडे पाहण्याची एक दृष्टी मिळते.
- संदर्भ नसलेली अक्षरे आणि शब्द वाचण्यात मुले रमत नाहीत. जेव्हा शिकणे आणि शिकवणे हे कशाच्या तरी संदर्भात सहजपणे होते, तेव्हा मुलांचे शिकणे आपोआप होते आणि ते त्यांच्या लक्षातही राहते.

- गोष्टी मुलांच्या भावनांना स्पर्श करतात आणि त्यांच्या कल्पनाशक्तीला व अभिव्यक्तीला त्यामुळे चालना मिळते.
- गोष्टी वाचताना मुलांचा त्यात सक्रीय सहभाग असतो. त्यातील व्यक्ती आणि घटनांचा संबंध ते आपल्या जीवनाशी जोडू लागतात. आपल्या स्वत:च्या अनुभवातून ते त्यांचा अर्थ लावू लागतात.
- या संचातील गोष्टी तसेच इतर पुस्तके वाचण्यासाठी प्रत्येक वर्गासाठी एक जागा ठरवून देता येईल. पुस्तके वाचण्याची मुलांना सवय लागली तर त्यातून अभ्यासक्रम शिकण्यास व समजण्यासही मोठीच मदत होऊ शकेल.
- मुलांची विचारशक्ती, आकलन, आणि इतर कौशल्ये विकसित करण्यासाठी शिक्षकांना एक साधन मिळावे हा देखील हा गोष्टींचा संच प्रकाशित करण्यामागील एक उद्देश आहे.

कथा झरनाची टीम

कथा झरना या संचाची निर्मिती श्रीमती पी. सरस्वती, श्रीमती व्हि. विजयकांती, श्रीमती एल. एस. सरस्वती व श्रीमती एस. राजलक्ष्मी या तामिळ भाषेतील चार शिक्षणतज्ज्ञांनी केली. त्यांनी निरनिराळ्या स्रोतांतून हजारो गोष्टी जमवून त्यांचे विश्लेषण, परीक्षण व मूल्यमापन केले. मुलांची मानसिकता लक्षात घेऊन काही गोष्टी नव्याने लिहिल्या. करुणा, मैत्री, त्याग, सत्यप्रियता, कल्पनाशक्ती अशा गुणांचा विशेष विचार करून आणि त्यांना चालना देण्याच्या उद्देशाने गोष्टींची निवड केली. गोष्टींच्या बरोबरच त्यांनी चित्रांकडेही विशेष लक्ष दिले कारण चित्रांमुळे मुलांच्या कल्पनाशक्तीला आणि जिज्ञासेला खतपाणी घातले जाते.

२००३ मध्ये चतनाथ ट्रस्ट, चेन्नई च्या मदतीने 'कथई अरुवि' या नावाने तामिळ भाषेत हा गोष्टींच्या कार्डांचा संग्रह प्रकाशित करण्यात आला. चतनाथ ट्रस्टच्या सातत्याने मिळणा-या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे विशेष आभारी आहोत.

गोष्टींच्या कार्डांचा हा संग्रह मुख्यत: तामिळ माध्यमातून शिक्षण घेणा-या मुलांच्या गरजांचा विचार करून तयार करण्यात आला होता. परंतु भाषा आणि संस्कृतीच्या सीमा पार करून तो देशाच्या कानाकोप-यात लोकप्रिय झाला. अनेक शैक्षणिक संस्थांनीही याचा वापर केला.

हिंदी कथा झरना कार्ड (२००८)

'रूम टु रीड' या दिल्लीतील संस्थेने हिंदी 'कथा झरना' कार्डांच्या प्रकाशनाची मागणी केली आणि प्रकाशनाच्या कामाला तेथपासूनच सुरुवात झाली. अनुवादाची सुरुवात चेन्नईतच झाली. त्यानंतर उत्तरेतील शिक्षणतज्ज्ञांच्या सहयोगाने गोष्टी आणि कोड्यांमध्ये हिंदी भाषेनुरूप बदल करण्यात आले. 'कथा झरना' या नावाने हा संग्रह २००८ मध्ये प्रकाशित झाला.

अनुराधा बजाज, पूनम अरोरा, इंदिरा पंचोली, जस्मिता हेमंत, महबूब निशा (दिल्ली), गीता शर्मा (अहमदाबाद), सी. मणीकंडन, जे. पद्मप्रिया, कनूप्रिया केयाल (चेन्नाई), सुष्मिता बानर्जी, लोहित जोशी, हितेंद्र उपाध्याय (जयपूर), या शिक्षणतज्ज्ञांचे सहकार्य व त्यांच्या बहुमोल सूचनांशिवाय 'कथा झरना' चे प्रकाशन शक्य झाले नसते.
(टंकलेखन- सुनील कुमार)

मुलांच्या विकासासाठी गोष्टींचा उपयोग करण्यासाठी काही सूचना:

(अ) गोष्टी समजून घेणे:

क्रम लावणे- मुलांना गोष्टीतील घटनांचा क्रम लावण्यास सांगावे.

महत्त्वाचे मुद्दे- गोष्ट सांगून झाल्यावर गोष्टीचा मुख्य विषय कोणता होता ते मुलांना विचारावे. त्यांना गोष्टीतील संपूर्ण चित्र नजरेसमोर उभे करण्यास मदत करावी. आपले विचार लिहून काढायला सांगावे.

अंदाज बांधणे- गोष्ट वाचत असताना पुढे काय होईल याबाबत मुलांना अंदाज करायला सांगा.

तुलना- गोष्टीतील पात्रे व घटना यातील समानता व वेगळेपण ओळखायला सांगा.

कल्पना व वास्तव- कल्पना आणि वास्तव यातील अंतर मुलांना समजले आहे की नाही हे त्यांना प्रश्न विचारून जाणून घ्या. उदा. तुम्हाला काय वाटते? ख-या आयुष्यात असे होऊ शकेल का?

गोष्ट सांगा- मुलांना तीच गोष्ट त्यांच्या पद्धतीने सांगायला सांगा. त्यांना त्यांच्या भाषेत आणि शैलीत व्यक्त होऊ द्या.

स्वत:चे मत- मुलांना गोष्टीतील प्रत्येक बाबीबाबत विचार करायला प्रवृत्त करा. कोणते पात्र तुम्हाला आवडले? का आवडले? तुम्ही त्याच्या जागी असतात तर काय केले असतेत? अशा प्रकारचे प्रश्न विचारा. गोष्टीचे तात्पर्य शिक्षकांनी सुरवातीलाच मुलांना सांगू नये. मुलांनाच ते शोधू द्यावे.

(ब) सृजनात्मक अभिव्यक्ती

- एका मुलाने गोष्टीतील एक पात्र बनावे आणि इतर मुलांनी त्याला प्रश्न विचारून कल्पनेने संवाद करावा.
- गोष्ट नाटक स्वरुपात सादर करावी.
- मुलांनी आपल्या कल्पनेचा वापर करून गोष्टीची चित्रे काढावीत.
- मुलांनी आपल्या आवडीनुसार गोष्टीचा शेवट बदलावा. तिला नवे नाव द्यावे.
- मुलांनी गोष्टीवर आधारीत मुखवटे, कठपुतळ्या किंवा इतर साधने बनवावीत.
- मुलांकडून नवीन गोष्ट तयार करून घ्यावी. एका मुलाने एक वाक्य म्हणावे, दुस-याने त्याच्याशी निगडीत दुसरे वाक्य करावे, अशा प्रकारे सर्वांनी मिळून एक गोष्ट तयार करावी.
- तीन- चार शब्दांची कार्डे किंवा चित्रांची कार्डे घेऊन मुलांनी त्यातून एक गोष्ट तयार करावी.
- मुलांचे गट बनवावेत. एका गटाने कोडी घालावीत आणि दुस-याने त्यांची उत्तरे शोधावीत. मुलांना वस्तू, प्राणी किंवा पक्षाच्या चित्रांची कार्डे किंवा शब्दांची कार्डे देऊन त्यावरून कोडी बनवायला प्रोत्साहन द्यावे.
- मुलांना एक हस्तलिखित तयार करायला मदत करावी. त्यात मुलांनी लिहिलेल्या कविता, गोष्टी, चुटके, कोडी वगैरे असावे.
- मुलांच्या कथा, कविता, चित्रे वगैरे वर्गात लावावीत किंवा त्यांचा संग्रह तयार करावा.
- गणित, समाजशास्त्र, विज्ञान वगैरे विषय शिकवताना त्यासंबंधित गोष्टींकडे लक्ष वेधावे.

प्रकाशक

राजलक्ष्मी श्रीनिवासन मेमोरियल फाउंडेशन (आर एस एम एफ)
क्र.६ (पहिला मजला) १९ क्रॉस स्ट्रीट, इंदिरा नगर, (पाण्याच्या टाकीजवळ)
अड्यार, चेन्नाई ६०००२०. फोन नं. ०४४ २४४२ १११३.
इमेल: rsmf1944@gmail.com website:www.rajifoundation.org.in

प्रा. राजलक्ष्मी श्रीनिवासन (राजी) यांना आयुष्यभर मुलांमध्ये स्वारस्य होते व मुलांमध्ये उत्साह रहावा यासाठी आर एस एम एफ या फाउंडेशनची स्थापना करण्यात आली. ही संस्था वंचित वर्गातील मुलांसाठी, विशेषत: मुलींच्या शैक्षणिक विकासाच्या कार्यक्रमासाठी मदत करते. कथा झरना या संग्रहाचे प्रकाशन विना नफा या तत्त्वाने, शैक्षणिक उद्देशाने करण्यात आले आहे.

गोष्टींचा खजिना

गोष्टी ऐकण्याचा मोह सगळ्यांनाच होतो. गोष्टी ऐकताना खूपच मजा येते आणि कधी कधी तर गोष्ट ऐकताना आपण तहान, भूक आणि झोपसुद्धा विसरून जातो. गोष्टी सांगायला आणि ऐकायला कुणाला आवडत नाही?

आतापर्यंत आपण किती तरी गोष्टी ऐकल्या आणि सांगितल्या असतील ना? त्या मोजता तरी येतील का? गोष्टी किती तरी प्रकारच्या असतात- झाडा-फुलांच्या, पशू-पक्षांच्या, राजा-राणीच्या, शूर वीरांच्या, जादूच्या, खूप पूर्वीच्या काळातल्या, आजी -आजोबांनी सांगितलेल्या, गमती जमतीच्या, नाही तर विचार करायला लावणा-या!



या गोष्टी येतात तरी कुठून याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? मग चला तर आज आपण गोष्टीचीच गोष्ट ऐकूया.

एका गावात एक माणूस रहात होता. एक दिवशी त्याच्या मित्रानं त्याला एक गुपित सांगितलं. बरेच दिवस त्यानं हे गुपित कोणालाच सांगितलं नाही. मग त्याचे पोट रोज थोडे थोडे फुगू लागले. अखेर एक दिवस न राहवून त्याने ते गुपित आपल्या बायकोला सांगितलं.

मग काय? त्याच्या बायकोचं पण पोट फुगू लागले. तिला पण हे गुपित लपवून ठेवायला जमेना. मग बागेत जाऊन तिने एका खड्याला हे गुपित सांगितलं आणि वर माती टाकून तो खड्डा बुजवून टाकला. काही दिवसांनी त्या खड्डयातून आलं एक झाड. त्या लाकडाची कोणीतरी एक बासरी केली.

बासरीने ते गुपित सगळ्या गावाला सांगितले.

आता आफ्रिका देशातली आणखी एक गोष्ट ऐका. खूप वर्षापूर्वी एक होता उंदीर. तो सगळीकडे बागडत असे. राजाच्या महालात, झोपडीत, घरात असा सगळीकडे फिरायचा.

घराच्या भिंतीतल्या एका भोकात लपून तो सगळ्या गोष्टी ऐकत असे. त्या सगळ्या गोष्टी तो झाडाखालच्या एका खड्ड्यात लपवून ठेवत असे. त्याला या गोष्टी फारच आवडत असत.

उंदीर काय करतो ते एक कोल्हा लपून छपून बघत असे. एक दिवस कोल्ह्याने तो खड्डा उकरायला सुरुवात केली.



कोल्ह्याने जसा खड्डा उकरायला सुरुवात केली, तशा गोष्टी बाहेर येऊन सैरावैरा पळू लागल्या. त्या दिवसापासून आजपर्यंत या गोष्टी जगाच्या कानाकोप-यात सगळीकडे फिरताहेत.

त्या तुमच्या आमच्याकडे सुद्धा आल्या आहेत. त्या थोड्याशा बदलून आपण त्या आपल्या मित्र-मैत्रिणीना सांगतो आणि मग त्या आणखी दूरवर पसरत जातात.


P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

हत्ती आणि कुत्र्याची मैत्री

खूप पूर्वीची गोष्ट आहे. काशीमध्ये ब्रह्मदत्त नावाचा एक राजा राज्य करत असे. त्याच्याकडे एक हत्ती होता. माहूत त्या हत्तीची प्रेमाने देखभाल करीत असे.

माहूत रोज सकाळी हत्तीला आंघोळ घाली आणि मग त्याला खायला देई. माहुताचा कुत्रा पण रोज तिथे येत असे. हत्ती आणि कुत्रा रोज एकत्रच जेवायचे. थोड्याच दिवसांत हत्ती आणि कुत्र्याची छान दोस्ती जमली.



हत्ती नेहमी कुत्र्याची वाट पहायचा. कुत्रा आला नाही तर हत्ती काही खायचा नाही. कुत्रा पण हत्तीशी खूप खेळायचा. त्याच्या सोंडेवर चढून झोके घ्यायचा.



एक दिवस माहुताला पैशाची फार गरज होती म्हणून त्यानं आपला कुत्रा विकून टाकला. कुत्र्याला खूप वाईट वाटलं, पण तो बिचारा काय करणार? मुकाट्याने आपल्या नव्या घरी निघून गेला.

आपला मित्र दिसत नाही म्हणून हत्तीला फार उदास वाटू लागलं. त्यानं खाणं-पिणं सोडून दिलं. आंघोळीलाही जाईना. दिवसभर नुसताच बसून राहू लागला.

हत्ती काही खात-पीत नसल्याची बातमी राजापर्यंत पोचली. राजाने हत्तीची विचारपूस करायला आपल्या एका मंत्र्याला पाठवले.

हत्तीजवळ जाऊन मंत्र्याने त्याची तपासणी केली. हत्तीला काहीच आजार नव्हता. मंत्र्याने विचार केला की याला नक्कीच कसली तरी काळजी लागली असणार.



मंत्र्याने आसपासच्या लोकांकडेही चौकशी केली. लोकांनी सांगितलं की कुत्रा निघून गेल्यापासून त्या दु:खानेच हत्ती उदास आहे. कुत्रा गेला त्या दिवसापासूनच त्याने खाणं-पिणं सोडले आहे.

ही गोष्ट मंत्र्यानी राजाला सांगितली. राजाने लगेच ढोल वाजवून दवंडी पिटवली की ज्याच्याकडे माहुताचा कुत्रा असेल, त्याने त्याला लगेच सोडून द्यावं.


ज्याने माहुताकडून कुत्रा विकत घेतला होता, त्याने पण ही दवंडी ऐकली.

मग काय, राजाची आज्ञा ऐकल्याबरोबर त्याने कुत्र्याला बांधलेली दोरी कापून टाकली. कुत्रा उड्या मारत, धावत पळत हत्तीकडे गेला.

दोन्ही मित्र एकमेकांना पाहून अगदी खूष झाले. हत्तीने आपल्या सोंडेने कुत्र्याला उचललं आणि आपल्या डोक्यावरच बसवलं! त्याच्या डोळ्यातून आनंदाने अश्रू वाहू लागले.

माहूत पळत पळत जाऊन हत्तीसाठी खाणं घेऊन आला. हत्तीने पहिल्यांदा कुत्र्याला भरवलं आणि मगच आपण खाल्लं.


जातक कथा



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi


Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

नऊ की दहा




एकदा एक व्यापारी आपले १० उंट घेउन वाळवंटातून प्रवास करत होता. तो एका उंटावर बसून पुढे जात होता, आणि बाकीचे नऊ उंट त्याच्या मागे मागे येत होते.


जाता जाता व्यापा-याच्या मनात शंका आली की 'बाकीचे सगळे उंट मागे येताहेत ना?' त्याने मागे वळून पाहिलं आणि मोजायला सुरुवात केली, "एक, दोन, तीन, चार, पाच, सहा, सात, आठ, नऊ...



अरे, एक उंट कमी आहे." व्यापारी लगेच खाली उतरला. आणि आपल्या हरवलेल्या उंटाला सगळीकडे शोधू लागला.



खूप शोधूनही उंट काही सापडेना. त्याला वाटलं, की आपली मोजताना काही तरी चूक झाली असेल. परत एकदा मोजून पाहूया. एक, दोन...




असं कसं झालं? हे काय, सगळे उंट तर इथेच आहेत. आनंदाने व्यापारी परत उंटावर बसला आणि पुढे निघाला. थोड्या वेळाने त्याला परत एकदा शंका आली. मागे वळून उंट मोजले, तर ते नऊच होते.

व्यापारी गडबडीने खाली उतरला आणि हरवलेला उंट परत शोधू लागला. पण उंट कुठेच दिसेना. दमून भागून अखेर तो बाकीचे उंट उभे होते तिथे परत आला. परत एकदा उंट मोजले.

'काय चमत्कार! दहाच्या दहा उंट इथेच उभे आहेत की! उन्हामुळे माझ्या डोक्यात काही तरी गोंधळ झालेला दिसतो' असं स्वत:शीच पुटपुटत तो परत उंटावर बसला.





चौथ्यांदा मागे वळून त्याने परत एकदा उंट मोजले. 'हे काय? परत नऊ उंट? दर वेळी एक उंट का कमी पडतोय?' व्यापा-याला काहीच समजेना.

खूप विचार करून त्यानं ठरवलं, 'जेव्हा जेव्हा मी उंटावर बसतो, तेव्हा तेव्हा एक उंट हरवतो. आता मी त्यांच्याबरोबर चालतच जातो कसा.' असा विचार करून व्यापारी कडक उन्हात उंटाना घेऊन चालतच निघाला.



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju

जादूची पेन्सिल

कासिमला चित्रं काढायला खूप आवडत असे. टोकदार दगड आणि काड्यांनी तो मऊ जमिनीवर चित्रं काढत बसायचा. पेन्सिल विकत घ्यायला त्याच्याकडे पैसे नव्हते.


एकदा त्याच्या मनात विचार आला, 'माझ्याकडे पेन्सिल असायला हवी होती. मग मला किती छान छान चित्रं काढता आली असती!' तेवढ्यात त्याला एक म्हातारा भेटला. त्याने कासिमला एक पेन्सिल दिली.

'या पेन्सिलीने काढलेली चित्रं फक्त गरीबांनाच दे.' असं सांगून तो म्हातारा निघून गेला.



कासिमला खूप आनंद झाला. त्यानं एक कोंबडीचं चित्र काढलं. आणि काय आश्चर्य! एकदम त्या चित्राची खरीच कोंबडी झाली! मग त्याने एक मांजराचं चित्र काढलं. त्याचं पण खरंच मांजर झालं! अरे, ही तर जादूची पेन्सिल दिसते!

मग कासीमने एक झेंडूच्या फुलाचं चित्र काढलं, ते ही खरंच फूल झालं! मग त्याने वही, भोवरा, सदरा, फुलं अशी निरनिराळी चित्रं काढली- ती सगळीच्या सगळी खरी झाली! गरीबांनी जे काही मागितलं, त्या सगळ्याची कासीमने त्यांना चित्रं काढून दिली.



लवकरच ही बातमी राजापर्यंत पोचली. राजाने कासिमला बोलावलं आणि त्याला सोन्याच्या नाण्यांनी गच्च भरलेलं झाड काढून द्यायची आज्ञा केली.

"महाराज, आपल्याकडे तर पुष्कळ धन-संपत्ती आहे. मी फक्त गरिबांसाठीच चित्र काढतो" असं म्हणून कासिमने चित्र काढायला नकार दिला.

राजाला याचा फारच राग आला. त्याने नोकरांना आज्ञा केली, "याला तुरुंगात नेऊन टाका."



पण कासिम तुरुंगात स्वस्थ थोडाच बसणार होता? तो तर हुशारच होता. त्याने आपली जादूची पेन्सिल घेतली आणि किल्लीचं चित्र काढलं. वा! आता ती खरी किल्ली झाली. त्यानं किल्लीनं लगेच तुरुंगाचं कुलूप उघडलं आणि पळून गेला.

मलेशियातील गोष्ट



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist S. P. Raju



माकडं झाली माळी

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका राजाने आनंदाच्या प्रसंगी खूष होऊन आपल्या सगळ्या नोकरांना सुट्टी दिली. सर्वजण आनंदाने आपापल्या घरी निघून गेले. पण राजाच्या महालातला माळी मात्र गेला नाही.

माळी विचारात पडला, 'जर मी निघून गेलो तर बिचारी झाडं-झुडुपं वाळून जातील. आता काय करावं?' थोडा वेळ विचार करून तो बागेत राहणा-या माकडाकडे गेला.



त्याने माकडाच्या टोळीच्या मुख्याला म्हटले, "तुम्ही सगळे बागेत आनंदात राहता. फळं, दाणे हवे तितके खाता. झाडांवर झोके घेता, उड्या मारता, खेळता. मग आज मला थोडी मदत कराल का?"

मुख्य माकडाने लगेच म्हटले, "हो तर, नक्कीच करू की! काय करायचं सांग."

माळ्यानं उत्तर दिलं, "तुम्ही सगळ्यानी मिळून इथल्या सगळ्या झाडांना पाणी घालायचं. संध्याकाळी उन्हं कमी झाल्यावर पाणी घाला."



माळ्यानं त्यांना परत एकदा सांगितलं, "नीट लक्ष ठेवा. जरूर तेवढंच पाणी घाला. उगाच जास्त नको." मग तो निर्धास्त होउन आपल्या गावी गेला.

संध्याकाळ होताच सगळी माकडं उत्साहाने कामाला लागली. त्यांच्या प्रमुखानं त्यांना आठवण करून दिली, "प्रत्येक झाडाला योग्य तितकंच पाणी घाला."

एका माकडाने विचारलं, "पण प्रत्येक झाडाला किती पाणी हवंय ते आपल्याला कसं कळेल?"

आता प्रमुखही विचारात पडला. मग म्हणाला, "प्रत्येक झाडाची मुळं पहा. मूळ लांब असेल, तर जास्त पाणी घाला. आणि मूळ लहान असेल, तर कमी पाणी."




हे ऐकून माकडानी एक एक करत सगळ्या झाडांची मुळं तपासली आणि मगच पाणी घातलं.

दुस-या दिवशी माळी कामावर परत आला, तर काय... अरे बापरे... सगळी झाडं जमिनीवर पडलेली!

ज्याचं काम त्यानंच करावं, दुस-यानं केलं तर सत्यानाश!

जातक कथा



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju

अर्धं तुझं, अर्धं माझं

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका शेतक-याला भुईमुगाचं पीक घ्यायचं होतं. जंगलाजवळची जमीन रिकामीच पडलेली होती. शेतक-यानं जमीन नांगरली, बी पेरलं आणि पिकाची वाट पाहू लागला.

दूर उभे राहून एक अस्वल रोज त्याच्याकडे पहात असे.





एक दिवस अस्वल
त्याच्याजवळ आलं आणि त्याला
धमकी देउन म्हणालं, "ए शेतक-या,
मी तुला खाऊन टाकेन."

शेतकरी तर भीतीने कापायलाच लागला. मग धीर करून तो म्हणाला, "अस्वलदादा, मला खाऊ नकोस रे! एकदा भुईमुगाच्या शेंगांचं पीक आलं ना, की आपण दोघे ते अर्धं अर्धं वाटून घेऊया. मुळाकडचा भाग मी घेईन आणि जमिनीवरचा भाग तू घे." अस्वलाला शेतक-याचं म्हणणं पसंत पडलं.

शेतक-याने शेतात खूप कष्ट केले. भुईमुगाचं पीक खूप छान आलं. आता पीक कापण्याचा दिवस उगवला. अस्वलही आपला हिस्सा मागायला आलं.

अगोदर ठरल्याप्रमाणे शेतक-याने जमिनीच्या वरचा भाग अस्वलाला दिला. मग आपल्या हिश्याचा मुळाकडचा भाग गाडीत भरून तो निघाला.

"थांब!" अस्वल जोरात ओरडलं. "मला मुळाकडचा भाग चाखून बघायचा आहे." अस्वलानं मुळाकडचा काही भाग खाऊन पहिला. रागाने तो जोरातच ओरडला, "तू मला फसवलं आहेस. मुळाच्या बाजूलाच छान चव आहे. फांद्या आणि पानांना काहीच चव नाही. आता परत कधीही या बाजूला येऊ नकोस."


शेतक-याने अस्वलाची समजूत काढत म्हटलं, "रागावू नकोस रे अस्वलादादा! पुढ्च्या वेळेस तू मुळाकडची बाजू घे, मी फांदीची बाजू घेईन. मग तर झालं?"

पुढल्या वेळेस शेतक-याने त्याच जागी मक्याचं पीक घेतलं. या वेळी देखील भरघोस पीक आलं. मग कापणीचा दिवस आला. अस्वल आपला हिस्सा मागायला आलं. शेतक-याने मुळाकडची बाजू अस्वलाला दिली आणि कणसं गाडीत भरून घाईघाईने निघून गेला.



अस्वलाने मूळ खाऊन पाहिलं. "शी! शी! याला तर काहीच चव नाही. असं होय! म्हणजे शेतक-यानं मला परत एकदा फसवलंय तर! आता येऊ दे त्याला, म्हणजे चांगला धडा शिकवतो." रागावून अस्वल शेतक-याची वाट पहात बसलं.

पण शेतकरी थोडाच आता परत येणार होता!



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

घर बदला बघू

एका गावात धनीराम नावाचा एक श्रीमंत माणूस रहात होता. त्याच्या घराच्या डाव्या बाजूला एक लोहाराचं घर होतं आणि उजव्या बाजूला रहात होता एक सुतार




दिवसभर लोहाराच्या घरातून येणारा घणाचा आवाज ऐकून धनीरामचे कान किटून जायचे. दुस-या बाजूने सुताराच्या घरातून लाकूड कापण्याचा आवाज. धनीरामला याचा फारच त्रास व्हायचा. आवाजाने त्याला काहीच सुचायचं नाही आणि धड झोपही यायची नाही.

"काय बरं करावं?" धनीरामने बरेच दिवस विचार केला. मग एक दिवस त्याने लोहाराला आणि सुताराला बोलावलं आणि सांगितलं, "तुमच्या घरातून इतका आवाज येतो, की मला झोप सुद्धा येत नाही. तुम्ही दोघांनी आपली घरं बदला पाहू. त्याच्या बदल्यात मी तुम्हाला हवे तेवढे पैसे देईन."



"ठीक आहे, आम्ही तसेच करू" असं म्हणून दोघेही तिथून निघून गेले. थोड्याच वेळात त्यांनी आपलं सामान गाडीत भरलं. त्यांना तिथून निघालेले पाहून धनीराम अगदी खूष झाला.

"बरं झालं! दोघांनी घरं रिकामी केली! आता तरी मला चांगली झोप घेता येईल" असा विचार करून तो झोपायला गेला.



दुस-या दिवशी सकाळी धनीरामच्या घराच्या डावीकडून आणि उजवीकडून परत तसेच आवाज यायला लागले. धनीरामला काहीच समजेना. त्याने आपल्या नोकराला काय चाललंय ते बघायला पाठवलं.

परत येऊन नोकराने सांगितलं, "साहेब, दोघांनीही आपापली घरं बदलली आहेत. लोहाराच्या घरात आता सुतार राहतोय आणि सुताराच्या घरात लोहार!"

कोरियातील गोष्ट




Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi


L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju



पक्षी कोणाचा



सकाळची वेळ होती. बागेत खूप रंगीबेरंगी फुलं उमलली होती. पक्षी किलबिल करत होते.

राजकुमार सिद्धार्थ बागेत फेरफटका मारत होता. अचानक एका पक्षाची किंकाळी त्याच्या कानावर आली. सगळे पक्षी घाबरून इकडे-तिकडे उडायला लागले.



हे पाहून सिद्धार्थ विचारात पडला, 'या सगळया पक्षांना अचानक काय झालं?' तेवढ्यात त्याच्या पायाजवळ एक हंस येऊन पडला. त्याला एक बाण लागला होता आणि दुःखाने तो विव्हळत होता.

सिद्धार्थाने हंसाला अलगद उचलून घेतलं. त्याच्या शरीरात घुसलेला बाण हलक्या हाताने काळजीपूर्वक बाहेर काढला. त्याच्या जखमेवर मलम लावलं आणि प्रेमाने त्याला मांडीवर घेऊन जोजवू लागला. तेव्हा कुठे भीतीनं कापणारा हंस थोडा शांत झाला.


थोड्याच वेळात सिद्धार्थचा भाऊ देवदत्त पळत पळत तिथे आला आणि म्हणाला, "पक्षी मला दे, तो माझा आहे."



सिद्धार्थ म्हणाला, "पक्षी माझा आहे. मी त्याला वाचवलं आहे." असं म्हणून पक्ष्याला अलगद हातात घेउन तो राजमहालाकडे जाऊ लागला. देवदत्तही त्याच्या पाठोपाठ निघाला.

दोघेही राजाकडे गेले. देवदत्ताने राजाकडे तक्रार केली, "सिद्धार्थ माझा पक्षी मला देत नाही."

सिद्धार्थ म्हणाला, "पिताश्री, देवदत्तानं बाण मारून पक्ष्याला जखमी केलं. पण मी त्याचा जीव वाचवला आहे, म्हणून हा पक्षी माझा आहे.



देवदत्त म्हणाला, "नाही पिताश्री, हा पक्षी मला सर्वात प्रथम दिसला, म्हणून तो माझा आहे."

राजा थोडा वेळ विचारात पडला. मग त्याने आपला निर्णय सांगितला, "देवदत्त, तुला पक्ष्याला मारायचं होतं, पण सिद्धार्थनं तर त्याला वाचवलं आहे. मारणा-या पेक्षा वाचवणारा अधिक श्रेष्ठ असतो, म्हणून हा पक्षी सिद्धार्थचाच आहे."



P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

उंट आणि कोल्हा

"उंटदादा, त्या नदीच्या पलीकडल्या शेताकडे पहा तरी! तिथे किती छान काकड्या आल्या आहेत. आपण आज तिकडे जाऊया का?" कोल्ह्यानं आतुरतेनं विचारलं.

उंट म्हणाला, "हो जाऊया की!" उंटानं कोल्ह्याला आपल्या पाठीवर बसवलं. दोघं नदी ओलांडून काकडीच्या शेतात घुसले आणि आनंदानं काकड्या खाऊ लागले. काकड्या फारच चविष्ट होत्या.





कोल्ह्याचं पोट तर लहानच होतं. दोन-चार काकड्या खाल्ल्यावर त्याचं पोट भरलं. पोट भरल्यावर तो आनंदानं इकडे तिकडे उड्या मारत फिरू लागला. उंट आपला काकड्या खाण्यातच रमला होता.

"उंटदादा, तुझं अजून खाऊन झालं नाही का?" कोल्हा त्याला सारखा सारखा विचारू लागला.

उंटानं उत्तर दिलं, "माझं पोट मोठं आहे ना? अजून अर्धं देखील भरलं नाही. थोडा वेळ गप्प बस आणि मला जरा आरामात खाऊदे बघू!"

पण कोल्ह्याला कुठला धीर निघायला! "पोट भरलं की मला गप्प बसताच येत नाही." असं म्हणून कोल्हा आकाशाकडे तोंड करून "ऊऽऽहूऽऽऽ ऊऽऽहूऽऽऽ" असा आवाज काढायला लागला.



कोल्ह्याचा आवाज ऐकून आजूबाजूच्या गावातले लोक काठ्या घेऊन धावतच आले. ते पाहून कोल्हा पळत सुटला आणि नदीकिनारी जाऊन थांबला.

बिचारा उंट! त्याला काही पळता आलं नाही आणि तो गावक-यांच्या हातात सापडला. गावक-यांनी त्याला चांगला चोप दिला. मग उंट बिचारा रडत खडत नदीकिनारी पोचला.

कोल्ह्यानं वाईट वाटल्याचं नाटक करत म्हटलं, "अरेरे! किती मारलं रे तुला! मला बघूनच किती वाईट वाटतंय."

उंट म्हणाला, "बरं, ते जाऊदे रे! आता लवकर माझ्या पाठीवर बस. आपण इथून निघूनच जाऊया." दोघे नदीच्या मध्यावर येऊन पोचले. उंट अचानक थांबला आणि आपली कंबर हलवत डावीकडे-उजवीकडे डोलू लागला.




कोल्ह्यानं घाबरून विचारलं, "अरे दादा, असा का डोलतोयस? अशानं मी नदीत पडेन ना!"

उंट म्हणाला, "पोटभर जेवण झालं की अशी नदीत डोलायची मला सवयच आहे. मी तरी काय करू?" असं म्हणून उंट नदीत आणखीच जोरात डोलू घेऊ लागला.

बिचारा कोल्हा मात्र आता नदीत पडला!

पंचतंत्रातील गोष्ट




P. Saraswati   V. Vijayakanthi
L. S. Saraswathi   S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

हुशार काटकी

"कट" असा आवाज झाला आणि झाडावरून एक काटकी तुटून खाली पडली.

तुटलेली काटकी मुकाट्यानं पडून राहिली का?





मुळीच नाही. ती सगळीकडे फिरायला निघाली. नदीतून वहात जाताना, तरंगत, खेळत जायला तिला खूप मजा येत होती.

मध्येच तिला गाण्याचा आवाज आला, तिनं वर पाहिलं, तर कोकिळा गात होती.

गाणं ऐकण्यात काटकी अगदी रंगून गेली. तिला कोकिळेचं कौतुक करायचं होतं, पण तिला बोलता येत नव्हतं.


पुढे गेल्यावर आपलं खाणं गोळा करत असलेली खारूताई तिला दिसली.





काटकीला तिला सांगायचं होतं की, 'माझ्याकडे पण दाणे जमवायची छान युक्ती आहे,' पण ती गप्प बसली. एका काटकीवर कोण विश्वास ठेवणार?


आणखी थोडं पुढे गेल्यावर तिला भेटला एक बेडूक. बेडूकमामा कविता लिहीत बसला होता.



तिलाही त्याच्या कवितेत दोन-चार ओळी लिहून त्याला मदत करायची होती. पण ते कसं करणार?


जवळच्या एका झाडावर तिला एक गुलाबाचं फूल दिसलं.

तिला फुलाला सांगायचं होतं, "तू किती सुंदर आहेस!" पण तिला आपल्या मनातलं फुलाला काही सांगता आलं नाही.



दु:खी होउन काटकी धडपडत आपल्या घराकडे निघाली.


घरी आल्यावर तिनं मागं वळून पाहिलं तर काय! अरे वा! चालता चालता मातीवर एक छान रेघ उठली होती! काटकी ते पाहून फारच खूष झाली.




तिनं आणखी थोड्या रेघा काढल्या आणि त्याचं चित्र होऊ लागलं.

जशी जशी ती चित्र काढायला लागली, तशी सगळी झाडं, फुलं, प्राणी, पक्षी सगळे तिच्याकडे लक्ष देऊन बघू लागले. पण काटकीनं मात्र त्यांच्याकडे पाहिलं सुद्धा नाही.

ती भराभर चित्र काढू लागली. जंगलातल्या जमिनीवर एक सुंदर चित्र तयार झालं. आजपर्यंत त्या जंगलात असं चित्र कुणीच पाहिलं नव्हतं.



मग सगळ्यानी मिळून काटकीचं खूप कौतुक केलं, तिचा उत्साह आणखी वाढवला.



फुलपाखरं गाऊ लागली. झाडं झोके घेऊन काटकीचं कौतुक करू लागली. गुलाबसुद्धा काटकीकडे पाहून कौतुकानं हसू लागला.



'टप...टप...टप...' तेवढ्यात पाऊस पडायला लागला. सगळे प्राणी इकडे तिकडे जाऊन लपून बसले.



अरेरे! थोड्याच वेळात काटकीनं काढलेलं सुंदर चित्र पुसलं गेलं.

पण काटकीला त्याबद्दल मुळीच वाईट वाटलं नाही. तिला आता समजलं होतं की तिला वाटेल तेव्हा ती याहूनही अधिक सुंदर चित्र काढू शकेल आणि आपल्या मनातल्या सगळ्या गोष्टी सांगू शकेल.

'क्लेव्हर स्टिक'
या जॉन लेकनर यांच्या कथेवर आधारित



Katha Jharna 2008

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

माकडाचं पिल्लू फळं खातं

एक दिवस माकडाचं पिल्लू एका कलिंगडाच्या शेतात गेलं. त्यानं पहिल्यांदाच कलिंगड पाहिलं होतं. एक कलिंगड तोडून ते त्याचं जाड साल खाऊ लागलं.

खूप प्रयत्न करून जेमतेम दोन घास खाल्यावर त्यानं ते फेकून दिलं आणि म्हणाला, "शी! कलिंगडाची चव काहीतरीच आहे."

जवळच एक वासरू उभं होतं, ते म्हणालं, "कलिंगडाचा गर खातात, साल नाही काही."



वासराचं म्हणणं पूर्णपणे न ऐकताच पिल्लू पळायला लागलं आणि म्हणालं, "गर खायचा असतो, हे काय मला माहित नाही का?"

मग पिल्लू एका खरबुजाच्या शेतात गेलं. त्यानं एक खरबूज तोडलं, आणि त्याच्या बिया खाऊ लागला.

गाढवाचं एक पिल्लू त्याच्याजवळ आलं, आणि म्हणालं, "अरे बाबा, सालीच्या आत जो मऊ गर असतो ना, तो खायचा असतो. बिया नाही."






माकडानं तोंडातला घास थुंकून टाकला आणि म्हणाला, "ते तर मला आधीपासूनच माहित होतं."

मग माकडाचं पिल्लू बदामाच्या झाडावर चढलं. त्यानं एक बदाम तोडला आणि खायला लागला. तेवढ्यात एक नीलकंठ पक्षी उडत उडत तिथे आला आणि म्हणाला, "अरे, बदामाचा बाहेरचा भाग नसतो खायचा... "

छोट्या माकडानं त्याचं म्हणणं अर्ध्यावर तोडलं आणि म्हणाला, "मला सगळं माहित आहे." त्यानं बदामाच्या आतल्या कवचात दात घुसवला. "आई आई गं! माझा दातच पडला!" आणि माकडानं झाडावरून एकदम खाली उडीच मारली.



नीलकंठानं त्याला परत समजावलं, "अरे, बदामाचं आतलं कवच नसतं खायचं, त्याच्या आतली बी खायची असते."

मग छोटं माकड एका नाशपतीच्या झाडावर चढलं. एक नाशपती तोडली आणि फांदीवर आपटून आपटून तिचा लगदा केला आणि मग त्यातली बी खाऊ लागला. "छी! छी! किती कडू आहे!"

नीलकंठ परत त्याच्याकडे उडत आला आणि विचारलं, "कशी आहे चव?" माकडाच्या पिल्लाला आता तर फारच राग आला होता. त्यानं नाशपती नीलकंठाकडे फेकली आणि ओरडला, "मी आता कधीच फळं खाणार नाही."

चिनी गोष्ट



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation


P. Saraswati V. Vijayakanthi

Marathi Sujata Godbole


L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Artist Uma Krishnaswamy

ओळखा पाहू



धावत पळत धडपडत धडपडत
खड्यांमधून उड्या मारत
दूर दूरपर्यंत वहात जाते
सगळ्याची तहान भागवते.



गरिबांचं हे अंथरूण-पांघरूण
पहावं तिथे पसरलेलं
गुंडाळता तर येत नाही
असं हे काय बरं असेल?

शरीर नाही पण खेळतो, फिरतो
त्याच्याशिवाय नाही प्राण
स्पर्शून गेला तरीही, कोणाला ना दिसतो

कागद दिला तर खाऊन टाकते
पाणी प्याल्यावर मरून जाते




माझ्यावर आहे निळ्या रंगाचं छप्पर
ते कोण कसं पकडणार
त्याच्या जितकं जवळ जावं
तितकंच ते दूर पळतं


आकाशात चमचमते
कडकड कडकड आवाज करते
जर कोणी पाहील
तर झटकन त्याचे डोळेच मिटतील

झर झर झर झर जोरात येते
ती आली की जमीन हसते

आकाशात मी फिरत असतो
वाफ आणि थेंबात माझा प्राण
होतो जेव्हा रंग काळा
जमिनीवरच कोसळतो

एक बाग अशी आहे, रात्री तिथं फुलं उमलतात
सकाळ झाली की गुल होतात, हाती कुणाच्या कधी न येतात





उचंबळून नाचतो, गातो
याच्यात लपलेत किती प्राणी
नद्या आपल्या कवेत घेतो
जगाची सफर करून येतो

सगळ्यात मोठं धनुष्य मी
रंग माझे सात
हवा तेव्हढा प्रयत्न करा
पकडता येणार नाही मला

तो नसता तर पृथ्वी फिरली नसती, झाडांना आली नसती फुलं, फळं
दिवस-रात्रही झाले नसते, नसते उन्ह, नसता पाऊस

आकाशात राहतो, सगळ्या मुलांचा मी मामा
दिवसा लपतो, रात्री खेळतो

हवा, पाऊस, पृथ्वी, इंद्रधनुष्य,
आकाश, सूर्य, वीज, चंद्र,
अग्नी, तारे, ढग, नदी, समुद्र

जवळपास काही झालं, तर वास लागतो मला
सुगंध असो वा दुर्गंध, कळते सर्व मला.

हे गोड, हे आंबट-तिखट, ह्यात मीठ कमी-जास्त
हे सगळं मलाच कळतं, नाही इतर कोणाला

झाडावर बसलाय पोपट आणि बदक खातंय मासा
ओळखा पाहू हे मला कोणी सांगितलं

कोकिळा गोड गाते, चिमणी चिवचिवाट करते
आता ओरडला तो हत्ती आहे हे सगळं मला कुणी सांगितलं?

शरीराचं हे आवरण आहे, गार, गरम कळतं याला
काळा असो वा गोरा, प्रत्येकाचा रंग निराळा

त्वचा, डोळे, नाक, जीभ, कान

P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

अंभू - शंभूची युक्ती

उंदीर पकडण्यासाठी मनीमावशीनं एक युक्ती शोधून काढली.

एक दिवस मनीमावशीनं आपल्या आजूबाजूला राहणा-या सगळ्या उंदराना बोलावलं आणि म्हटलं, "मित्रांनो, मी इतके दिवस तुम्हाला खूप त्रास देत होते. पण आता मला त्याचं फार वाईट वाटतंय. आता तुम्ही सर्वांनी आनंदात रहावं असं मला वाटतं. माझं फक्त एकच मागणं आहे. रोज सकाळी आणि संध्याकाळी तुम्ही सर्वांनी एका ओळीत येऊन मला नमस्ते म्हणायचं आणि निघून जायचं. बस! एवढंच!" उंदरांनी आनंदानं हे मान्य केलं.

मनीमावशी रोज एका सिंहासनावर बसायची. सगळे उंदीर एका ओळीत तिच्यासमोर यायचे आणि सलाम करून निघून जायचे. जो उंदीर ओळीच्या शेवटी असायचा, त्याला ती झडप घालून पकडायची. बाकीच्या उंदराना काही पत्ताच लागायचा नाही.



उंदरांच्या या टोळीत अंभू आणि शंभू नावाचे दोन हुशार उंदीर पण होते. त्यांच्या लक्षात आलं की उंदरांची संख्या कमी कमी होत चालली आहे. दोघांनी मिळून एक बेत आखला. अंभूनं रांगेत पहिल्या जागेवर उभं राहायचं आणि शंभूनं रांगेत शेवटच्या जागी जायचं असं त्यांनी ठरवलं.

सगळ्यात पुढे असलेल्या अंभूनं मागे वळून मोठ्यानं विचारलं, "शंभू, तू कुठे आहेस?" शंभूनं लगेच उत्तर दिलं, "अंभू, मी इथेच आहे." अशा प्रकारे ते चालताना एकमेकांना हाका मारत जाऊ लागले. .'


मनीमावशीला त्या दिवशी काहीच करता आलं नाही. तिनं जर रांगेतला शेवटचा उंदीर पकडला असता, तर तिचा डाव सगळ्यांनाच कळला असता. त्या दिवशी मांजरी उपाशीच राहिली. तिला झोपही आली नाही



मांजरीनं विचार केला, 'आजचा प्रकार चुकून झाला असेल. उद्या मात्र काही झालं तरी मी शेवटचा उंदीर पकडणारच


दुस-या दिवशी शंभू रांगेत सर्वात पुढे उभा राहिला आणि अंभू रांगेच्या शेवटी. एकमेकांना हाका मारतच ते रांगेत चालत राहिले. त्या दिवशी पण तिला उंदीर पकडता आलाच नाही.

'आणखी एक दिवस वाट पाहूया' असा विचार करून मनीमावशीनं आपला राग आवरला.



त्या रात्री अंभू आणि शंभूनं आपल्या बरोबरच्या सगळ्या उंदराना सावध रहायला सांगितलं, "मनीमावशीच्या चेह-यावर थोडा जरी राग दिसला, तरी लगेच पळून जा."

दुस-या दिवशी परत सगळे उंदीर रांगेने निघाले. नेहमीप्रमाणेच अंभूनं हाक मारली, "शंभू, तू कुठे आहेस?"



बस! आता मात्र मनीमावशीचा राग अनावर झाला. तिनं उंदरांवर एकदम झडपच घातली.





उंदीर तर आधीपासूनच तयार होते. ते असे थोडेच फसणार होते! विजेच्या वेगानं पळाले आणि लपून बसले! मनीमावशी मात्र आपलेच दात-ओठ खात बसून राहिली.

तिबेटी लोककथा



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

रिकामी कुंडी

चीनमध्ये पिंग नावाचा एक मुलगा रहात होता. त्याला फुलं खूप आवडत असत. त्यानं लावलेली सगळी झाडं खूप छान वाढायची आणि त्यांना छान टवटवीत फुलं-फळंही यायची.

त्या देशाच्या राजालाही फुलं अतिशय आवडायची. आपल्या बागेतल्या फुलझाडांची देखरेख तो स्वत: करायचा. त्याच्या राज्यात सगळीकडे भरपूर फुलं असायची आणि त्यांचा सुगंध सर्वत्र दरवळत असायचा.

एकदा राजानं आपल्या मंत्र्याला सांगितलं, "मी आता म्हातारा झालो आहे. आता मला नवा राजा निवडावा लागेल. राज्यातल्या सगळ्या मुलांना दरबारात बोलवा."

काही दिवसांनी सगळी मुलं राजवाड्यात जमली. राजानं त्यांना सांगितलं, "हे पहा मुलांनो, मी तुम्हाला सगळयाना अतिशय सुंदर फुलांच्या बिया देणार आहे. त्यातून ज्याच्या झाडाला सर्वात सुंदर फुलं येतील, तो आपल्या देशाचा राजा होईल." मग राजानं सर्वांना बिया वाटल्या.





लहानग्या पिंगनं आनंदानं बिया घेतल्या. घरी येऊन त्यानं एका कुंडीत त्या बिया लावल्या. त्याची खात्री होती की त्याच्या झाडालाच सगळ्यात सुंदर फुलं येतील. तो रोज त्यांना पाणी घालायचा. त्यांना कोंब फुटण्याची तो अगदी आतुरतेनं वाट पहात होता.

होता होता बरेच दिवस झाले. पण अंकुर फुटलेच नाहीत. पिंगला आता फारच काळजी वाटू लागली. कुंडीतली माती बदलून त्यानं सगळ्या बिया एका मोठ्या कुंडीत लावल्या, पण तरीही अंकुर काही आलेच नाहीत. जवळ जवळ एक वर्ष होत आलं.

राजमहालात परत जाण्याचा दिवसही आला. सगळी मुलं नवे कपडे घालून तयार झाली. रंगीबेरंगी फुलांच्या कुंड्या घेऊन सगळे दरबारात जायला निघाले.



पण पिंग फार उदास होता. 'फक्त माझ्याच कुंडीत झाड का नाही आलं? माझी रिकामी कुंडी पाहून सगळी मुलं मला चिडवतील' या विचारानं त्याला राजमहालात जावंसच वाटेना.

पिंगच्या वडिलांनी त्याला धीर देत म्हटलं, "नेहमी तुझी झाडं सगळ्यात चांगली येत असत. या वेळेस देखील तू काळजीपूर्वक सर्व प्रयत्न केले होतेस. तेच पुरेसं आहे. जा, राजमहालात जाऊन राजाला भेटून ये."

मुलांनी आणलेली एकूण एक फुलझाडं राजानं लक्ष देऊन पहिली. मग तो पिंगकडे आला आणि विचारलं, "तू रिकामी कुंडी का घेऊन आला आहेस?"





पिंग रडू लागला. तो म्हणाला, "तुम्ही दिलेलं बी मी लावलं होतं. रोज पाणी सुद्धा घालत होतो. पण त्याला अंकुर आलाच नाही. मी माती पण बदलली. तरीही झाड आलंच नाही."

राजा हसू लागला. मुलांकडे पाहून म्हणाला, "हाच या देशाचा राजा होण्यासाठी योग्य आहे." सर्वांनाच आश्चर्य वाटलं.

राजानं सांगितलं, "तुम्ही सर्वांनी बी कुठून आणलंत ते मला माहित नाही. मी ज्या बिया दिल्या होत्या, त्या सर्व भाजलेल्या होत्या. त्यांमधून झाड येणं शक्यच नव्हतं. पिंगच्या प्रामाणिकपणाचं मात्र मला कौतुक वाटतं."

चिनी लोककथा



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju

15

चंद्र आणि शिंपी



थंडीचे दिवस होते. शिंप्यानं आपलं दुकान लवकर बंद केलं आणि कसला तरी विचार करत चालू लागला. तेवढ्यात त्याला हळूच एक आवाज आला, "मला फार थंडी वाजतेय. रात्रभर मला मोठाच प्रवास करायचा आहे. मला एक उबदार कोट शिवून देशील का?"

'हा आवाज कुठून येतोय?' शिंपी इकडे तिकडे पाहू लागला.



"हे बघ, मी इकडे आहे", बोलणारा दुसरा तिसरा कोणी नव्हता, तर तो होता, चांदोबा! थंडीनं कुडकुडून तो तर अर्धा झाला होता.

शिंप्याला वाटलं, 'थंडीमुळे चंद्र बिचारा आकसून गेलेला दिसतोय.' त्यानं चंद्राला सांगितलं की लवकरच तो त्याला कोट शिवून देईल.

शिंप्यानं आपल्याकडे उरलेल्या कापडाचे चांगले तुकडे शोधून काढले आणि अर्ध्या चंद्राच्या आकाराचा एक कोट शिवला.

"खूपच छान दिसतोय" असं म्हणत चंद्रानं तो अंगात घालायचा प्रयत्न केला. पण काय करणार, त्याला तो घालताच येईना.

हिरमोड होऊन चंद्र म्हणाला, "मला वाटलंच होतं. तू माझं माप तर घेतलंच नव्हतंस. मग मला हा कोट होईलच कसा?"

शिंपी म्हणाला, "पण मी तुझं माप घेणार तरी कसा?"

एक घार त्या दोघांचं बोलणं ऐकत होती. ती लगेच म्हणाली, "शिंपीदादा, मोजायची टेप दे मला. मी जाते आणि चंद्राचं माप घेउन येते.


घार चंद्राच्या भोवती फिरली आणि त्याचं नीट माप घेऊन आली आणि ते शिंपीदादाला दिलं.

ते सणाचे दिवस होते. एक आठवड्यानंतरच शिंप्याला चंद्राचा कोट शिवायला वेळ मिळाला.

कोटावरची सुंदर नक्षी पाहून चंद्र खूष झाला. केव्हा एकदा कोट घालतो असं त्याला झालं आणि घाईघाईनंच तो कोट घालू लागला. पण कितीही प्रयत्न केले तरी कोट काही घालता येईना.



"आता तूच बघ ना! खाऊन खाऊन किती लठ्ठ झाला आहेस. हा कोट तुला कधीच नीट होणार नाही." शिंपी रागावून म्हणाला.



चंद्र त्याला म्हणाला, "सगळी चूक तुझीच आहे. तू कोट शिवायला इतके दिवस का घेतलेस?"

मग त्यानं परत एकदा विनवणी केली, "बरं, आता एकदाच परत शिवून दे ना!"

"आणखी लठ्ठ तर होणार नाहीस ना?" असं म्हणून शिंपी निघून गेला.



लाल, निळे, पिवळे, काळे असे अनेक रंगांचे तुकडे जोडून शिंप्यानं एक मोठा कोट शिवला. त्याला थोडे दिवस लागले. कोट दिसायला तर सुरेखच होता.



शिंपी कोट घेऊन चंद्राकडे गेला. पण चंद्र आता गोल कुठे होता? तो कोट त्याच्यासाठी फारच मोठा होता.

चंद्र ओरडायला लागला, "एवढा सैल कोट घालून माझी थंडी कशी जाईल?"

"ते मला काय माहित?" शिंपी पण रागाने बोलला.

इतका कुशल, हुशार शिंपी! इतक्या वर्षांत जे चांगलं नाव मिळवलं होतं, ते धुळीला मिळालं.

बिचारा शिंपी! जेव्हा जेव्हा चंद्र दिसतो तेव्हा आपले दात-ओठ खाऊ लागतो.



निरुपमा राघवन यांची

रशियन लोककथा

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi


Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju

जादूचा आंबा

ब-याच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका जंगलात आंब्याचं एक खूप मोठं झाड होतं. झाडाच्या सर्वात उंच फांदीवर एक पिकलेला आंबा होता. तो काही साधासुधा आंबा नव्हता, तो होता एक जादूचा आंबा!

एक दिवशी जोराचा वारा आला आणि आंब्याचं झाड जोरजोरात हलवून गेला. जादूचा आंबा धपकन जमिनीवर पडला. नशिबानंच त्याला काही लागलं नाही.



जादूचा आंबा फारच खूष झाला. त्याला आता इकडे तिकडे फिरता येणार होतं. हळू हळू तो गावाजवळ पोचला. सगळ्यात आधी त्याला एक बकरी भेटली. ती म्हणाली, "अरे, थांब थांब! मला तुला खायचंय!"



जादूचा आंबा जोरात हसला
आणि गाऊ लागला,

"मी आहे आंबा जादूचा

जगभर फिरेन सकाळ दुपार

तुझ्या हाती मी नाही लागणार"


उड्या मारत मारत आंबा निघून गेला आणि बकरी त्याच्या मागे मागे जाऊ लागली. रस्त्यात एक मुलगा पतंग उडवत होता. तो आंब्याला म्हणाला, "अरे, थांब थांब! मला तुला खायचंय!"

आंबा परत हसला आणि गाऊ लागला,
"मी आहे आंबा जादूचा
जगभर फिरेन सकाळ दुपार
तुझ्या हाती मी नाही लागणार"

आंबा आणखीच जोरात पळू लागला आणि गेला एका बागेत. बकरी आणि मुलगा पण त्याच्यामागे पळू लागले. त्यावेळी बागेत काही मुली खेळत होत्या. त्यांनीही आंबा पाहिला आणि ओरडल्या, "अरे, थांब थांब! आम्हाला तुला खायचंय!"



आंबा घरंगळत दूर गेला आणि गाऊ लागला,
"मी आहे आंबा जादूचा
जगभर फिरेन सकाळ दुपार
तुमच्या हाती मी नाही लागणार"




बकरी, मुलगा आणि मुली सगळेच आंब्यामागे धावू लागले. पण आंबा कुणालाच मिळाला नाही.

आता आंबा दमला होता. उंच वाढलेल्या गवतात तो लपून बसला. सगळ्यांनी आंब्याला खूप शोधलं पण आंबा सापडला नाही म्हणून काही वेळानं सगळे निघून गेले.

आंबा दमला होता, त्याला लागली झोप. खूप महिने तो झोपूनच राहिला. अचानक एक दिवशी त्याला जाग आली. त्यानं पाहिलं तर त्याच्यावर सोनेरी सूर्यकिरण पडले होते. तो आता बदलला होता. त्याच्यातून अंकुर आले होते.

जादूच्या आंब्याचं आता झाड होऊ लागलं होतं.


पापुआ न्यू गिनीची लोककथा



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

चिमणीचं बक्षीस



शेरिन आणि शंबा शेजारी शेजारी रहात असत. शेरिन फार हावरट होता. त्याला इतरांची अतिशय असूया वाटायची. शंबा दयाळू होता. सर्वांशी तो नेहमी प्रेमाने वागायचा.


शंबाच्या घरासमोर एक मोठं झाड होतं. झाडावर चिमणीचं एक घरटं होतं. एक दिवस त्यातून एक छोटसं पिल्लू खाली पडलं. त्याचा पाय मोडला होता.

शंबानं प्रेमानं त्याला उचललं. त्याच्या पायाला औषध लावून पट्टी बांधली. मग त्याला हळूच परत घरट्यात नेऊन ठेवलं.

थोड्याच दिवसात चिमणीचं पिल्लू मोठं झालं आणि उडू लागलं. आता मोठी झालेली ही चिमणी शंबाकडे आली आणि म्हणाली, "तू मला मदत केली होतीस. त्याबद्दल मी हे मक्याचे दोन दाणे बक्षीस म्हणून तुझ्यासाठी आणले आहेत. ते तू तुझ्या बागेत लाव." एवढं सांगून चिमणी उडून गेली.

शंबानं दोन्ही दाणे जमिनीत लावले आणि रोज त्यांना पाणी घालत राहिला. त्यातून खूप छान मक्याचं पीक आलं. थोड्या दिवसांतच पीक तयार झालं. काय आश्चर्य! मक्याच्या कणसांत दाण्यांच्या ऐवजी बहुमोल रत्नं होती! शंबानं ती रत्नं विकली आणि तो खूप श्रीमंत झाला.

हे पाहून शेरिन आश्चर्यचकीत झाला. "शंबाला इतके पैसे कुठून मिळाले?" असा विचार करत शंबाच्या घरी जाऊन त्यानं चौकशी केली. काहीही न लपवता शंबानं सगळी खरी गोष्ट त्याला सांगून टाकली.





शेरिन विचार करू लागला, "काय केलं म्हणजे मी पण शंबासारखा श्रीमंत होईन?" त्याला त्याच्या घरासमोरच्या झाडावर एक घरटं दिसलं. एक लांब काठी घेऊन तो घरटं जोरजोरात हलवू लागला. एक लहानसं पिल्लू घरट्यातून खाली पडलं. त्याचा पाय मोडला होता. शेरिननं त्याला उचललं आणि पायाला औषध लावून पट्टी बांधली आणि परत त्याला घरट्यात ठेवून दिलं.


थोड्याच दिवसांत ते पिल्लू मोठं झालं आणि उडू लागलं. मोठी झालेली चिमणी एक दिवस शेरिनकडे आली, त्याला दोन मक्याचे दाणे दिले आणि म्हणाली, "जा, हे जमिनीत पेर. ते उगवले की त्यातून काय येतं बघ." एवढं सांगून चिमणी उडून गेली.

ही झाडंही खूप लवकर वाढू लागली. कणसं तयार होण्याची शेरिन खूप आतुरतेनं वाट पाहू लागला.

एक दिवस तो बागेत गेला. पण काय आश्चर्य! तिथे पीकच नव्हतं. हातात तलवार घेऊन एक भयानक राक्षस तिथे उभा राहिला होता.

त्याला पाहून शेरिन चांगलाच घाबरला आणि जोरात घराकडे पळू लागला. राक्षसही त्याच्या मागोमाग घरात घुसला आणि घरातले सगळे पैसे आणि धनसंपत्ती घेऊन निघून गेला.

बिचारा शेरिन!



© Katha Jharna 2008

P. Saraswati V. Vijayakanthi


L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

बावळट बबलू




बबलू नेहमी आपल्या आत्याच्या घरी जात असे. आत्या नेहमी बबलूबरोबर त्याच्या आईसाठी काही तरी पाठवत असे.

एक दिवस आत्यानं त्याला एक छानसा केक दिला. बबलूनं तो आपल्या मुठीत घट्ट पकडला आणि घरी निघाला. घरी पोचेपर्यंत केकचा सगळा चुरा झाला होता.



आई म्हणाली, "अरे, केक असा नसतो आणायचा. एका पानात चांगला गुंडाळून आपल्या टोपीच्या आत ठेवायचा. म्हणजे रस्त्यात माकडं पण त्रास देणार नाहीत."

पुढल्या आठवड्यात तो परत आत्याकडे गेला. यावेळेस आत्यानं त्याला लोणी दिलं. बबलूनं लोणी एका पानात गुंडाळलं आणि आपल्या टोपीखाली लपवून घरी येऊ लागला.




त्या दिवशी खूप कडक उन्ह पडलं होतं. लोणी लागलं वितळायला. घरी पोचेपर्यंत लोणी वितळून त्याच्या चेह-यावर आणि शर्टावर ओघळू लागलं होतं.

हे पाहून आई रागावली, "अरे देवा! लोणी कोणी असं आणतं का? ते थंड पाण्यात ठेवून आणावं लागतं."

त्यानंतरच्या आठवड्यात आत्यानं त्याला एक पिल्लू दिलं. बबलूनं त्याला गार पाण्यात ठेवलं आणि घरी यायला निघाला.

आईने आता डोक्यालाच हात लावला. ती म्हणाली, "बिचा-या पिल्लाचे काय हे हाल करतो आहेस! पुढल्या वेळेस पिल्लाच्या गळ्यात दोरी बांध आणि दोरीचं दुसरं टोक आपल्या हातात धरून त्याला आपल्या बरोबर चालत घेउन ये."

सुट्टीत बबलू आपल्या आत्याकडे गेला. या वेळेस आत्यानं त्याला एक मोठा पाव दिला. बबलूनं पावाला एक दोरी बांधली आणि दुसरं टोक हातात धरून रस्त्यावरून पाव ओढत ओढत घरी घेऊन आला. हे पाहून तर बबलूची आई थक्कच झाली.



पुढल्या आठवड्यात आई म्हणाली, "आज तू आत्याकडे जाऊ नकोस. आज मीच जाऊन येते. हे बघ, मी इथे पापड वाळत घातले आहेत. त्यांच्याकडे नीट लक्ष देऊन चाल."

आई आत्याकडे गेली. बबलूनं सावधपणे पापडाकडे पाहिलं. मग एकेका पापडावर व्यवस्थितपणे पाऊल टाकत त्यांच्यावरून चालत गेला.

आई घरी आल्यावर काय झालं हे कुणालाच माहित नाही. तुम्हाला काय वाटतं, काय झालं असेल?

युरोप मधील एक लोक कथा



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist S. P. Raju

टिटवी रागावली...



एक दिवस टिटवी बोराच्या झाडावर बोरं खात बसली होती आणि अचानक तिच्या गळ्यात एक काटा अडकला.

तिला काट्याचा फार त्रास होऊ लागला. मग ती गेली न्हाव्याकडे आणि म्हणाली, "न्हावीदादा, न्हावीदादा, मला काटा लागला आहे आणि तो फार दुखतो आहे. तो जरा काढून द्या ना."

न्हावी म्हणाला, "अगं जा! मी राजाचा न्हावी आहे, मी तुझा काटा कशाला काढू?"

टिटवीचे डोळे रागानं लाल लाल झाले. "असं काय! मी तुला आता चांगलाच धडा शिकवते!"

मग टिटवी गेली राजाकडे आणि म्हणाली, "महाराज, टिटवी मोठ्या अडचणीत आहे. तुमचा न्हावी माझं काम करत नाही. त्याला शिक्षा करा."

छोट्याशा टिटवीचं बोलणं ऐकून राजा हसायला लागला आणि हसतच राहिला.



टिटवी चिडली आणि तिथून निघून उंदराकडे गेली. "उंदीरमामा, उंदीरमामा, टिटवी मोठ्या अडचणीत आहे. न्हावी माझं काम करत नाही. राजा त्याला शिक्षाही देत नाही. राजा झोपायला गेला, की तू त्याच्या पोटाचा चावा घे."

उंदीर नाक वर करून म्हणाला, "मी नाही करणार हे काम."

रागातच टिटवी मांजराकडे गेली आणि म्हणाली, "मनीमावशी, मनीमावशी, टिटवी मोठ्या अडचणीत आहे. उंदीर राजाचा चावा घेत नाही, तू उंदराला पकडून खाऊन टाक."

मांजरी म्हणाली, "मला आता खूप झोप आली आहे. आता काही मी उंदराला पकडायला जाणार नाही."

भुर्रर्र करून टिटवी उडाली, ती गेली छडीकडे आणि तिला म्हणाली, "छडी, छडी, टिटवी मोठ्या अडचणीत आहे. मनीमावशी उंदराला खात नाही. चल आणि त्या आळशी मांजरीला चांगला मार दे."

छडी म्हणाली, "मी मांजरीला उगीच का मारू? तिनं मला तर काहीच त्रास दिला नाही."

बिच्चारी टिटवी! मग ती गेली आगीकडे. तिला म्हणाली, "ज्वालाताई, ज्वालाताई, टिटवी मोठ्या अडचणीत आहे. छडी मांजरीला मारत नाही, तू तिला जाळून टाक." आग म्हणाली, "आज मी खूप सारं जाळलं आहे. मी आता फार दमले आहे गं. मला नाही जमणार."

टिटवी आणखीच रागावली. मग ती गेली नदीकडे आणि तिला म्हणाली, "नदीमाई, आग काठीला जाळायला तयार नाही, म्हणून तू आग कायमचीच विझवून टाक." पण नदीनं काही उत्तरंच दिलं नाही आणि नेहमीप्रमाणेच वहात राहिली.




टिटवी हत्तीकडे गेली आणि म्हणाली, "शक्तिशाली गजराज, टिटवी मोठ्या अडचणीत आहे. नदी आग विझवायला तयार नाही. तू नदीचं सगळं पाणी पिऊन टाक."

हत्ती म्हणाला, "इतकं सगळं पाणी प्यायलो तर माझं पोट फुटूनच जाईल."

शेवटी निराश होऊन टिटवी डासांकडे गेली आणि म्हणाली, "डासभाऊ, डासभाऊ, टिटवी मोठ्या अडचणीत आहे. हत्ती नदीचं पाणी पीत नाही. जा आणि त्याला अंगभर चावून या."

डास लगेच तयार झाले. सगळे डास एकत्र जमले आणि हत्तीला घेरून टाकलं. हत्ती चांगलाच घाबरला.



"मी नदीचं सगळं पाणी पितो," हत्ती म्हणाला.

"मी आग विझवते," नदी म्हणाली.

"मी छडीला जाळून टाकीन," आग म्हणाली.

"मी मांजरीला मार देते," छडी म्हणाली.

"मी उंदराला खाते," मनीमावशी म्हणाली.

"मी राजाला चावतो," उंदीर म्हणाला.

"मी न्हाव्याला शिक्षा करतो." राजा म्हणाला.

घाईघाईने न्हाव्यानं काटा काढला आणि

टिटवीला बरं वाटू लागलं.

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation


P. Saraswati V. Vijayakanthi

Marathi Sujata Godbole

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Artist Uma Krishnaswamy

ओळख माझा मित्र



जंगलात राहणा-या खारूताई आणि सशाची खूप घट्ट मैत्री होती. खारूताई फारच बडबडी होती.




सगळ्याबद्दल सगळं काही तिला माहित असावं लागे. ससा अगदीच कमी बोलणारा! कुठल्याही प्रश्नाचं तो सरळ उत्तर देतच नसे.

खारूताई: अरे जरा थांब की! इतक्या सकाळी गाणं म्हणत कुठे निघाला आहेस?

ससा: आपल्या नव्या मित्राशी खेळायला जातोय.

खारूताई: हा कोण नवा मित्र?

ससा: आहे कोणीतरी चार पायांचा. तूच ओळख की!





खारूताई: अरे! आपल्या सगळ्यांनाच चार पाय आहेत. आता समजलं. तुला मला काही सांगायचंच नाही आहे! थांब, आता मीच ओळखते. तो एक मोठा प्राणी आहे का?

ससा: हो.

खारूताई: तू हत्तीकडे चालला आहेस ना? तोच तर सर्वात मोठा प्राणी आहे.


ससा: मुळीच नाही. माझ्या मित्राला सोंड नाही.


खारूताई: मग गेंडा तुझा मित्र आहे का? त्याला सोंड नसते.

ससा: नाही! नाही! माझ्या मित्राला शिंग पण नाही!

खारूताई: असं होय! मग तो नक्की उंटच असेल.
त्याला चार पाय आहेत, सोंड नाही आणि शिंगही नाही.

ससा: नाही, माझ्या मित्राच्या पाठीवर उंचवटा पण नाही.





खारूताई: मग कोण बरं असेल? झेब्रा तर तुझा मित्र नाही ना?


ससा: नाही. माझ्या मित्राच्या अंगावर पट्टे नाहीत.

खारूताई:: तर मग अस्वल तुझा मित्र असेल. त्याच्या अंगावर पट्टे नाहीत. त्याच्या पाठीवर उंचवटा नाही आणि त्याला शिंग आणि सोंड पण नाही.

ससा: नाही गं! माझ्या मित्राच्या अंगावर अस्वलासारखे दाट केस देखील नाहीत.

खारूताई: असं काय! तुझ्या मित्राच्या अंगावर ठसे आहेत का?

ससा: हो, आहेत.





खारूताई: तू काय बिबट्याला भेटायला निघाला आहेस की काय?

ससा: नाही, नाही. तो तर मला खाऊनच टाकेल की! माझ्या मित्राचे पंजे टोकदार नाहीत.

खारूताई: आता ओळखणं अगदीच सोपं आहे. तू हरणाकडे निघाला आहेस ना?

ससा: नाही गं! चल, आता सांगतोच तुला! त्याची मान लांब आहे.

खारूताई: आता समजलं! तू जिराफाबद्दल बोलतो आहेस ना?

ससा: तुला किती वेळ लागला ओळखायला! चल, आता तू पण ये माझ्याबरोबर. माझ्या मित्राच्या पाठीवर बसून आपण जंगलात फिरून येऊया!

P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

स्वप्न 21

खूप जोराचा पाऊस पडत होता. मिनी खिडकीतून पावसाकडे पहात होती. तिला पाऊस फार आवडत असे.

थोड्या वेळाने पाऊस थांबला. मिनी आणि तिची लहान बहीण राणी पळत पळत बाहेर गेल्या. छपरावरून पाण्याचे थेंब गळत होते. दोघी आपले हात पसरून ते थेंब पकडायला लागल्या. रस्त्यावरच्या लहान लहान खड्यांत पावसाचं पाणी जमलं होतं. दोन्ही बहिणी त्यात उड्या मारत खेळू लागल्या.

तेवढ्यातच आकाशात सुंदर इंद्रधनुष्य दिसायला लागलं. तांबडा, निळा, पिवळा, हिरवा, जांभळा असे किती रंग होते त्यात! मिनी आश्चर्यानं पहातच राहिली.



इंद्रधनुष्य तिला एखाद्या पुलासारखंच वाटलं. तिच्या मनात विचार आला, 'हा पूल कुठे बरं जात असेल?' ती त्या स्वप्नात हरवूनच गेली. हळू हळू ती त्या पुलावरून चालायला लागली. चालत चालत ती आकाशातून चक्कर मारून आली. "ताई, आई बोलवतीय" असा राणीचा आवाज ऐकल्यावरच ती जमिनीवर उतरली.

दुस-या दिवशी मिनी आणि राणी शाळेतून परत येत होत्या. तेव्हा आकाशात उडणारा एक बगळा मिनीला दिसला. क्षणभर मिनीनं डोळे मिटले.


स्वप्नातच ती पण आकाशात उडू लागली. खूप जंगलं, डोंगर, नद्या आणि शहरांवरून ती फेरफटका मारून आली. तिला खूप मजेच्या आणि आश्चर्यकारक गोष्टी पहायला मिळाल्या.






तिच्या गावात अनेक वर्षांपूर्वीच्या खूप दगडी मूर्ती होत्या. जुन्या इमारती आणि देवळं सुद्धा होती. मिनी त्यांच्याकडे टक लावून पहात बसली, की स्वप्नांत हरवूनच जायची. आपल्याला आवडलेल्या मूर्तींची मनातल्या मनात चित्रं काढायची. ती नेहमी आपल्या बहिणीला सांगायची, "मी मोठी झाल्यावर अशाच मूर्ती बनवणार आहे."

मिनीच्या घराजवळ एक तलाव होता. तलावाच्या पाय-यांवर मिनी पाण्यातल्या माशांचा खेळ पहात बसायची.



पाहता पाहता ती स्वत:च एक मासोळी व्हायची. कधी समुद्राच्या लाटांवर तरंगायची तर कधी खोल समुद्राच्या तळाशी जायची.

"तू कसला विचार करतेस? मला पण सांग ना!" एकदा राणीनं हट्टच धरला. मग मिनीनं आपल्या स्वप्नांबद्दल राणीला सांगितलं. मिनीच्या स्वप्नांची गोष्ट ऐकून राणीला फारच मजा वाटली. ती म्हणाली, "तू जिथे जिथे जाशील, तिथे मला पण नेशील ना?" मिनी हसून म्हणाली, "हो, नेईन की! आपण दोघी मिळून गेलो, तर आणखीच मजा येईल की!"



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

पाठलाग कशासाठी

जगाच्या सुरुवातीपासून कुत्रा, मांजर आणि उंदीर या तिघांची मैत्री होती आणि ते तिघंही मजेत एकत्र रहात होते. प्रत्येक जण आपापली कामं करायचे.


आपसात एकी रहावी म्हणून त्यांनी एक करारपत्र तयार केलं आणि मांजरानं ते माळ्यावर जपून ठेवलं. त्या करारात लिहिलं होतं की कुत्र्यानं घराच्या बाहेरचं काम बघायचं आणि मांजर आणि उंदरानं घराच्या आतलं काम करायचं.




थोड्याच दिवसांत कुत्रा आपल्या कामाला कंटाळला. रागावूनच त्यानं मांजराला म्हटलं, "थंडी पावसात मी एकटाच घराबाहेर राहून पहारा देतो, तू आणि उंदीर आरामात घरात बसता."

मांजर म्हणालं, "तुला आपण केलेला करार आठवत नाही का?"

कुत्रा म्हणाला, "कुठे आहे ते करारपत्र? आण पाहू, आपण परत एकदा वाचून पाहूया."






मांजर माळ्यावर चढलं, आणि पाहते तर काय, उंदराने करारपत्र कुरतडून त्याचे तुकडे तुकडे केले होते आणि त्यांच्यावर आरामात झोपला होता.

मांजर फारच रागावलं. त्याला उंदराला चांगला चोप द्यायचा होता, पण तो पळून गेला. मांजराला काही त्याला पकडता आलं नाही. त्याच्यामागे धावून धावून थकल्यावर मग मांजर खाली आलं.

कुत्र्यानं परत एकदा मांजराकडे करारपत्र मागितलं. पण बिचारं मांजर ते आणणार कुठून? कुत्रा रागानं गुरगुरतच मांजरामागे धावू लागला.





त्या दिवसापासून आजपर्यंत जेव्हा जेव्हा कुत्र्याला मांजर दिसतं, तेव्हा तेव्हा तो करारपत्र मागत त्याच्यामागे धावतो. उंदरानं करारपत्र कुरतडून टाकलं त्याचा राग मनात धरून मांजर आजही त्याला पकडायचा प्रयत्न करतं. म्हणूनच, आजसुद्धा हे तिघं एकमेकांचा पाठलाग करत असतात.

रुमानियाची लोककथा

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

उपास

सकाळची वेळ होती. जंगलात एका मोठ्या वडाच्या झाडाखाली माकडांची एक टोळी बसली होती. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, सगळी माकडं एकदम चुपचाप बसली होती.

हो! कारण आज माकडांचा उपासाचा दिवस होता. उपास आता सुरूच होणार होता.

टोळीचं मुख्य माकड उठलं. त्यानं एक सल्ला दिला, "संध्याकाळचं जेवण आत्ताच तयार करून ठेवूया. म्हणजे उपास संपला की लगेच आपल्याला खाता येईल." ही कल्पना सर्वांना पसंत पडली.



एका क्षणात सगळी तरूण माकडं उड्या मारतच पळाली आणि पिकलेल्या स्वादिष्ट केळ्याचे घड घेऊन आली.

मुख्य माकडाची बायको म्हणाली, "आत्ताच सगळी फळं वाटून देऊया का? उपास संपल्यावर फळं वाटण्यात उगीच वेळ वाया जाईल. शिवाय संध्याकाळी आपल्याला खूप भूक पण लागली असेल!"

माकडांचं यावर पण एकमत झालं. सर्वांनी आपापल्या वाट्याची केळी घेतली आणि नीट जपून ठेवली.

एक मोठं माकड म्हणालं, "फक्त एकच केळं सोलून ठेवूया का?"






फळं न खाता नुसतंच त्यांच्याकडे पहात बसणार? त्याला ते सहन होत नव्हतं.

टोळीच्या प्रमुखानं आदेश दिला, "ठीक आहे. फळं सोलून ठेवूया. पण लक्षात ठेवा, संध्याकाळपर्यंत कुणीही खायचं नाही." "वा! ही तर मस्त कल्पना आहे." मग सगळ्या माकडांनी आपापली केळी सोलून ठेवली.

सगळ्यात लहान माकड आपल्या वडिलांच्या कानाशी जाऊन म्हणालं, "बाबा, मी केळं माझ्या तोंडात ठेवलं तर चालेल का? संध्याकाळ होईपर्यंत मी ते मुळीच खाणार नाही. खरंच."

वडिलांनी सगळ्या माकडांना म्हटलं, "आपण सगळ्यानी केळं तोंडात ठेवायला काय हरकत आहे? संध्याकाळी उपास संपल्यावर लगेच खायला ते सोयीचं होईल."



दुस-याच क्षणी सर्व माकडांनी केळं आपापल्या तोंडात ठेवून दिलं. एकमेकांकडे पाहून आता ते काहीतरी खाणाखुणा करू लागले.

मग काय! एक क्षणातच सगळी केळी गळयाखाली उतरली आणि दिसेनाशीच झाली.

उपास देखील मोठ्या गोडीनंच संपला!

कानडी लोककथा


Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

Marathi Sujata Godbole

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Artist S. P. Raju



चला ओळखूया

पाय आहेत मला चार
शेपूट आहे माझी लहान
मी करते बेंsss बेंsss
ओळखा पाहू मी कोण?

उभा राहूनच तो झोपतो, आडवा कधी होत नाही,
असा कोणता प्राणी आहे जो दौडतो मात्र दूर दूर?

खूष झालो की मी हींsss हूंsss, हींsss हूंsss करतो
खूप ओझं वाहून नेतो
एकदा का आला मला राग
तर मी देतो चांगली लाथ



दोन सुपं आणि मुसळे चार
समोर लोंबते आहे तलवार
शेपूट माझी लहान, मिरवणुकीत माझी शान
ओळखा पाहू, करा विचार

मित्रासाठी देईन प्राण
घराचा मी रखवालदार
आहे मी दोस्त इमानदार
मग सांगा मी कोण?

पाण्यात राहते मी मजेत
जमिनीचं नाही मला प्रेम

पाय माझे चार फूट
मान माझी सहा फूट
शेपूट माझी तीन फूट
हिरवं गार जंगल, आहे माझं घर

पिवळ्या दाढीवाल्याच्या
गर्जनेला भितात सारे
ऐटीत जेव्हा येतो तो
घाबरून लपतात सारे

झाडावर मी तुरुतुरु चढते
पाठीवर माझ्या रेषा तीन
उड्या मारत पळताना
दिसते नेहमी मी तुम्हाला

मान माझी लांब
पाठीवर आहेत उंचवटे
पोटात भरून पाणी
वाळवंटात राहतो मी आनंदात

चोरपावलांनी येते पण चोर नाही
उड्या मारून पकडते पण पोलीस नाही
दूध पिते पण लहान बाळ नाही

मला आहेत पाय आठ
चालतो मी वाकडा तिकडा
सरळ मी कधी जातच नाही
सांगा बरं माझं नाव

अंड्यातून मी बाहेर येतो
तेव्हा असते मला एक शेपूट
मोठा झालो की चार पायांनी
पाण्यात उड्या मारत खेळतो
डरांवss डरांवss असं गाणं गातो
भूक लागली की किडे खातो

राहतो मी जमिनीवर, विहिरीत, तळ्यात आणि समुद्रात
धोका दिसला की डोकं लपवतो माझ्या भक्कम ढालीत

आपल्या बाळाला दूध पाजतो
छपराला हा उलटा लटकतो
अंधारात मजेत फिरतो
निराळंच आहे जग याचं


आहे मोठा तगडा आणि रंग याचा काळा
अंगभर आहेत केस
गुरगुरुन सर्वांना घाबरवतो
डोंगरावर वा जंगलात राहतो

पिल्लाला माझ्या पोटाशी धरून
मी तर चढते झाडावर
फांद्यांना धरून उड्या मारते, झोके घेते
मजेमजेची तोंडे करते



सहजच मी भिंतीवर चढते
शेपूट टाकून जीव वाचवते
घराची मी मैत्रीण, विषारी किड्यांची मी शत्रू
यावरून ओळखा बरं मी कोण ते.

सिंह, हत्ती, अस्वल, बेडूक, घोडा, बकरी,
माकड, जिराफ, उंट, मांजर, पाल, खेकडा,
मासा, गाढव, कुत्रा, कासव, वटवाघूळ



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation


P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

लिलाव

नसिरुद्दीनकडे एक गाढव होतं. ते खाण्यात अगदी पटाईत होतं, पण एक नंबरचं कामचुकार!

नसिरुद्दीनला ते गाढव मुळीच आवडत नव्हतं. त्यानं विचार केला, 'याला विकूनच टाकूया! तेच बरं होईल.'



एक दिवस सकाळी नसिरुद्दीन गाढवाला घेउन बाजारात गेला.

संध्याकाळी घाईघाईने घरी आल्यावर बायकोला म्हणाला, "आज मी काय केलं माहित आहे? सकाळी बाजारात गेल्यावर लिलाव करणा-या माणसाकडे गाढव देऊन टाकलं आणि त्याला सांगितलं की याला चांगल्या किमतीला विकून टाक."



लिलाव करणा-याने गाढवाची खूप तारीफ करायला सुरुवात केली. तो जोरजोरात ओरडून सांगू लागला, "हुशार व्यापा-यानो, लवकर या! इतकं उत्तम गाढव परत मिळणार नाही. घाई करा! लवकर या! पहा तरी!"

"गाढवाचे लांब कान पहा. याचे पाय पहा किती बळकट आहेत. आणि दात तर पहाच. फार छान तरूण गाढव आहे! या! या!" असं म्हणत बोली लावू लागला.

बस! मग काय! लोक पण आपापली किंमत सांगू लागले. एका गि-हाइकानं तीन मोहरांची बोली लावली. पण लिलाव करणारा तिथेच थांबला नाही.



मग लोक दहा- पंधरा मोहरा सुद्धा द्यायला तयार झाले. आणि अशी किंमत वाढतच गेली. अखेर... " नसिरुद्दीन बोलतच होता, आणि तेवढ्यात घराच्या अंगणातून गाढवाच्या रेकण्याचा आवाज आला.

नसिरुद्दीनच्या बायकोनं अधीर होत विचारलं, "शेवटी झालं काय ते तर सांगा. लवकर बोला."

नसिरुद्दीन गर्वानं म्हणाला, "मी विचार केला, इतकं गुणी गाढव मी कशाला विकू? मीच तीस मोहरा देऊन स्वत:च ते गाढव विकत घेऊन आलो."



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist S. P. Raju

बाभळीच्या झाडाची कहाणी

रस्त्याच्या कडेला एक बाभळीचं झाड होतं. झाड काट्यानी भरलं होतं. "मी कुणालाच आवडत नाही! काटे नसलेली बाकीची झाडं किती छान दिसतात." बाभळीच्या झाडाला या विचारानं फार दु:ख होत असे.

एक दिवस ते असा विचार करत असताना एकदम त्याचे काटे नाहीसे झाले. झाडावर फक्त हिरवीगार पानंच डोलू लागली. हे पाहून बाभळीच्या झाडाला केवढा आनंद झाला!


पण हा आनंद फार काळ टिकला नाही. कुठून तरी एक बकरी आली आणि झाडाची पानं खाऊ लागली.






बाभळीनं विचार केला, "अरेरे! ही बकरी तर माझी पानं खाऊनच टाकतीय. आता काय करू? माझी पानं जर सोन्याची असती तर किती बरं झालं असतं!" हे काय? बाभळीची सगळी पानं सोन्याची झाली.

तेवढ्यात तिथून एक माणूस चालला होता. बाभळीची सोन्याची पानं बघून त्याचे डोळे तर चमकायलाच लागले.





"काय चमत्कार आहे पहा! याला म्हणतात नशीब!" असं म्हणत, त्यानं भराभर झाडाची पानं तोडायला सुरुवात केली. झाडावर एकही पान शिल्लक राहिलं नाही. बाभळीला तर फारच वाईट वाटू लागलं.

"हे काय झालं? माणूस तर सोन्याची पानं सोडणारच नाही. त्याऐवजी माझी पानं काचेचीच असायला हवी होती. तेच बरं झालं असतं." बाभळीनं असं म्हणायचाच अवकाश, तिच्यावर एकदम काचेची पानं आली.




बाभळीचं झाड फारच खूष झालं. पण थोड्याच वेळात जोराचा वारा आला आणि काचेची पानं एकमेकावर आपटून त्यांचा चक्काचूर झाला.

बाभळीचं झाड रडत रडत बडबडायला लागलं, "हे काय झालं, मला कधीच आनंदानं जगता येणार नाही का? बकरी खाऊ शकणार नाही, माणूस चोरणार नाही आणि वारा फोडणार नाही असं मला कधीच होता येणार नाही का?"

बाभळीनं असा विचार करण्याचाच अवकाश! परत एकदा तिच्यावर काटे आले! यानंतर मात्र बाभळीनं कधीही आपल्याला काटे आहेत याचं वाईट वाटून घेतलं नाही.

भारतातील लोककथा




Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati   V. Vijayakanthi   **Marathi** Sujata Godbole

L. S. Saraswathi   S. Rajalakshmi   **Artist** S. P. Raju

सिंह आणि ससा



वनराज सिंह आता म्हातारा झाला होता. आता त्याला पूर्वीसारखं शिकारीला जायला जमत नव्हतं.

एक दिवस सिंहाने सगळ्या जनावरांना बोलावलं आणि सांगितलं, "मित्रांनो, मी शिकार करायला आलो की सगळे घाबरून पळून जातात. पण दरवेळी मी तुमच्यातल्या एकालाच तर खातो. मग आपणच ही अडचण दूर करूया का? दररोज तुमच्यातला एक प्राणी आपण होऊनच माझ्या जेवणाच्या वेळी माझ्याकडे आला तर कसं?"



"असं करायला काहीच हरकत नाही." जनावरांच्याही ते सोयीचंच होतं. कोणतं जनावर दुस-या दिवशी सिंहाचं जेवण ठरेल हे ते आदल्या दिवशीच ठरवत असत.

एक दिवस सशाची पाळी आली. "मी बरा सिंहाचं जेवण होईन! मी सगळ्या जंगलालाच या संकटातून सोडवीन." असा विचार करूनच सशाने एक बेत केला. सिंहाच्या गुहेकडे तो मुद्दामच हळू हळू चालत जाऊ लागला.

खूप वेळ वाट बघूनही आपलं जेवण आलं नाही म्हणून सिंह आता चांगलाच रागावला होता. सशाला येताना पाहून तो रागाने ओरडला, "आजचं माझं जेवण तू आहेस का? मग इतका उशीर का केलास?"





ससा नम्रपणे म्हणाला, "महाराज, मी आज घरून लवकरच निघालो होतो. रस्त्यात मला आणखी एक सिंह भेटला. तो मला खायला आला. मी त्याला सांगितलं की मी माझ्या राजाकडे चाललो आहे. मग तो म्हणाला, "दाखव बघू कोण आहे तुझा राजा. मी त्याला मारूनच टाकतो." बस सरकार, मी कसाबसा त्याला चुकवून इकडे पळून आलो."


सिंहाला हे ऐकून फारच राग आला आणि तो म्हणाला, "कुठे आहे तो दुष्ट? चल मला दाखव." ससा पुढे निघाला आणि सिंह त्याच्या मागे मागे जाऊ लागला.

ससा म्हणाला, "महाराज, तुम्ही इथेच थांबा. मी जरा बघून येतो." पुढे जाऊन सशाने एका विहिरीत वाकून पाहिलं. त्याला पाण्यात आपलं प्रतिबिंब दिसलं.

"महाराज, इथेच आहे तो सिंह," असं म्हणून ससा बाजूला झाला. रागाने डरकाळी फोडून सिंहाने विहिरीत वाकून पाहिलं. पाण्यात त्याला आपलंच रागावलेलं प्रतिबिंब दिसलं. काही विचार न करताच विहिरीतल्या सिंहाला मारण्यासाठी सिंहाने विहिरीत उडी मारली आणि पाण्यात बुडून मेला.

छोटासा ससा मग उड्या मारतच घरी गेला.

पंचतंत्रातील गोष्ट



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

ठेंगू आणि लंबू

उंट आणि डुक्कर नेहमी एकमेकांना चिडवत असत. एक दिवस बागेत---

उंट: काय रे ठेंगू, तुला माझ्यासारखं उंच व्हावं असं वाटत नाही का?

डुक्कर: ए लंबू, मी कशाला तुझ्यासारखा उंच होऊ? त्याच्यापेक्षा बुटकं असलेलंच बरं.

उंट: तू असं कसं म्हणतोस? माझ्याकडेच बघ ना! या उंच भिंतीच्या पलीकडे असलेल्या सर्व गोष्टी मला मजेत पाहता येतात. तिकडे खायला खूप छान छान गोष्टी आहेत. हिरव्या गार फांद्या आणि पानं आहेत. त्या मला सहज काढता येतात. तुला तर त्या दिसतही नाहीत. आता कळलं का उंच असणं किती चांगलं असतं ते?





डुक्कर: अरे बाबा, जरा धीर तर धर! या भिंतीच्या खाली एक भोक आहे ते तर बघ. मला तर त्यातून पलीकडेही जाता येतं आणि तिथल्या सगळ्या छान छान गोष्टी पोटभर खाता पण येतात. पण तुला तर त्यातून जाताच येत नाही ना. या बाजूला उभा राहून मी कसा सगळं खातो तेच बघत बस आता!

असं म्हणून डुक्कर भिंतीच्या पलीकडे निघून गेलं.

उंट: तू म्हणतोस ते ही बरोबरच आहे. बुटकं असण्याचेही फायदे आहेत आणि उंच असण्याचे देखील.


खरंच आहे. दोघांनाही आपली आपली उंची लखलाभ!

गळका घडा

गोपाळ दिवसातून अनेक वेळा नदीवर जायचा आणि दोन घड्यात पाणी भरून आणायचा. एका घड्याला भोक होतं आणि त्यातून पाणी गळायचं. घरी पोचेपर्यंत त्या घड्यात अर्धच पाणी शिल्लक रहायचं.

ज्या घड्याला भोक नव्हतं, तो घडा गर्वानं म्हणायचा, "माझ्याकडे बघ! एक थेंबही पाणी सांडत नाही. सगळच्या सगळं पाणी मी घरी पोचवतो."

भोक असलेल्या घड्याला मग फार वाईट वाटायचं. एक दिवस त्या घड्यानं आपलं दु:ख गोपाळला सांगितलं, "मला माफ कर. तू किती कष्टानं पाणी वाहून नेतोस. पण मी तर त्यातलं अर्धं पाणी वाया घालवतो."



हे ऐकून गोपाळ हसू लागला. भोकवाल्या घड्याकडे प्रेमानं पाहून म्हणाला, "घरी जायच्या आपल्या रस्त्यावर किती सुंदर फुलं आली आहेत, ती तर बघ."

खरंच, रस्त्याच्या बाजूला खूप सुंदर सुंदर फुलं आली होती. भोकाचा घडा आपलं दु:ख विसरून फुलं पाहून खूष झाला. पण घरी पोचल्यावर कमी झालेलं पाणी पाहून त्याला परत पश्चात्ताप होऊ लागला. तो म्हणाला, "सुंदर फुलं पाहून माझं दु:ख विसरलं हे खरं आहे. पण तरीही माझ्यातला दोष मला विसरता येत नाही."

गोपाळ म्हणाला, "मी काय म्हणतोय ते तुला अजून समजलंच नाही! रोज घरी येताना तुझ्यातून जे पाणी गळतं, ते या झाडांना मिळतं म्हणून तर झाडावर अशी छान छान फुलं येतात. मला हवं असतं तर मी एक नवीन घडा विकत आणला नसता का? पण अरे, तुझ्यातलं पाणी पिऊनच तर ही फुलं फुलली आहेत ना! ही फुलं पाहून सगळ्यानाच आनंद होतो. तूच तर हे काम केलं आहेस!"

हे ऐकून भोकाचा घडा हळूच हसला आणि आनंदानं फुलांकडे पाहू लागला.

भारतातील लोककथा



© Katha Jharna 2008

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju

मुंगीची चप्पल




एका जंगलात एक मुंगी रहात होती. ती बाकीच्या सगळ्या मुंग्यांसारखी नव्हती. नेहमी नवीन काही तरी शोधत इकडे तिकडे फिरायची.

एकदा तिनं काही पानं गोळा केली. रात्रभर काम करून तिनं एक चपलेचा जोड तयार केला. सकाळ झाल्यावर तो विकायला ती बाहेर पडली.

वाटेत तिला भेटलं एक माकड. मुंगीनं माकडाला म्हटलं, "माकडदादा, माकडदादा, या चपला विकत घे ना!" माकडानं उत्तर दिलं, "अगं, मला तर चार पाय आहेत, दोनच चपला घेऊन मी काय करू?"

मुंगी परत घरी आली. त्या रात्री पण जागून तिनं आणखी दोन चपला शिवल्या.







सकाळ झाल्यावर ती चारही चपला घेऊन माकडदादाकडे परत गेली. माकडानं चपला हातात घेऊन उलट सुलट करून नीट पहिल्या.

"या चपला तर लहान आहेत. माझ्या पायाला कशा येतील? तुझ्यासारख्या मुंगीलाच त्या ठीक आहेत." असं म्हणून त्यानं चपला घेतल्याच नाहीत.


मग त्या चपला घेऊन मुंगी आपल्या एक मैत्रिणीकडे गेली. "चार चपला घेऊन मी काय करू? तुला माहित नाही का, आपल्यासारख्या मुंग्यांना सहा पाय असतात ते?"

निराश होऊन मुंगी परत घरी आली. तिने आणखी दोन चपला बनवल्या. दुस-या दिवशी सहा चपला घेऊन ती परत आपल्या मैत्रिणीकडे गेली.





तिच्या मैत्रिणीनं सगळ्या चपला घालून पहिल्या आणि म्हणाली, "या तर किती हलक्या आहेत, दोन दिवसांतच फाटून जातील. मला नकोत या चपला. आता एक काम कर. सरळ कोळ्याकडे जा. तो चपला घेईल."




मुंगीला आता खूपच वाईट वाटत होतं. हिंडून हिंडून ती दमून गेली होती. पण तरीही ती कोळ्याच्या घरी गेली.

बाहेरच उभं राहून तिनं कोळ्याला हाक मारली, "कोळीदादा, कोळीदादा!" आत गेली असती तर जाळ्यातच अडकली असती!

मुंगीला पाहून कोळीदादा म्हणाला, "इतकी का दमलेली दिसतेस?" मुंगीनं त्याला सगळी हकीकत सांगितली.








कोळीदादा म्हणाला, "तुझी अडचण दूर करायचा एक उपाय सांगतो, ऐक! तू जा सुरवंटाकडे. त्याला खूप पाय असतात. रोज तो तुझ्याकडून दोन दोन चपला घेईल, आणि तुला कायमचंच गि-हाईक मिळेल."

हे ऐकल्यावर मात्र मुंगी आनंदातच घरी आली.



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole


Artist Uma Krishnaswamy

चित्रकार यांग

ब-याच वर्षांपूर्वी यांग नावाचा एक मुलगा आपल्या मामाकडे रहात असे. त्याचे मामा एक प्रसिद्ध चित्रकार होते. मामा चित्र काढत असतील तेव्हा यांग तासनतास त्यांच्याजवळ बसून रहात असे. ते चित्र कसं काढतात हे तो बारकाईने लक्ष देऊन पहात असे.

त्याला चित्रकलेत गोडी आहे हे मामांच्या लक्षात आलं होतं. मामा त्याला चित्रं काढण्यासाठी प्रोत्साहन देत असत आणि त्याच्याकडे नीट लक्षही देत असत.





एक दिवस मामा म्हणाले, "तू फार छान चित्रं काढतोस. माझ्यापेक्षाही अधिक सुंदर. तुझ्या चित्रांचं गावात एक प्रदर्शन भरवावं असं मला वाटतं. म्हणजे तुझी चित्रकला लोकांपर्यंत पोचेल."

यांगच्या मामांनी सर्वांना आमंत्रण दिलं. यांगची चित्रं पहायला बरेच लोक आले आणि चित्रं पाहून त्यांना आनंद झाला. यांगचं कौतुक करताना लोक म्हणाले, "ही चित्रं तर अगदी जिवंत वाटतात. तू काढलेलं मधमाशांच्या पोळ्याचं आणि फुलांचं चित्र पाहून तर ख-याच मधमाशा येतील. पक्षी देखील फसतील."



एकदा मामा म्हणाले, "माझा एक मित्र दुस-या गावात राहतो, त्याच्याकडे जा आणि त्याला चित्रं दाखवून ये. हा घे त्याचा पत्ता."

यांगला मामांना सोडून जायचं नव्हतं. पण तरीही मामांची आज्ञा म्हणून तो निघाला.

वाटेत त्याला एक मोठं दाट जंगल ओलांडायचं होतं. जंगलातलं वातावरण, झाडं-झुडपं, प्राणी, पक्षी हे सर्व त्याला फारच आवडलं. त्याला अगदी राहवेना. मग इकडे तिकडे जाऊन तो चित्रं काढू लागला. रात्र झाली की तो झाडांवरच्या घरात जाऊन झोपत असे. होता होता बरेच दिवस झाले.



उंचावरच्या या घरांमधून अतिशय सुंदर दृश्य दिसत असे. ते पाहून यांग खूष व्हायचा. निसर्गाची सुंदर चित्रं काढताना एक दिवस त्याला एक डुक्कर दिसलं. त्याचं चित्र काढून त्यात रंग भरून होत होता, इतक्यात अचानक कोणाच्या तरी किंचाळण्याचा आवाज आला. "वाघ! वाघ!" असं ओरडत एक माणूस जोरात पळत आला.

'वाघापासून आता कसं बरं वाचावं?' चटकन यांगला एक युक्ती सुचली. आपण काढलेलं डुकराचं चित्र त्याने झाडाला टेकवून ठेवलं. मग दोघेही तिथून पळत सुटले.

पाठलाग करणा-या वाघाला डुकराचं चित्र दिसलं. त्याचं लक्ष विचलित झालं. त्या चित्राकडे तो टक लावून पाहू लागला आणि त्याच्यावर जोरात गुरगुरायला लागला. तेवढ्यात यांग आणि त्याचा मित्र झाडावरच्या घरात शिरले.

चिनी गोष्ट



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati   V. Vijayakanthi

L. S. Saraswathi   S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju


आदर्श विद्यार्थी





पांडव आणि कौरवांनी आपले गुरू द्रोणाचार्य यांच्याकडून अनेक प्रकारच्या विद्या आणि कला शिकून घेतल्या होत्या. अर्जुनाला धनुर्विद्येची विशेष आवड होती. लवकरच तो धनुर्विद्येत पारंगत झाला.


आपल्या प्राविण्यामुळे अर्जुन लवकरच गुरू द्रोणाचार्यांचा लाडका शिष्य बनला.



दुर्योधनाला आणि त्याच्या भावांना हे मुळीच आवडत नसे. ते नेहमी त्याच्याकडे असूयेने पहात असत.

एक दिवस द्रोणाचार्यांनी आपल्या सगळ्या शिष्यांची परीक्षा घ्यायचं ठरवलं. एक लाकडी पक्षी त्यांनी झाडावर टांगला.

मग त्यांनी सगळ्या शिष्यांना सांगितलं, "झाडावरचा तो पक्षी दिसतो आहे ना? त्याच्या डोळ्याचा बरोबर वेध घेऊन बाण मारायचा आहे." सर्वजण आपले धनुष्यबाण घेऊन तयार झाले.





प्रथम त्यांनी युधिष्ठिराला बोलावलं. तो बाण मारणारच होता, एवढ्यात द्रोणाचार्यांनी विचारलं, "तुला काय काय दिसतं आहे?"

युधिष्ठिरानं उत्तर दिलं, "गुरुजी, तुम्ही दिसताय, झाड दिसतंय, पानं दिसताहेत आणि पक्षी पण दिसतोय."

द्रोणाचार्य म्हणाले, "बाजूला हो! तू नीट वेध घेऊन बाण मारू शकणार नाहीस."

मग त्यांनी दुर्योधनाला बोलावलं. त्यालाही तोच प्रश्न विचारल्यावर दुर्योधनानं मोठ्या गर्वानं उत्तर दिलं, "गुरुवर्य! केवळ तुम्हीच नाही, तर तुमच्या आजूबाजूचे सगळे लोकही मला दिसत आहेत. झाडं, पानं, पक्षी सर्व काही स्पष्ट दिसतंय."

द्रोणाचार्य म्हणाले, "दुर्योधना, तू ही बाजूला हो! तुलाही नीट बाण मारता येणार नाही."



असाच प्रश्न त्यांनी भीम, नकुल, सहदेव आणि इतर सर्व भावांनाही विचारला आणि सर्वांनी अशीच उत्तरं दिली.

अखेर अर्जुनाची पाळी आली. धनुष्य-बाण हातात घेऊन तो तयार झाला. बाकी सर्व काही विसरून पक्ष्याकडे टक लावून पाहू लागला.

गुरूजींनी विचारलं, "अर्जुना, तुला काय काय दिसतंय?"

अर्जुन म्हणाला, "गुरुदेव, मला केवळ पक्ष्याचा डोळा तेवढाच दिसतोय."

अर्जुनाचं संपूर्ण लक्ष पक्ष्यावर केंद्रित झालं आहे हे पाहून द्रोणाचार्यांना आनंद झाला. ते लगेच म्हणाले, "आता तू बाण मारू शकतोस."

वा! बाण थेट पक्ष्याच्या डोळ्यावर अचूकपणे पोचला.

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

हत्तीचं वजन


खूप वर्षांपूर्वी एका गावात एक श्रीमंत माणूस रहात होता. त्यानं आपल्या घरी एक हत्ती पाळला होता.

एक दिवस या श्रीमंत माणसानं आपल्या मित्रांना विचारलं, "माझ्या हत्तीचं वजन किती असेल? तुमच्यापैकी कोणी सांगू शकेल का?"

मित्रांनी वेगवेगळे विचार मांडले. एक म्हणाला, "एवढा मोठा तराजू कुठे मिळणार? मग हत्तीचं वजन कसं करणार?"

"हत्तीचे तुकडे करून त्यांचं वजन करता येईल, पण असं कसं करणार?" दुसरा म्हणाला.






एक लहान मुलगा हे सर्व ऐकत होता. हत्तीचं वजन कसं बरं करता येईल? नदीकाठी बसून तो बरेच दिवस यावरच विचार करत राहिला.

एक दिवस नदीत तरंगत असलेल्या एका बोटीकडे त्याचं लक्ष गेलं. त्याला एकदम एक युक्ती सुचली.

"युक्ती सुचली! युक्ती सुचली!" असं आनंदानं ओरडतच तो श्रीमंत माणसाच्या घरी गेला. "हत्तीला नदीकाठी घेऊन या. मी त्याचं वजन कसं पहायचं ते सांगतो." तो उत्साहानंच म्हणाला.

हत्तीला नदीकाठी आणण्यात आलं. मुलानं त्याला नावेत चढवायला सांगितलं.

हत्ती नावेत चढल्यावर नाव हिंदकळू लागली. हत्तीच्या वजनानं नाव पाण्यात थोडी अधिक खाली गेली. नावेचा जेवढा भाग पाण्यात बुडला होता, तिथपर्यंत मुलानं काळ्या रंगानं एक खूण केली.





त्यानंतर हत्तीला नदीच्या काठावर आणून नावेतून उतरवलं. काही लोकांच्या मदतीनं त्यानं नावेत मोठमोठे खडक ठेवायला सुरुवात केली. जसजसे मोठाले दगड ठेवण्यात आले, तसतशी नाव पाण्यात खाली खाली जाऊ लागली. पाणी जेव्हा नावेवरच्या काळ्या खुणेपर्यंत पोचलं, तेव्हा त्यानं आणखी दगड ठेवणं बंद करायला सांगितलं.

मुलगा म्हणाला, "नावेतल्या दगडांचं आणि हत्तीचं वजन आता एकसारखं झालं! आता या दगडांचं वजन करा. त्यावरून हत्तीचं वजन समजेल.

मुलाच्या हुशारीचं सर्वांनी खूप कौतुक केलं.



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju

न संपणारी गोष्ट

ब-याच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एक होता राजा. त्याला गोष्टी ऐकायला फार आवडत असे. एक दिवस त्यानं जाहीर केलं की, "जो मला सर्वांत मोठी, लांबलचक गोष्ट सांगेल, त्याला मी एक हजार सोन्याच्या मोहरा बक्षीस देईन."

ते ऐकून राजाला गोष्टी सांगायला बरेच लोक आले. एका माणसाची गोष्ट संपायला एक आठवडा लागला. दुस-याची गोष्ट दहा दिवस चालू होती. तिस-याची गोष्ट एका महिन्याने संपली.

या गोष्टी ऐकल्यावर राजा म्हणायचा, "तुम्ही सांगितलेली गोष्ट इतकी काही मोठी नव्हती." आणि त्यांना बक्षीस न देताच परत पाठवून द्यायचा.

एका हुशार कथाकाराच्या कानावर जेव्हा ही गोष्ट आली, तेव्हा काहीही करून राजाकडून बक्षीस मिळवायचंच असा त्यानं निश्चय केला.

तो राजाकडे आला, आणि म्हणाला, "महाराज, मला एक खूप मोठी गोष्ट येते. ती सांगण्यात माझा पूर्ण जन्म जाईल."



राजा हे ऐकून उत्साहानेच म्हणाला, "असं असेल, तर मग सुरू कर तुझी गोष्ट!" पण गोष्ट सांगणा-यानं म्हटलं, "पण माझी एक अट आहे. गोष्ट ऐकताना तुम्ही 'पुढे...' 'पुढे...' असं विचारत रहायचं."

राजानं ही अट लगेच मान्य केली. आणि गोष्ट सांगणा-यानं आपली गोष्ट सुरू केली.

"एका देशात एका वर्षी खूप पाऊस झाला. छान पीक आलं. पहावं तिकडे धान्याचे डोंगर दिसू लागले.


ते पाहून त्या देशाच्या प्रधानाने आदेश दिला, "एक मोठं कोठार बांधा. आणि हे सर्व धान्य त्यात नीट सांभाळून ठेवा. म्हणजे दुष्काळ पडला, तरी आपल्याला काळजी करावी लागणार नाही."

या आज्ञेप्रमाणे एक मोठं कोठार बांधलं गेलं. इतकं मोठं कोठार कुठल्याच देशात नव्हतं. हे कोठार पहायला दूरवरून लोक येऊ लागले.

या कोठारात हवा खेळण्यासाठी एक लहानसा झरोका ठेवला होता. एक दिवस एक चिमणी या गोदामाच्या भोवती उडत होती. तिला हा लहानसा झरोका दिसला. भुर्रकन उडून ती गोदामात गेली.

तिनं धान्याचा एक दाणा घेतला आणि बाहेर आली. तो दाणा तिनं आपल्या घरट्यात नेऊन ठेवला." एवढी गोष्ट झाल्यावर गोष्ट सांगणारा थांबला. "पुढे...?" राजानं विचारलं.





चिमणी उडत उडत आली आणि परत कोठारात गेली. आपल्या चोचीत तिनं आणखी एक दाणा घेतला आणि आपल्या घरट्यात नेऊन ठेवला." गोष्ट सांगणा-यानं गोष्ट पुढे नेली.

"पुढे...?" राजानं विचारलं.

दरवेळी "चिमणी आली, एक दाणा घेतला आणि भुर्रकन उडून तो आपल्या घरट्यात ठेवून परत आली." अशी गोष्ट चालूच राहिली.

आता राजाचा धीर संपू लागला, त्यानं विचार केला, 'चिमणी कोठारातला एक एक दाणा घेऊन गेली हे ऐकण्यात माझं सगळं आयुष्य संपून जाईल. पण कोठारातलं धान्य काही संपणार नाही. ही गोष्ट ऐकता ऐकता मला तर वेडच लागेल. अरे देवा! आता या गोष्ट सांगणा-यापासून कशी तरी सुटका करून घेतली पाहिजे!'

राजाने लगेच आज्ञा दिली, "या गोष्ट सांगणा-याला एक हजार सोन्याच्या मोहरा देऊन टाका!" मगच राजानं सुटकेचा श्वास सोडला.



भारतातील लोककथा

P. Saraswati | V. Vijayakanthi
L. S. Saraswathi | S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist S. P. Raju

नंदू आणि मगर

नंदू नावाचं एक धाडसी माकड होतं. कठीण कामं देखील नंदू धीटपणे करत असे. मनाला येईल तसा तो एकटाच जंगलात फिरायचा.

एक दिवस फिरत फिरत तो नदीपाशी जाऊन पोचला. नदीत एक बेट होतं. त्या बेटावरच्या झाडांना खूप आंबे लागले होते.

काहीही करून नंदूला त्या बेटावर जायचं होतं. पण नदी खूपच मोठी होती. 'या बेटावर कसं बरं जावं?' असा तो विचार करायला लागला. तेवढ्यात त्याला नदीत एक मोठा खडक दिसला.




नंदूने एक मोठी उडी मारली आणि तो त्या खडकावर पोचला. मग तिथून आणखी एक उडी मारली आणि तो थेट बेटावरच पोचला. खरं तर हे फारच धोक्याचं होतं! पण नंदू काही कमी धाडसी नव्हता!

नंदूनं बेटावरचे मनसोक्त आंबे खाल्ले आणि मजेत फिरून झाल्यावर खडकावर परत एकदा उडी मारून गेला होता तसाच तो परत घरी आला. त्यानं आपल्या आई-बाबांना या बेटाबद्दला सांगितलं. आपल्या मित्रांना तर त्यानं आपल्याबरोबर बेटावर यायचं आमंत्रण देखील दिलं.

"बेट फार दूर आहे. आम्ही नाही येणार" असं म्हणून मित्र त्याच्याबरोबर यायला तयार नव्हते. भूक लागली की नंदू एकटाच बेटावर जायचा.

नंदू असा बेटावर ये-जा करतो हे एक मगर फार लक्ष देऊन पहात असे. तिनं विचार केला, 'काहीही करून या माकडाला पकडून खायला हवं.'

पावसाचे दिवस होते. नदीचं पाणी बरंच वाढलं होतं. नदीतला खडक बराच पाण्याखाली गेला होता. एक दिवस नंदू बेटावरून परत यायला निघाला तेव्हा खडकाचा अगदी थोडासाच भाग दिसत होता.




नंदू काळजीपूर्वक खडकावर उडी मारण्याच्या बेतातच होता पण तो एकदम थांबला. "असं कसं झालं? खडक तर आता पहिल्यापेक्षा अचानक मोठा कसा काय झाला? यात नक्कीच काही तरी धोका असणार!" थोडा विचार केल्यावर त्याला एक युक्ती सुचली.



नंदूनं मोठ्यानं विचारलं, "खडकदादा, तू ठीक आहेस ना?" पण काहीच उत्तर आलं नाही. नंदूनं परत मोठ्यानं विचारलं, "आज तू बोलत का नाहीस?"

खडकावर झोपलेल्या मगरीला वाटलं, 'हा खडक बहुधा रोज या माकडाशी बोलत असेल.'

"अरे दादा, तू काय म्हणत होतास?" मगरीनं विचारलं. तिचं डोकं आणि शेपूट पाण्यात लपलेले होते. नंदूला मगरीची युक्ती समजली. तो म्हणाला, "तू मगर आहेस ना? तुला काय हवंय?"




मगरीनं रागावूनच उत्तर दिलं, "मी तुला खाणार आहे." नंदू विचारात पडला, 'आता या मगरीपासून सुटका कशी करून घ्यावी?' मग त्याला एक उपाय सुचला.

तो म्हणाला, "मगरताई, एवढंच ना? तू तुझं तोंड जितकं मोठं उघडता येईल, तितकं उघड. मी सरळ तुझ्या तोंडातच उडी मारेन. पण तू डोळे मात्र अगदी घट्ट मिटून घे. माझी उडी जर चुकली, तर तुझ्या डोळ्यांना लागेल ना."

मूर्ख मगरीनं आपले डोळे घट्ट मिटून घेतले आणि तोंड उघडून वाट पाहू लागली. नंदूनं नीट लक्ष देऊन बरोबर मगरीच्या पाठीवर उडी मारली आणि दुस-याच उडीत पलीकडच्या किना-यावर पोचला.

"मगरताई, तू मला कधीच पकडू शकणार नाहीस!" आणि नंदू हसतच पळून गेला.


जातक कथा




P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy






ससुल्या आणि फुलनचं भांडण



ससुल्या नावाचा ससा गुलाबी रंगाच्या गुलाबांच्या ताटव्यात काय शोधत होता कोण जाणे. त्याचे बाहेरून पांढरे असणारे लांब लांब कान आतल्या बाजूने चांगले गुलाबी होते आणि फुलांच्या पाकळ्यांसारखेच दिसत होते.

तेवढ्यात फुलन नावाचं एक फुलपाखरू तिथे आलं. ससुल्याचे कान म्हणजे छान फुलं आहेत असंच तिला वाटलं. ती त्या गुलाबी रंगाच्या कानांवर जाऊन बसली. पण तिथे बसल्यावर तिच्या लक्षात आलं की ही काही फुलं नाहीत. त्यांना गुलाबांचा वास देखील नाही.





तिनं ठरवलं की आता इथून उडूनच जायला हवं. पण तिला उडताच येईना. ससुल्याच्या पातळ मऊ मऊ कानांत तिचे पंख अडकूनच बसले होते. त्यामुळे ससुल्याचे कानही खाजायला लागले म्हणून तो देखील चिडला होता.

"हे कोण आलंय माझ्या कानांत?" ससुल्यानं विचारलं.

"मी आहे फुलन फुलपाखरू" फुलननं उत्तर दिलं.

"फुलन, तू माझ्या कानातनं बाहेर निघ पाहू," ससुल्या ओरडला.

"तू आधी माझे पंख सोड," फुलन म्हणाली.

"फुलन, तू जा बघू"

"माझे पंख सोड"

"मी म्हणतो, जा पाहू"

"मी म्हणते, पंख सोड"

"जा जा"

"पंख सोड"

"ऐकू येत नाही का?"

"माझं ऐकत का नाहीस?"

"तू का नाही ऐकत?"

"तू का नाही ऐकत?"

"तूच ऐक"

"तूच ऐक"

दोघे भांडू लागले. आजूबाजूचे पक्षी, माकडं सगळे एकत्र जमले. बघता बघता कुकू कोंबडा आणि बदक पण आलं. "काय झालं? काय झालं?" सगळे विचारू लागले.

"फुलन जातच नाही" ससुल्यानं सांगितलं.

"पण हा माझे पंख सोडतच नाही," फुलन रागावून म्हणाली.

"तुला जायचंय का?" कुकूनं विचारलं.

"हो" फुलन म्हणाली.


कुकूनं ससुल्याला विचारलं, "तुलाही तेच हवंय ना?"


त्यानंही मान डोलावली. कुकूनं विचार केला, दोघांनाही तेच तर हवं आहे. पण हे होणार कसं? कुकू ससुल्याच्या दुस-या कानाशी गेला, आणि जोरात ओरडला, "कुकूचकूsss... कुकूचकूsss"



त्या आवाजानं ससुल्याच्या दोन्ही कानात चांगल्याच झिणझिण्या आल्या आणि ते जोरात हलू लागले. त्याबरोबर फुलनचे अडकलेले पंख मोकळे झाले!

आणि लगेच ती गुलाबावर जाऊन बसली.





"आता कशी गेली!" ससुल्या आनंदानं म्हणाला.

"आता कसं सोडलं!" फुलन म्हणाली.

"तुमच्या दोघांच्या मनासारखं झालं ना?"

दोघांनी खूष होऊन मान डोलावली. तशी कुकू परत म्हणाला, "कुकूचकूsss..."

यावर सगळेच खूष होऊन हसू लागले आणि आनंदानं आपापल्या कामाला निघून गेले.

त्रिपुरारी शर्मा



P. Saraswati V. Vijayakanthi


L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

ओळखा पाहू



स्वच्छ आणि सुंदर आहे, पण उगवतं मात्र चिखलात
पाण्यात राहतं, पण भिजत नाही त्यात.

काटेरी फांदीवर उमलतं हे सुंदर फूल
प्रेमानं याची देवाण-घेवाण, त्यात नाही भूल.

सूर्याला पाहून उमलतं, मोठं तोंड, मोठ्या पाकळ्या
रंग आहे याचा पिवळा.

हिरव्या वेलीवर गुच्छ जणू मोत्यांचे
उमलले की घेतात मन मोहून सा-यांचे.

शेंदरी रंगाचं फूल, पाकळ्या त्याच्या लहान
दस-याला आणि स्वागताला बनते त्याची माळ.

लांब दांडीवर लहान लहान फुले
रंग त्यांचा पांढरा, नाहीत त्याला काटे
एकटा असला तरी दरवळतो 'निशे'ला त्याचा 'गंध'

सूर्यफूल, गुलाब, निशिगंध, झेंडू, कमळ आणि चमेली



सुंदर काळा रंग माझा
आहे मी लाजरी बुजरी
फिरते मधुर गीत गात
आनंदाने वसंतात.

पक्षासारखे पंख आहेत, पण आवडतं त्याला पोहायला,
पाण्यात डुबकी मारायला, आणि मासे सगळे खायला.

महालात राहतो, पण राजा नाही
दाणे वेचायला कुठेही जातो, पण नाही पाहुणा कुणाचा
राहतो देवळात आणि मशिदीत, पण नाही भक्त कुणाचा.

पहाटेच उठवून सा-यांना, करू देत नाही आळस कुणाला
कुकूचकूsss करून झालं की दाणे खायला हा मोकळा.






लांब मान, डोक्यावर मुकुट,
चमचमतं याचं शरीर
पंखांवर डोळे हजार,
रूप याचं मनोहर.

काळे कपडे घालून, असतो कामात दंग
एकाला बोलावलं, तरी येतात सगळे मिळून.



दोन पाय याचे लांब, दौड आहे घोड्यासारखी
पंख आहेत पण उडत नाही, पहा त्याचा वेश.


रात्री उठतो, दिवसा झोपतो, अंधारातच शिकार करतो,
झाडाच्या ढोलीत राहतो, डोळे गोल गरगर फिरवतो.



हिरवा गार रंग याचा, गळ्यात माळ लाल
तुमच्या बोलण्याची नक्कल करतो
घरात आणि जंगलात राहतो.



काड्या काटक्या गोळा करते
त्यांचं सुंदर घरटं विणते
डोलत डोलत त्यात झोपते



चोच आहे वाकडी, डोळे तिचे तीक्ष्ण
आकाशात उडते उंचच उंच
पण खाली काही दिसलं
की झटकन घेते खाली झेप

एका पायावर उभा राहतो
खूप मासे पकडून खातो.

पंखांवर पांढरे ठिपके, चोच माझी पिवळी
तुमची नक्कल केलेली बघून थक्क व्हाल तुम्ही.

घार, मोर, कोकिळा, पोपट, कबुतर, कावळा, मैना,
कोंबडा, घुबड, शहामृग, बगळा, बदक, सुगरण


P. Saraswati
V. Vijayakanthi
L. S. Saraswathi
S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

पलीकडे जाऊ की नको

एक हिरवागार डोंगर होता. त्याच्यावर एक घोडी आणि तिचं शिंगरू रहात होते. शिंगरू नेहमी आईच्या अवती भवती फिरत असायचं. तिला सोडून ते कधीच दूर जात नसे.

एक दिवस घोडीनं शिंगराला सांगितलं, "बाळा, तू असा मला सारखा चिकटून का राहतोस? आता तू मोठा झाला आहेस. काम करायला कधी शिकणार?"




शिंगरू म्हणालं, "मला सांग ना काहीतरी काम. मी तर तयारच आहे."

घोडी म्हणाली, "असं! चला तर मग आताच सुरुवात करूया. हे धान्याचं पोतं गिरणीत घेऊन जा बघू."

छोटं शिंगरू उत्साहानं कामाला लागलं. धान्याचं पोतं पाठीवर घेतलं आणि मजेत गिरणीकडे जायला लागलं.

थोड्या अंतरावर गेल्यावर ते अचानकच थांबलं. "अरे! ही तर नदी आहे. यातनं पाणी वाहतंय. ती ओलांडून पलीकडे जाऊ की नको?" त्याला काहीच सुचेना. तो इकडे तिकडे पाहू लागला तर त्याला दिसला एक बैल. तो आरामात चारा खात होता. छोट्या घोड्यानं त्याला विचारलं, "बैलकाका, बैलकाका, मी नदीतून पलीकडे जाऊ का?"





"अरे, पाहतोयस ना! पाणी तर माझ्या गुडघ्याइतकं देखील नाही. तुला त्यातून सहज पलीकडे जाता येईल."

शिंगराला आता धीर आला. तो नदीकडे जाऊ लागला. "अरे, थांब! थांब! घाई करू नकोस." कुठून तरी आवाज आला.

"कोण आहे?" शिंगरानं मान वर करून पाहिलं. झाडाच्या एका फांदीवर खारूताई बसली होती. ती म्हणाली, "त्या बैलावर मुळीच विश्वास ठेवू नकोस. नदी खूप खोल आहे. काल माझा एक मित्र त्या नदीच्या पाण्यात वाहून गेला."

'नदी खोल आहे की नाही?' छोट्या घोड्याला काहीच कळेना. 'घरी जाऊन आईलाच विचारून येऊया,' असा विचार करतच शिंगरू परत आईकडे आलं. त्याला परत आलेला पाहून आईला आश्चर्य वाटलं.


आईनं विचारलं, "हे काय! इतक्या लवकर कसा परत आलास?" शिंगरानं उत्तर दिलं, "रस्त्यात एक नदी होती. आई, ती खूप खोल आहे का गं?" आईनं विचारलं, "हे तुला कुणी सांगितलं? मी तर दिवसातून किती तरी वेळा तिथून जाते."


छोटा घोडा म्हणाला, "पण ऐक तर खरं. बैलकाका म्हणाले की मला तिथून पलीकडे जाता येईल, पण खारूताई म्हणाली की मी पाण्यात वाहून जाईन. मग मी करायचं तरी काय?"

आई हसली आणि म्हणाली, "बैलकाका किती उंच आहेत आणि खारूताई किती उंच आहेत ते तूच पहा. तुझी आणि खारुताईची जरा तुलना करून बघ, म्हणजे तुलाच कळेल की तुला नदी ओलांडता येईल की नाही ते."

"हो. आता कळलं. नदी माझ्यासाठी खोल नाही."

छोटा घोडा मग आनंदानं परत नदीकडे जायला निघाला.





चिनी गोष्ट

© Katha Jharna 2008

P. Saraswati V. Vijayakanthi


L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

मांजरीची पिल्लं




रिया आणि इव्हान यांनी एक मांजरी पाळली होती. एक दिवस ती कुठेच दिसेना. खूप शोधून सुद्धा सापडली नाही. तीन दिवस असेच निघून गेले. चौथ्या दिवशी...

"म्यांsssव म्यांsssव म्यांsssव " असा आवाज आला.

"आवाज कुठून बरं येतोय?" रियानं जिन्यावरून जाऊन पाहिलं.

"इव्हान, अरे आपली मांजरी गच्चीवर आहे. तिच्याबरोबर तिची पिल्लं पण आहेत. लवकर ये!" रियानं ओरडून सांगितलं.



इव्हान पण लगेच वर चढून आला. मांजरी एका टोपलीत झोपली होती आणि तिच्याजवळ पाच छोटी पिल्लं तिला चिकटून झोपली होती.

रिया आणि इव्हान आता फारच खूष होते. जो कोणी घरी येईल त्यांना ते गर्वानं मांजरीची पिल्लं दाखवायचे.

पिल्लं हळू हळू मोठी होऊ लागली. ती इकडे तिकडे फिरायला लागली. एकमेकांच्या अंगावर चढून, जमिनीवर लोळून खेळायची. मडक्यात, भांड्यात शिरून ती पाडून टाकायची.

रिया आणि इव्हाननी पिवळसर रंगाचं एक पिल्लू आपल्याजवळ ठेवलं आणि त्याचं नाव ठेवलं 'पुसी'. उरलेली चार पिल्लं त्यांनी आपल्या मित्रांना दिली. ते पुसीला खायला द्यायचे. पुसीशी खेळता खेळता वेळ कसा निघून जायचा हे त्यांना कळायचंही नाही. ती त्यांच्याबरोबरच झोपायची.

एक दिवस रिया आणि इव्हान तिला आपल्याबरोबर बाहेर घेऊन गेले. जवळच वाळलेल्या गवताचा एक ढीग पडला होता. वाऱ्यानं गवत हलत होतं. ते पकडण्यासाठी पुसी उड्या मारत पळू लागली. ते पाहून सगळी मुलं हसू लागली. थोड्या वेळाने मुलं आपल्या खेळात रमली आणि पुसीला विसरून गेली.

अंधार झाल्यावर मुलं घरी जायला निघाली तेव्हा त्यांनी पुसीला हाका मारल्या. पण ती कुठेच दिसेना. दोन्ही मुलं मग रडतच घरी आली.

रात्र झाल्यावर दोघेही पुस्तक हातात घेऊन वाचायचा प्रयत्न करत होते, पण त्यांचं लक्षच लागत नव्हतं. मनात वेगळेच विचार येत होते. 'बिचारी! आता तिला दूध कोण देईल? थंडीत ती कुठे झोपेल?' दोघंही तिच्याबद्दलच बोलत होते.



अचानक कोप-यात ठेवलेली टोपी हलायला लागली. दोघंही चांगलेच घाबरले आणि दुस-या खोलीत पळून गेले. "आई, आई, ही बघ टोपी आपल्या आपणच चालतेय!" दोघेही ओरडू लागले. काय झालं ते पहायला आई पळतच आली. टोपीच्या बाहेर आलेली पिवळसर रंगाची शेपूट पाहून तिला हसूच आलं!

"अरे! ही तर आपली पुसीच आहे. इथे लपली होतीस काय? आम्ही तर तुला कुठे कुठे शोधत होतो" असं म्हणून मुलांनी तिला उचलून घेतलं आणि प्रेमानं तिला कुरवाळू लागले.

रशियातील गोष्ट



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist S. P. Raju

जादूचा ढोल

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. जपानमध्ये जेनकोरा नावाचा एक मुलगा रहात होता. त्याच्याकडे एक जादूचा ढोल होता.

"लांब नाक, लांब नाक" असं म्हणून त्यानं ढोलाची एक बाजू वाजवली, की नाक लांब व्हायचं आणि "लहान नाक, लहान नाक" असं म्हणून दुस-या बाजूनं ढोल वाजवला की नाक लहान व्हायचं.

ज्याला कोणाला आपलं नाक लहान किंवा मोठं करून घ्यायचं असेल, तो जेनकोराकडे जायचा. मग त्याला हवं असेल तसा ढोल वाजवून जेनकोरा त्याचं काम करून द्यायचा.




एक दिवस त्यानं विचार केला, 'बघू तर खरं, मी जादूचा ढोल वाजवून माझं नाक किती लांब करू शकतो.'

तो एक मैदानात गेला आणि जोरजोरात ढोल वाजवू लागला. त्याचं नाक इतकं लांब झालं की त्याला सरळ उभं देखील राहता येईना. त्याला जमिनीवर झोपावं लागलं, पण तरीही तो ढोल वाजवतच राहिला.



हळू हळू त्याचं नाक झाडाइतकं झालं. थोड्या वेळानं ते डोंगरापेक्षाही उंच झालं. आणि पाहता पाहता ते आकाशापर्यंत जाऊन पोचलं. त्याच वेळेस आकाशात काही सुतार एक पूल तयार करत होते. त्यांनी जेनकोराच्या नाकाचं टोक आपल्याला हवं तसं वळवून पुलाला जोडलं आणि खिळे मारून टाकले.

आपल्या नाकाच्या टोकाला काही तरी होतंय असं जेनकोराच्या लक्षात आलं. आता ढोल वाजवून त्याला आपलं नाक आणखी लांब करता येईना. मग त्यानं आपल्या नाकाची लांबी कमी करावी असा विचार केला आणि ढोलाची दुसरी बाजू वाजवायला सुरुवात केली.




थोड्या वेळाने त्याच्या नाकाची लांबी कमी व्हायला लागली. पण नाकाचं टोक तर खिळ्यानं जखडून ठेवलं होतं. नाकाची लांबी जशी जशी कमी होऊ लागली, तसा तसा जेनकोरा आकाशात वरवर जाऊ लागला. तिथे गेल्यावर त्याच्या लक्षात आलं की त्याच्या नाकाचं टोक खिळ्यानं पुलाला जोडलंय.

त्यानं तो खिळा काढून टाकला. पण हे काय! तो आकाशातून खाली पडायला लागला. बरं तर बरं, की तो एका तळ्यात पडला.

थोड्या वेळानं सावध झाल्यावर तो पोहायला लागला. हळू हळू त्याचे हात, पाय, शरीर माशासारखे झाले आणि तो मासाच झाला. तेव्हापासून सगळे म्हणायला लागले की या तळ्यातले सगळे मासे जेनकोराचे नातेवाईक आहेत.

जपानी लोककथा



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

कवी कवन्नम

कवन्नम नेहमी आपल्या स्वप्नांच्या जगात हरवलेला असायचा. तासनतास तो खिडकीतून बाहेर बघत बसायचा. "तू काय करतो आहेस?" असं कुणी विचारलं, तर तो म्हणायचा, "मी कविता करतोय."

"मुन्नाला लागली भूक

त्यानं खाल्ला ऊस"

"पानं उडतात फड फड फड

विजा चमकतात कड कड कड"

असा तो शब्दांशी खेळत कविता करत बसायचा. त्याचे मित्र त्याची नेहमी चेष्टा करायचे, "अरे बघा, बघा, कविराज कवन्नम येताहेत!"



एक दिवस तो आपल्या आजीच्या गावाला जायला निघाला. रस्त्यात सगळीकडे छान छान झाडं, फुलं, पक्षी दिसत होते. ते सगळं पहात पहात तो आपल्याच नादात जात होता.

खिशातले चणे-फुटाणे खात खात तो आजूबाजूची मजा बघत चालत होता. समोर त्याला दिसलं एक ताडाचं झाड. ते पाहून तो लगेच गाऊ लागला:

"लांब दोन पाय त्याचे
उभे आहेत खांबासारखे."

थोडं पुढे गेल्यावर त्याला दिसलं एक घुबड. तो परत गाऊ लागला:

"घुबड डोळे असं फिरवतंय
जणू त्याला सगळंच दिसतंय."



कवन्नम आता खुशीत येऊन जोरजोरात गातच पुढे निघाला. थोड्या अंतरावर एक कुत्रा माती उकरत होता. कवन्नमला अगोदर तो कोल्हा आहे असंच वाटलं. तो परत गाऊ लागला:

"हा का असा खड्डा खोद्तोय
त्यात असं लपवलंय काय."

कवन्नम आपल्या कवितांवर फारच खूष झाला!

"लांब दोन पाय त्याचे
उभे आहेत खांबासारखे.
घुबड डोळे असं फिरवतंय
जणू त्याला सगळंच दिसतंय.
हा का असा खड्डा खोद्तोय
त्यात असं लपवलंय काय."

असं गात गातच तो आपल्या आजीच्या घरी पोचला, तोपर्यंत चांगला अंधार पडला होता. अरे! पण हे काय? आजीच्या घराला तर कुलूप होतं. त्याची फारच निराशा झाली. जवळच एक पडकं घर होतं. त्याच्या बाहेरच्या ओट्यावर कवन्नमला झोप लागली.

अर्ध्या रात्रीत कसला तरी आवाज आला आणि तो एकदम दचकून जागा झाला. त्यानं हळूच खिडकीतून डोकावून पाहिलं, तर त्याला दोन लांब पाय दिसले. अर्धवट झोपेत त्याला ते ताडाच्या झाडासारखेच दिसले. म्हणून तो गाऊ लागला,

"लांब दोन पाय त्याचे
उभे आहेत खांबासारखे."

हे गाणं ऐकून चोर घाबरला आणि चारी बाजूला नजर फिरवून कोणी दिसतंय का ते पाहू लागला. ते पाहून कवन्नम गायला लागला,

"घुबड डोळे असं फिरवतंय
जणू त्याला सगळंच दिसतंय."



'कोणी तरी येतंय वाटतं. मग आपला चोरीचा माल लपवून ठेवायला हवा' असा विचार करून चोर एक खड्डा खोदायला लागला. आता कवन्नम गाऊ लागला,

" हा का असा खड्डा खोद्तोय

त्यात असं लपवलंय काय."

आता मात्र चोर चांगलाच घाबरला. सगळं सामान तिथेच टाकून पळायला लागला.

"चोर! चोर!" असं कवन्नम ओरडायला लागला. ते ऐकून आजूबाजूचे लोक पळत आले आणि त्यांनी चोराला पकडलं. लोकांनी कवन्नमचं खूप कौतुक केलं. त्या दिवसापासून सगळे लोक कवी कवन्नमची गाणी आनंदानं गाऊ लागले.

तामिळनाडूतील गोष्ट




Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju




हे कोण येतंय


41

कर्र...कर्र...कर्र...कर्र...

हा कशाचा आवाज येतोय? घुबडानं आपले कान टवकारले. आपले मोठे मोठे डोळे फिरवून तो चहूकडे पाहू लागला.

आवाज ऐकून ससाही दचकला आणि बिळात जाऊन लपला. मग हळूच आपलं डोकं बाहेर काढून पाहू लागला.





सापानं देखील आवाज ऐकला. त्यानं लगेच मान वर करून फणा उभारला.

कर्र...कर्र...कर्र...कर्र....


हळू हळू आवाज जवळ येत होता.

सरड्यानं पण आवाज ऐकला.




धोक्याच्या वेळी तो तर मोठीच चपळाई करून लपतो. त्यानं लगेच आपला रंग बदलला आणि झाडाच्या पानासारखा दिसू लागला.

फुलपाखरानं आपले पंख झटकले आणि चटकन मिटून घेतले. ते फुलावर जाऊन बसलं आणि फुलाच्या पाकळीसारखंच दिसू लागलं.




हळू हळू सरपटत येणारी गोगलगाय पण थांबली आणि आपल्या कवचात जाऊन गुरफटून बसली. आजूबाजूच्या दगडात जाऊन बसल्यावर ती ओळखूच येईना.






कर्र...कर्र...कर्र...कर्र...

साळूच्या अंगावरचे काटे भीतीने थरारून उभे राहिले. काटे पसरवून ती हल्ला करायला तयार होऊन बसली.



जमिनीवरून चालत निघालेला खेकडा लगेच आपल्या बिळात जाऊन लपला.



नदीच्या किना-यावर डरांऽव डरांऽव करत बसलेल्या बेडकानं देखील आवाज ऐकला आणि झटकन उडी मारून तो पाण्यात गेला.


कर्र... कर्र... कर्र...

आवाज आता खूपच जवळ यायला लागला होता. ज्या दिशेनं आवाज येत होता तिकडे सगळे माना वळवून पाहू लागले.

कोण बरं येतंय या वळणावरून?

'अरे! ही तर आपली गोम!' तिच्या प्रत्येक पायात एक चप्पल होती!

वा! काय ही रुबाबदार गोम आणि किती रुबाबदार तिची चाल!



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

हत्ती आणि मुंगीची शर्यत

उन्हाळ्याचे दिवस होते. हत्तीनं तलावात खूप डुंबून घेतलं. जेव्हा तो घरी जायला निघाला तेव्हा वाटेत त्याला शेकडो मुंग्या दिसल्या. त्यांना पाहून हत्तीला खूप राग आला, आणि तो म्हणाला, "तुम्ही सगळ्यांनी मला पाहिल्यावर सलाम का नाही केला?"




"माफ करा महाराज, आम्ही कामात होतो. तुम्हाला पाहिलंच नाही" एका लहानशा मुंगीनं उत्तर दिलं. "काम म्हणे! फालतू किडा! तुला कसलं गं काम येतं?" हत्तीनं विचारलं.

"आम्ही लहान आहोत, पण फालतू नाही हं" एका धीट मुंगीनं पुढे येऊन उत्तर दिलं. हे ऐकून हत्ती आणखीच रागावला. "एवढी हिम्मत! तू लहान आहेस आणि बिनकामाची! माझ्याकडे बघ, माझ्यात बघ केवढी ताकद आहे!"



मुंगी थोडीच हे ऐकून घेणार! "आम्ही तुमच्यापेक्षा मुळीच कमी नाही. तुम्हाला जे करता येतं ते सगळं आम्हालाही येतं."



हत्तीनं गर्वानं मुंगीकडे पाहिलं. ती त्याच्या पायावरच्या एका केसापेक्षाही लहान होती. "तू माझ्याबरोबर पळण्याच्या शर्यतीत भाग घेशील का?" हत्तीनं तिला आव्हान देत विचारलं.

"हो तर! शर्यतीत मी तुम्हाला हरवूनच दाखवते!" छोटीशी मुंगी आत्मविश्वासानं म्हणाली. हत्ती रागानं किंचाळला, "मूर्ख कुठली! माझा एक पाय ओलांडायला तुला किती वर्षं लागतील! चल, तुला चांगलाच धडा शिकवतो!"


शर्यत सुरू झाली. थोडं अंतर गेल्यावर हत्तीनं खाली पाहिलं. "अगं मुंगे, तू अजून पळतेच आहेस वाटतं." हत्तीनं आश्चर्य वाटून म्हटलं.

हत्ती आणखी काही अंतर पळत गेला. मुंगी त्याच्याशेजारून पळतच होती. हत्ती आणखी जोरात पळू लागला. खूप डोंगर आणि खडकाळ रस्ते त्याने ओलांडले. जेव्हा जेव्हा तो खाली पहायचा, तेव्हा मुंगी त्याच्या शेजारी पळतच असायची.





हत्ती आता थकू लागला. त्याला दम लागत होता. त्याला आता शर्यत थांबवायची होती, पण मुंगी सतत शेजारी होतीच. 'मी हरलो असं कसं मान्य करू?' असा विचार करून मग हत्ती परत पळायला लागायचा.

आवाज ऐकून बरेच प्राणी बाहेर आले आणि मजा पाहू लागले. "शाबास मुंगी! अजून जोरात चल!“
ते मुंगीला प्रोत्साहन देऊ लागले.



हा आवाज ऐकून हत्ती अधिकच रागावला. तो रागातच पळू लागला आणि एका खड्ड्यात जाऊन पडला.






सगळे प्राणी वरून पहात होते. मुंगी पण तिथेच उभी होती. "बिच्चारा हत्ती! शर्यत हरला! आता तू बाहेर कसा येणार? मी तर काही तुला बाहेर काढणार नाही!" आणि मुंगी हसत हसत निघून गेली.

बाकीच्या प्राण्यांना हत्तीची दया आली. त्यांनी त्याला बाहेर पडायला मदत केली. मग हत्तीनंही त्यांना त्रास देणार नाही असं कबूल केलं.

जाता जाता हत्तीनं माकडाला विचारलं, "मला सांग, मुंगी कशी काय शर्यत जिंकली?"

माकड म्हणालं, "अरे वेड्या, मुंग्या तर सगळीकडेच असतात की. दर वेळेस तुझ्या शेजारी वेगळीच मुंगी होती. जिनं तुला शर्यत लावायला सांगितलं होतं, ती तर तुझ्याबरोबर आलीच नव्हती!"

शोभिता पुंज यांच्या
लोककथेवर आधारीत



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi


Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

चांदोबा रात्रीच का बाहेर पडतो?

खूप खूप वर्षांपुर्वीची गोष्ट आहे. एक दिवस चांदोबानं सूर्याकडे नीट निरखून पाहिलं आणि म्हणाला, 'अरे वा! हा सूर्य तर माझ्याहून किती मोठा आहे आणि किती तेजस्वी देखील!' चांदोबानं झोपलेल्या घुबडाला उठवलं आणि विचारलं, "सूर्य आपला प्रकाश कुठे लपवून ठेवतो हे शोधून मला सांगशील का?

घुबड म्हणालं, "हो, शोधतो की!" चांदोबा हे ऐकून खूष झाला. त्यानं हळूच घुबडाच्या कानात सांगितलं, "धन्यवाद, घुबडदादा. उद्या सूर्य मावळला की आपण या काटेरी झाडांच्या मागे भेटूया."




घुबड मग उडून गेलं पण चांदोबा मात्र अस्वस्थ होता.

त्याच्या मनात निरनिराळे विचार येऊ लागले. "सूर्य आपला प्रकाश कुठे लपवून ठेवतो हे घुबडाला खरंच शोधता येईल का? बाप रे! घुबड तिथे गेल्यावर सूर्याला जाग आली तर...? नको...नको... तो असं नाही करणार!" झोप लागेपर्यंत चांदोबा असाच काळजी करत राहिला.

दुस-या दिवशी सूर्य मावळेपर्यंत चांदोबाला काही धीर धरवेना. सकाळ झाल्याबरोबर तो काटेरी झुडपांच्या मागे जाऊन लपला. घुबडदादा आला का हे सारखा वाकून पहात बसला.

घुबड आल्याबरोबर त्यानं घाईघाईनं म्हटलं, "बरं झालं आलास ते. मी तुझीच काळजी करत होतो." घुबडानं आपले मोठे डोळे गोल गोल फिरवत म्हटलं, "झोपण्यापूर्वी सूर्य आपला प्रकाश एक पेटीत ठेवून देतो."



चांदोबा म्हणाला, "धन्यवाद!" मग जरा विचार करून हळूच त्याला म्हणाला, "तू मला सूर्याचा थोडासा प्रकाश आणून देशील का?"

"हो, नक्की आणून देईन." घुबड म्हणालं. "उद्या आपण इथे याच वेळी भेटूया." चांदोबानं हळूच घुबडाच्या कानात सांगितलं. घुबड लगेच सूर्याच्या घराकडे उडत निघालं.

"घुबडदादाला कोणी पकडणार तर नाही ना?" चांदोबा परत काळजी करू लागला. "त्याला आवाज न करता सूर्याच्या घरात जाता येईल ना?" असा विचार करतच तो झोपी गेला.

दुस-या दिवशी संध्याकाळी घुबड सूर्याचा थोडासा प्रकाश घेऊन आलं. चांदोबानं तो आपल्या अंगाभोवती गुंडाळून घेतला. घुबडानं चांदोबाला कौतुकानं म्हटलं, "एवढ्यातच तू किती चमकायला लागला आहेस!"

काही महिने असेच गेले. एक दिवस सूर्यानं चंद्राकडे निरखून पाहिलं. मग स्वत:कडे पाहिलं. सूर्याच्या लक्षात आलं की 'हा माझा प्रकाश चोरतोय.'



त्या रात्री सूर्य झोपलाच नाही. घुबड आपला प्रकाश चोरून नेतोय असं त्याला दिसलं. सूर्यानं मग घुबडाचा पाठलाग केला. घुबड गुपचूप आपला प्रकाश चंद्राला नेऊन देतोय हे त्याला समजलं. चंद्रानं तो अंगाभोवती गुंडाळलेलाही त्यानं पहिला. मग मात्र सूर्य चंद्रासमोर येऊन त्याला ओरडून म्हणाला,


"चंद्रा! तू माझा प्रकाश का चोरतोस?" चांदोबानं उत्तर दिलं, "कारण तुझा प्रकाश माझ्याहून जास्त आहे."

रागावलेल्या सूर्यानं चंद्राचा सर्व प्रकाश काढून घेतला, आणि त्याला शिक्षा दिली, "आता तू दिवसभर झोपशील आणि फक्त रात्रीच तुला जाग येईल."

आजसुद्धा घुबडाच्या मदतीनं चांदोबा सूर्याचा प्रकाश चोरतोच आहे. पण सूर्योदय होण्यापूर्वीच तो सूर्याकडे परत नेऊन ठेवतो.

अमेरिकन इंडियन गोष्ट

निरुपमा राघवन यांच्या शब्दांत



© Katha Jharna 2008

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

शिबी आणि ससाणा



शिबी हा कुरु वंशातील एक प्रसिद्ध राजा होता. शिबी राजाचं सर्व पशु, पक्षी आणि प्राण्यांवर प्रेम होतं आणि त्याच्या मनात त्यांच्याविषयी दया होती.




एक दिवस शिबीराजा आपल्या बागेत फेरफटका मारत होता. तेव्हा एक कबूतर जोरात उडत आलं आणि "वाचवा! वाचवा!" असं म्हणत राजाजवळ गेलं.

शिबीनं त्याला उचलून घेतलं आणि प्रेमानं म्हटलं, "घाबरू नकोस. तू माझ्याकडे मदत मागायला आला आहेस ना, मी तुला निराश करणार नाही."

त्याच वेळी कबुतराचा पाठलाग करत एक ससाणा तिथे येऊन पोचला. त्यानं राजाला म्हटलं, "कबुतर माझ्याकडे दे. ते माझं अन्न आहे."

आता राजा मोठ्याच अडचणीत सापडला. तो म्हणाला, "मी कबुतराला वाचवण्याचं वचन दिलं आहे. कबुतराच्या ऐवजी मी दुस-या कोणाचंही मांस तुला द्यायला तयार आहे."

पण ससाणा हट्टालाच पेटला. "मला दुसरं काहीच नको. मला माझं कबुतरच हवं आहे." राजानं त्याची समजूत काढायचा खूप प्रयत्न केला. अखेर ससाणा म्हणाला, "ठीक आहे. मग कबुतराच्या वजनाचं तुझं मांस मला काढून दे. तरच मी कबुतराचा हट्ट सोडेन."



राजा म्हणाला, "ठीक आहे." त्यानं एक तराजू आणायला सांगितलं. एका पारड्यात कबुतर ठेवलं. आणि दुस-या पारड्यात आपल्या मांडीचं मांस कापून ठेवलं.



कबुतराचं पारडं जड होतं. 'एवढं लहान कबुतर, पण त्याचं वजन इतकं कसं?' लोकांना नवल वाटत होतं. शिबी राजानं आपल्या शरीरातून आणखी बरंच मांस कापून पारड्यात टाकलं तरीही कबुतराचं पारडं जडच होतं.



हे दृश्य पाहून सर्व देव प्रभावित झाले आणि त्यांनी शिबी राजावर आकाशातून फुलांचा वर्षाव करून त्याचं कौतुक केलं. कबुतर आणि ससाणा दोघंही देव होते आणि राजाची परीक्षा घेण्यासाठी वेश बदलून आले होते.

"कबुतर एक सामान्य पक्षी आहे असा तू विचारही केला नाहीस. आपल्या स्वत:च्या प्राणाचा विचारही न करता तू त्याला वाचवलंस. जग नेहमी तुझा न्याय आणि दयाभाव लक्षात ठेवेल. राजा तू धन्य आहेस!" असा आशीर्वाद देऊन सर्व देव निघून गेले.



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

आज्ञाधारक शिष्य

एक गुरुजी आपल्या चार शिष्यांना बरोबर घेऊन बैलगाडीतून चालले होते. छान वारं सुटलं होतं. गुरुजींना जाता जाता झोप लागली.

रस्ता खूप खडबडीत होता आणि गाडी सारखी वर-खाली होत चालली होती. अचानक गुरुजींची पगडी खाली पडली.

शिष्यांनी पगडी खाली पडताना पाहिली होती. पण काय करावं ते त्यांना समजेना. कारण गुरुजींनी सांगितलं होतं की त्यांना विचारल्याशिवाय कोणतंही काम करायचं नाही. मग पगडी कशी काय उचलायची?




थोड्या वेळानं गुरुजी जागे झाले. "माझी पगडी कुठे आहे?" त्यांनी शिष्यांना विचारलं. शिष्यांनी सांगितलं, "ती वाटेत पडली."

गुरुजी रागावले आणि म्हणाले, "अरे मूर्खांनो! पगडी पडताना पाहिलीत आणि तरीही उचलली नाहीत! आता लक्षात ठेवा. गाडीतून जे काही पडेल, ते उचलून घ्यायचं."

एवढं सांगून गुरुजी परत झोपले. आता चूक होऊ नये म्हणून शिष्य सगळीकडे बारकाईने लक्ष ठेवत होते. थोड्या वेळाने बैलांनी शेण टाकायला सुरुवात केली. ते पाहून मुलं लगेच कामाला लागली. सगळं शेण गोळा करून गाडीत भरून घेतलं.

"गाडीत हा कसला वास येतोय" असं म्हणत गुरुजींनी डोळे उघडले. त्यांच्यासमोर शेणाचा डोंगर होता! "हे काय चाललंय?" गुरुजी रागावून ओरडले.

शिष्यांनी अभिमानाने सांगितलं, "गुरुजी, तुम्हीच तर सांगितलं होतं की गाडीतून पडणारी प्रत्येक वस्तू उचलून घ्या म्हणून. आम्ही तेच तर केलं."



गुरुजींनी डोक्याला हात लावला. "आता या मुलांना कसं बरं समजावून सांगावं?" थोडा वेळा विचार केल्यावर त्यांना एक उपाय सुचला.

गाडीतून सामान पडलं तर त्यातून काय काय उचलायचं आणि काय नाही याची त्यांनी एक यादीच तयार केली. ती शिष्यांकडे देऊन ते परत झोपले.

गाडी जात होती त्या रस्त्यावर बरेच खड्डे होते आणि दगड-धोंडेही पडलेले होते. अचानक गाडीचा तोल गेला आणि गुरुजी धपकन एका खड्यात पडले. "अरे! मला वाचवा!" गुरुजी ओरडू लागले.



शिष्यांनी लगेच आपल्याकडची यादी काढून वाचली. "पण गुरुजी, यात तर तुमचं नाव नाही. म्हणजे आम्ही तुम्हाला बाहेर काढू शकत नाही!"

गुरुजींनी शिष्यांना समजावण्याचा बराच प्रयत्न केला, पण ते ऐकायलाच तयार नव्हते. "आम्ही तुमची आज्ञा कधीच मोडणार नाही. तुम्ही आमची परीक्षा घेत होतात ना, गुरुजी?" असं म्हणून त्यांनी गुरुजींना खड्ड्यातून बाहेर काढायला साफ नकार दिला.

अखेर हताश होऊन गुरुजींनी शिष्यांकडून यादी आणि पेन्सिल घेतली. खाली पडल्यावर उचलण्याच्या वस्तूंच्या यादीत आपलं नाव घातलं आणि ती यादी शिष्यांना परत दिली. तेव्हा कुठे त्यांनी गुरुजींना खड्ड्यातून बाहेर काढलं.

भारतातील लोककथा



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist S. P. Raju

पोपटाचा सल्ला

एका व्यापा-याकडे एक बोलणारा पोपट होता. त्याला एका चांदीच्या पिंज-यात ठेवलं होतं आणि व्यापारी त्याची मोठ्या प्रेमानं देखभाल करायचा. पोपटाला जे काही खायला हवं असेल, ते सर्व व्यापारी त्याला देत असे.

पोपट व्यापा-याबरोबर तासनतास गप्पा मारत असे. त्याच्या प्रत्येक प्रश्नाचं समजुतदारपणे उत्तर देत असे. बोलता बोलता व्यापा-याला म्हणत असे की, "मला सोडून दे. मला स्वतंत्रपणे जगायचं आहे."



परंतु व्यापा-याला हे मान्य नव्हतं. तो म्हणायचा, "एवढं सोडून दुसरं काहीही माग. मी ते तुला नक्की देईन."

एक दिवस पोपट म्हणाला, "तू मला सोडून दे. मी तुला तीन सल्ले देईन. त्यांचा तुला आयुष्यभर उपयोग होईल." व्यापारी आता विचारात पडला. मग त्यानं पिंज-याचं दार उघडून टाकलं.

पोपट उडी मारून व्यापा-याच्या हातावर येऊन बसला आणि म्हणाला, "आता माझा पहिला सल्ला ऐक. तुझी धनसंपत्ती नाहीशी झाली, तर त्याचं दु:ख करू नकोस."


पोपटाच्या या गोष्टीला व्यापा-यानं फारसं महत्त्व दिलं नाही आणि म्हणाला, "यात तू नवीन काहीच सांगितलं नाहीस."



पोपट उडून छपरावर जाऊन बसला आणि म्हणाला, "हा माझा दुसरा सल्ला ऐक. कोणीही तुला काही जरी सांगितलं तरी त्याच्यावर संपूर्ण विश्वास कधीच ठेवू नकोस."

व्यापारी चिडून म्हणाला, "या सर्व गोष्टी तर मला आधीपासूनच माहित आहेत. मला माहित नसेल असं काही तरी सांग ना." पोपट जोरात हसला आणि म्हणाला, "असं होय! मग आता मी तुला माहित नसलेली एक गोष्ट सांगतो. माझ्या पोटात बहुमोल रत्नं आहेत."

हे ऐकून व्यापारी चकित झाला. "काय? बहुमोल रत्नं? अरेरे! तुला सोडून दिलं ही माझी फारच मोठी चूक झाली. मला आता आयुष्यभर याची चुटपूट लागेल."



त्याची चेष्टा करत पोपट म्हणाला, "पाहिलंस? आताच मी तुला सांगितलं की संपत्ती गेली तर दु:ख करू नकोस. पण तू तर लगेच दु:खी झालास. मी सांगितलं की दुस-यांच्या गोष्टींवर विश्वास ठेवू नकोस. पण मी जेव्हा म्हणालो की माझ्या पोटात बहुमोल रत्नं आहेत तेव्हा तू त्यावर लगेच विश्वास ठेवलास. थोडासा विचार कर, जर माझ्या पोटात रत्नं असती, तर मी जिवंत राहिलो असतो का?"

पोपट परत म्हणाला, "आता माझा तिसरा सल्ला ऐक. कोणी काही जरी सांगितलं तरी आपली बुद्धी वापरून त्याचा नीट विचार कर. केवळ कानानं ऐकणं पुरेसं नसतं."

हे ऐकून व्यापारी आणखीच गोंधळून गेला. उडणा-या पोपटाकडे मुकाट्याने पहातच राहिला.

भारतातील लोककथा



© Katha Jharna 2008

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi


Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

Marathi Sujata Godbole


Artist S. P. Raju

सशानं समुद्र ओलांडला

एक ससा रोज संध्याकाळी समुद्रकिना-यावर येऊन बसायचा आणि तासनतास कसला तरी विचार करत असायचा. एक दिवस एक शार्क मासा पाण्यातून उडी मारून बाहेर आला आणि त्यानं सशाला हाक मारून म्हटलं, "मित्रा, तू रोज एकटाच बसून कसला विचार करतोस?"



ससा म्हणाला, "त्या पलीकडच्या किना-याकडे पहा ना, तिथलं छोटंसं बेट किती सुंदर दिसतंय! मला समुद्र ओलांडून तिथे जायचंय."




शार्क जोरात हसू लागला आणि म्हणाला, "अरे वेड्या, तुला तर पोहता सुद्धा येत नाही, तू कसा समुद्र ओलांडणार?"


ससा म्हणाला, "मी समुद्र ओलांडायची काही तरी युक्ती शोधून काढेन."

शार्कच्या चेह-यावर हसू होतं, "असं! बघूया तू समुद्र कसा ओलांडतोस ते!"

एक दिवस सशाला एक युक्ती सुचली. त्यानं शार्कला विचारलं, "आपल्या दोघांपैकी कुणाकडे जास्त मित्र आहेत? तुझ्याकडे की माझ्याकडे?" शार्कने उत्तर दिलं, "माझी खात्री आहे, मलाच खूप मित्र आहेत."

ससा म्हणाला, "असं! मग तुझ्या मित्रांना इथपासून पलीकडच्या किना-यापर्यंत एका ओळीत उभं कर पाहू. मला मोजून पहायचं आहे.





सगळे शार्क एका ओळीत उभे राहिले. ससा एका शार्कच्या पाठीवरून दुस-या शार्कच्या पाठीवर उड्या मारत मोजू लागला, "एक... दोन... तीन..."

शेवटी तो दुस-या किना-यावर पोचला. तिथल्या एका खडकावर उडी मारून बसला आणि म्हणाला, "शार्क मित्रांनो, धन्यवाद! तुम्ही सगळ्यांनी माझ्यासाठी पूल केलात आणि मला इथे पोचायला मदत केलीत."

तेव्हा शार्क मित्राच्या लक्षात आलं की सशानं हुशारी करून त्याला फसवलं आहे. त्याचा त्याला फारच राग आला पण त्याचबरोबर सशाच्या हुशारीचं कौतुकही वाटलं.


शार्क जेव्हा जेव्हा त्या छोट्या बेटाजवळ यायचा, तेव्हा सशाची वाट पहायचा, पण ससा काही दिसायचा नाही. असे बरेच महिने गेले.

एक दिवस किना-यावर अचानक त्याला ससा भेटला. चांगला गुबगुबीत झाला होता.

शार्कने आनंदाने पाण्यातून उडी मारली. त्यानं सशाला हाक मारली, "मित्रा, आता तुला परत जायचं नाही का? या वेळेस तू मला फसवू शकणार नाहीस! आता तू जा समुद्राच्या किना-यावरून चालत चालत!"

सशाने मोठ्या आत्मविश्वासानं म्हटलं, "नाही. मी परत समुद्र ओलांडूनच पलीकडच्या किना-यावर जाईन." बरेच दिवस ससा किना-यावर बसून विचार करू लागला. एक दिवस त्याला एक नवी युक्ती सुचली...


जपानी लोककथेवर आधारीत



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi


Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

चला ओळखूया



खूप नाचतो, हलतो डुलतो
सोनेरी दाणे भरले की वाकतो
आतून पांढरा दाणा निघतो.

दिसतो तर हा काठीसारखा
रस याचा गोडच गोड
प्यायलावर करतो गारेगार
याचाच बनतो गूळ गोड.



झाड याचं जमिनीवर, फळ याचं जमिनीत
कच्चं खाल्लं तरी छान, भाजलं तर आणखीच छान.

असं एक धान्य, ज्याच्या पोटावर आहे एक रेघ
राजा असो वा मजूर, सगळेच खातात रोज.


घोडा माझा काळा, पण सोलल्यावर होतो गोरा
तोंडात टाकून खाता खाता पळतात सगळे जोरात.


खूप कपडे घालून येतो, केस याचे लाल
आत याच्या आहेत मोती, किती तरी चवदार.

असं एक धान्य, पावसाच्या ढगाचा ज्याचा रंग
थंडीत त्याची भाकरी खाऊ, तूप आणि गुळासंग.



ऊस, शेंगदाणे, गहू, बाजरी,
मका, तांदूळ आणि काळे चणे







सहा पाय आहेत मला,
उडणे माझे काम
गोड, घाण सगळ्यावर बसते,
सांगा माझे नाव.

कच-याचं मी खत बनवतो,
ओल्या मातीत घर माझं,
मुलांना मी वाटतो साप,
कसं त्यांना समजवावं.




झोपेत किंवा जागेपणी, बसताना आणि उडतानाही
माझे पंख नेहमीच उघडे,
उडत खाली आले की, पाऊस येणार म्हणतात सारे.

तोंडातून एक धागा काढतो, त्याचं नाजूक जाळं बनवतो
ना हा जादुगार, ना हा शिकारी, सांगा पाहू हा कोण.



छोटी रेशम, लाल रेशम,
जगभरात फिरत असते,
सगळ्याना ती हवी असते,
म्हणूनच ती कुठेही मिळते.





शिरपूरहून गाडी निघाली
कानपूरमध्ये सापडली
हस्तपूरमध्ये भांडण झालं
नखपुरात मारून टाकलं.

फुलांची आहे मैत्रीण, पिते त्यांचा रस,
रंगीबेरंगी पंख पसरून, बागेत असते नेहमी उडत.





अंधारात चमचमतो, पोटाशी त्याच्या आग,
रात्री त्याला उडताना पाहून सगळे होतात खूष.

मातीतच जन्म तिचा, मातीच तिचं अन्न,
लाकडाला जर लागली तर करते त्याला फस्त.

असा एक डॉक्टर आहे, देतो सारखे इंजेक्शन
कोणाचंही ऐकत नाही, पैसे न घेता जातो उडून.










खूप आहेत पाय तिला, सापासारखी दिसते,
धोकेबाज आहे ती, कुठूनही घरात घुसते.

एकामागून एक अशा रांगेत चालतात, जणू मोठी फौज,
दिवसभर करत असतात जेवणाची तरतूद.



अंधा-या कोप-यात राहणारा, ओल त्याला प्रिय
आवाज आला की पळून जातो, उजेड त्याला अप्रिय.

एका महालात लोक हजार
पण एकच त्यात आहे खास.

मुंगी, माशी, डास, फुलपाखरू, गोम, पावसाचे किडे (पतंग), ऊ, झुरळ,
रेशमाचा किडा, वाळवी, राणी मधमाशी, गांडूळ, काजवा, कोळी

P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

चिमणी आणि लाली


एक दिवस झाडानं खूष होऊन चिमणीला दोन सुंदर फुलं दिली. चिमणीला वाटलं यातलं एक फुल कुणाला तरी द्यावं. पण कुणाला? चोचीत एक सुंदर फूल घेऊन चिमणी शोधायला बाहेर पडली.

उडता उडता तिला एक सुरेख बाग दिसली. फुलांनी बहरलेली. त्या बागेत खूप छान छान फुलं होती. त्या फुलांचा सुवास सगळीकडे पसरला होता.

अशी बाग चिमणीनं कधीच पहिली नव्हती. दूर एका बाजूला तिला बागेचा माळी दिसला. तिनं विचार केला, 'याला फुलं फार आवडतात असं दिसतंय. आपण यालाच हे फूल देऊया का?'



ती जशी खाली आली, तसं माळ्याचं तिच्याकडे लक्ष गेलं. माळी आश्चर्यानं म्हणाला, "अगं, तुझ्याकडे किती सुंदर फूल आहे. मला देतेस का? माझ्या बागेत इतकं सुंदर फूल नाही. या फुलामुळे माझी बाग जगातली सर्वांत सुंदर बाग होईल. मला बक्षीस मिळेल."




चिमणी रुसली आणि उडून गेली. उडता उडता तिला एका जागी खूप रंग दिसले. एक माणूस कापडावर भरतकाम करत होता. चिमणीला वाटलं, 'याला सुंदर गोष्टी आवडत असतील, मी यालाच हे फूल देईन.'




ती जशी खाली आली, तसं त्या माणसाचं तिच्याकडे लक्ष गेलं. "अरे वा! तुझ्याकडचं फूल फारच सुंदर आहे. मला देतेस का? माझ्या भरतकामात देखील इतकं सुंदर फूल नाही. मी असं फूल माझ्या भरतकामात आणलं तर माझी कला जगप्रसिद्ध होईल. मी ते राजाला देईन."

चिमणी रुसली आणि परत उडून गेली. एका ठिकाणी तिला बरीच कबुतरं जमलेली दिसली. एक बाई त्यांना दाणे टाकत होती. ते पाहून चिमणी फार खूष झाली. तिनं विचार केला, 'या बाईचं पशु-पक्षावर प्रेम असणार. हिलाच आपण फूल देऊया.'

चिमणी जशी खाली आली, तसं त्या बाईचं चिमणीकडे लक्ष गेलं. ती चिमणीला म्हणाली, "अगं, तुझ्याकडे किती सुंदर फूल आहे. ते मला दे, मी ते देवाला घालीन, मग तो माझ्या सगळ्या इच्छा पूर्ण करेल."



चिमणी परत रुसली आणि उडून गेली.



बराच वेळ ती अशीच उडत राहिली. दूरवर तिला लाली नावाची एक लहान मुलगी दिसली. तिच्या डोक्यावर एक पाण्याचा घडा होता. चिमणी आता विचार करायला देखील थांबली नाही. ती हळूच खाली आली आणि गुपचूप लालीच्या केसात ते सुंदर फूल माळलं.



लाली आनंदून म्हणाली,
"हे फूल माझ्यासाठी?"

चिमणी म्हणाली, "हो, ते खास तुझ्यासाठीच आहे. तू इतकं काम करतेस, ते देखील फुलासारखंच सुंदर आहे."

सुश्मिता बॅनर्जी

P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

काय आहे माझं नाव?

एक लहानशी माशी एकटीच बागेत उडत होती. सगळे तिला 'ई' या नावानं हाक मारत असत. एक दिवस अचानक तिला आपलं नावच आठवेना. जवळच उभ्या असलेल्या वासराला तिनं विचारलं,

"धष्टपुष्ट वासरा, सांग बरं माझं नाव काय?"

वासरू म्हणालं, "तुझं नाव मला काय माहित? माझी आई तिकडे गवत खातेय, तिला जाऊन विचार." माशीनं गायीला विचारलं,

"धष्टपुष्ट वासरू, वासराची आई,
सांग माझं नाव काय?"

गाय म्हणाली, "मला काय माहित? मला चरायला आणणा-या गुराख्याला विचार." मग माशी गेली गुराख्याकडे,

"धष्टपुष्ट वासरू, वासराची आई,

आईला चरायला नेणारा गुराखी, सांग माझं नाव काय?"

गुराखी म्हणाला, "मला काय माहित? माझ्या हातातल्या काठीला विचार." माशीनं काठीकडे पाहून विचारलं,

"धष्टपुष्ट वासरू, वासराची आई,
आईला चरायला नेणारा गुराखी,
गुराख्याच्या हातातली काठी,
सांग माझं नाव काय?"




काठी म्हणाली, "मला काय माहित? मला ज्या झाडातून कापलंय, त्या झाडाला जाऊन विचार." माशीनं झाडाकडे जाऊन विचारलं,

"धष्टपुष्ट वासरू, वासराची आई,
आईला चरायला नेणारा गुराखी,
गुराख्याच्या हातातली काठी,
काठी देणारं झाड,
सांग माझं नाव काय?“

झाड म्हणालं, "मला नाही माहित. माझ्या फांदीवर तो सारस पक्षी बसलाय ना, त्याला विचारून बघ." माशीनं सारस पक्षाला विचारलं,

"धष्टपुष्ट वासरू, वासराची आई,
आईला चरायला नेणारा गुराखी,
गुराख्याच्या हातातली काठी,
काठी देणारं झाड,
झाडावर बसलेला सारस पक्षी,
सांग माझं नाव काय?"



सारस म्हणाला, "मला नाही माहित. मी ज्या तळ्यात राहतो, त्याला जाऊन विचार." माशी उडत उडत गेली तळ्याकडे, आणि त्याला विचारलं,

"धष्टपुष्ट वासरू, वासराची आई,
आईला चरायला नेणारा गुराखी...
झाडावर बसलेला सारस पक्षी,
पक्षाचं लाडकं तळं,
सांग माझं नाव काय?"

तळं म्हणालं, "मला नाही माहित. या माशाना विचार."
तेवढ्यात एक मासोळी उडी मारून पाण्यावर आली. माशीनं तिला विचारलं,

"धष्टपुष्ट वासरू, वासराची आई,
आईला चरायला नेणारा गुराखी...
झाडावर बसलेला सारस पक्षी,
पक्षाचं लाडकं तळं,
तळ्यातली मासोळी,
सांग माझं नाव काय?"

मासोळी म्हणाली, "मला नाही माहित. आम्हाला पकडायला कोळीदादा येतो ना, त्याला विचार." माशीनं मासे पकडणा-या कोळ्याला विचारलं,

"धष्टपुष्ट वासरू, वासराची आई,
आईला चरायला नेणारा गुराखी...
पक्षाचं लाडकं तळं,
तळ्यातली मासोळी,
तिला पकडणारा कोळी,
सांग माझं नाव काय?"

कोळीदादा म्हणाला, "मला नाही माहित. माझ्या हातातल्या मडक्याला विचार."
माशीनं मडक्याला विचारलं,

"धष्टपुष्ट वासरू, वासराची आई...
...तळ्यातली मासोळी,
तिला पकडणारा कोळी,
कोळ्याच्या हातातलं मडकं,
सांग माझं नाव काय?"

मडकं म्हणालं, "मला नाही माहित. मला ज्यानं घडवलं, त्या कुंभाराला विचार." मग माशीनं कुंभाराला विचारलं,

"धष्टपुष्ट वासरू...
...कोळ्याच्या हातातलं मडकं,
मडकं घडवणारा कुंभार
सांग माझं नाव काय."





कुंभार म्हणाला, "मला काय माहित? मी तर मातीचं काम करतो. तू मातीलाच विचार." माशीनं मातीला विचारलं,

"धष्टपुष्ट वासरू...
...मडकं घडवणारा कुंभार,
कुंभाराची माती
सांग माझं नाव काय."

माती म्हणाली, "मला नाही माहित. माझ्यावर जे गवत उगवलं आहे ना, त्याला विचार." माशीनं गवताला विचारलं,

"धष्टपुष्ट वासरू...
...कुंभाराची माती,
मातीत उगवलेलं गवत
सांग माझं नाव काय."

गवत म्हणालं, "मला नाही तुझं नाव माहित. पलीकडे मला खाणारे घोडे आहेत, त्यांना विचार. माशी गेली घोड्याकडे,

"धष्टपुष्ट वासरू...
...मातीत उगवलेलं गवत
गवत खाणारा घोडा
सांग माझं नाव काय."

घोड्यानं "ई... ई... ई..." असा जोरात आवाज काढला. ते ऐकून माशीला आपलं "ई" हे नाव आठवलं. "माझं नाव ई, माझं नाव ई" असं आनंदानं गातच माशी उडून गेली.

तामिळनाडूतील लोककथा

P. Saraswati
V. Vijayakanthi
L. S. Saraswathi
S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

माकडांची हुशारी

एकदा माकडांच्या एका टोळीनं नव्या जंगलात रहायला जायचं ठरवलं. बराच मोठा प्रवास केल्यावर ते एका नव्या जंगलात पोचले. तिथे पोचल्याबरोबर टोळीच्या मुख्यानं सगळ्या माकडांना सावध केलं आणि सांगितलं, "या जंगलातल्या एका तळ्यात एक भूत लपून बसलं आहे. म्हणून माझी परवानगी घेतल्याशिवाय कुणीही तळ्याचं पाणी प्यायचं नाही."

एक दिवस माकडं फिरत फिरत जंगलात खूप दूर गेली. चालता चालता एक पिल्लू आपल्या आईला म्हणालं, "आई, मला खूप तहान लागली आहे."

माकडाची आई म्हणाली, "ते बघ, आपण त्या समोरच्या तळ्यातलं पाणी पिऊया."





तेवढ्यात दुसरं एक माकड म्हणालं, "थांबा! तळ्याकडे जाऊ नका. आपल्या मुख्यानं काय सांगितलं होतं ते विसरलात वाटतं."

माकडाच्या आईला आपल्या पिलाचे हाल पाहवत नव्हते. तिला काय करावं ते सुचेना. तेवढ्यात टोळीचा मुख्यच तिथे आला आणि म्हणाला, "पाणी हवंय ना? जरा थांबा. मी एकदा पाहून येतो."

टोळीचा प्रमुख तळ्याजवळ गेला. सगळ्या बाजूंनी नीट लक्ष देऊन पाहिलं. तिथे तर पायांचे मोठे मोठे ठसे उठलेले होते! पण सगळे ठसे पाण्याकडे जाणारे होते. तळ्याकडून परत येणारे ठसे कुठेच दिसत नव्हते. भूत इथेच लपलेलं असणार, असा प्रमुख माकडानं अंदाज केला.

मग त्यानं इतर माकडांना सांगितलं, "हा तलाव फार धोक्याचा दिसतो. कोणीही याकडे जाऊ नका." असं तो म्हणतच होता, इतक्यात, "हा...हा...हा...हा..." असा तळ्यातून आलेला भीतीदायक आवाज सगळ्यांनाच ऐकू आला.

पाण्यातून एक मोठं भूत बाहेर आलं. "हा...हा...हा...हा...! जो कोणी या पाण्यात उतरेल, त्याला मी खाऊन टाकेन."

प्रमुख म्हणाला, "आमच्यापैकी कोणीही पाण्यात उतरणार नाही." त्याला चिडवण्यासाठी भूत म्हणालं, "मग काय एवढ्या उन्हात पाण्याशिवाय मरून जाल का?"

"मुळीच नाही. आम्ही पाणी तर पिऊच." प्रमुखानं आत्मविश्वासानं उत्तर दिलं.

"पण कसं?" भुतानं आश्चर्यानं विचारलं.

"आता तू बघच." असं म्हणून टोळीच्या प्रमुखानं

माकडांना आजूबाजूचे बांबूचे तुकडे आणायला सांगितले. प्रत्येक तुकड्याचं भोक नीट तपासून घेतलं.




मग एक तुकडा दुस-यात घालून एक लांबच लांब नळी तयार केली. नळीचं एक टोक पाण्यात घातलं आणि दुस-या टोकाला तोंड लावून जोरात पाणी ओढून घ्यायला सुरुवात केली.

मग काय! थोड्याच वेळात नळीच्या दुस-या टोकाला कारंजासारखं जोरात पाणी येऊ लागलं. "वा! काय मस्त पाणी आहे!" माकडं आनंदानं उड्या मारू लागली. सगळे मनसोक्त पाणी प्याले, पाण्यात भिजले, खेळले, खूप मजा केली.

बिचारं भूत! फारच निराश झालं. रागानं पाण्यावर हातपाय आपटले, आणि त्यातच परत लपून बसलं.

जातक कथा



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju


मेरी खूष झाली

मेरीच्या हातात एक कागद होता. "चित्र काढलं आहेस का? मला जरा दाखव ना," असं म्हणत दीपानं मेरीच्या हातातला कागद घेतला.

मेरीच्या डोळ्यात पाणी होतं, ते पाहून दीपा चमकली. ती म्हणाली, "मेरी, काय झालं? तू का रडतेस? मला सांग तरी."



मेरीनं रडत रडतच उत्तर दिलं, "मी तुमच्या बागेचं चित्र काढलं होतं. पण बंटी ते पाहून माझी चेष्टा करायला लागला. माझं चित्र अगदीच बेकार आहे असं तो म्हणतो. आता मी परत कधी चित्रच काढणार नाही."




"कोण म्हणतं चित्र वाईट आहे? हे तर खूपच छान आहे. आपण सगळे वेगवेगळा विचार करतो, वेगळ्या नजरेनं पाहतो, आणि आपल्या आवडीप्रमाणे चित्र काढतो. सगळ्यांनी एकसारखंच चित्र काढलं पाहिजे असं थोडंच आहे! तू आता रडू नकोस."

दीपाचं बोलणं ऐकून मेरीला जरा बरं वाटलं.

दुस-याच दिवशी दीपाकडे तिचे काही नातेवाईक आले. दीपा आणि मेरी त्यांच्याबरोबर समुद्रकिना-यावर फिरायला गेल्या. दीपा जाताना काही कागद आणि रंगीत पेन्सिली घेऊन गेली होती.

किना-यावर काही कोळी लोक आपल्या बोटी दुरुस्त करत होते. काही जण मासे पकडत होते. वेगवेगळी दृश्यं पाहून पाहुणे खूष झाले. रंगीत पेन्सिली घेऊन ते चित्रं काढू लागले.

मेरी लाजतच म्हणाली, "मला चित्र काढता येत नाही." थोडा वेळ ती त्यांची चित्रं पहात बसली. पण मग तिला राहवेना. लवकरच ती सर्व काही विसरून चित्र काढण्यात रंगून गेली.



थोड्या वेळानं सगळ्यांनी आपली चित्रं एकमेकांना दाखवायला सुरुवात केली. सगळ्यांनी समुद्र किना-याचीच चित्रं काढली होती. पण प्रत्येकानं आपल्या स्वत:च्या आवडीनुसार आपल्या पद्धतीनं चित्रं काढली होती.

आता मेरीला पटलं, 'त्या दिवशी दीपा म्हणत होती ते खरंच होतं. प्रत्येकाची नजर निराळी, विचार निराळा, म्हणून मग चित्रंही निराळीच असणार.'

मग मेरीनंही आपलं चित्र बाहेर काढलं. त्याच्यावरून एक गोष्ट तयार केली. सर्वजण ते पाहून चकित झाले. "तू किती छान गोष्ट सांगितलीस!" सर्वांनी मेरीचं कौतुक केलं.

आता मेरी आपल्या आवडीची चित्रं काढते. चित्रांवरून ती खूप गोष्टीही सांगते. लोक आपलं कौतुक करतात की नाही याकडे ती आता मुळीच लक्ष देत नाही.



© Katha Jharna 2008

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

Marathi Sujata Godbole


Artist S. P. Raju


जमीन फाटली

एक दिवस ससा एका ताडाच्या झाडाखाली झोपला होता. जवळच एक बेलाचं झाड होतं. अचानक बेलाचं एक फळ धप्पकन ताडाच्या पानावर पडलं. ससा गाढ झोपेत होता. आवाज ऐकून तो दचकून उठला.

"अरे! जमीन फाटली" असं म्हणत तो गडबडीने पळत सुटला. त्याच्या मित्र-मैत्रिणीना काहीच समजेना, पण ते ही त्याच्यामागे पळू लागले.

रस्त्यात त्यांना भेटलं एक हरीण. या सर्वांना पळताना पाहून त्यानं विचारलं, "अरे, इतक्या गडबडीत कुठे चालला आहात?"






ससा म्हणाला, "अरे जमीन फाटलीय. पळा रे पळा!" हरीण पण त्यांच्याबरोबर पळू लागलं. तेवढ्यात अस्वलानं या सर्वांना पळताना पाहिलं. त्यानं हरणाला हाक मारून म्हटलं, "अरे, तुम्ही सगळे असे का पळताय?"

पळता पळताच हरणानं उत्तर दिलं, "जमीन फाटलीय! तू पण पळ!" मग अस्वलही पळू लागलं. या सर्वांना पळताना पाहून कोल्हा गोंधळून गेला. त्यानं अस्वलाला थांबवून विचारलं, "काय झालंय? तुम्ही सगळे का पळता?"


"अरे, तुला माहित नाही! जमीन फाटलीय. जीव वाचवायचा असेल, तर तू ही पळ," असं अस्वलानं पळता पळताच ओरडून सांगितलं. असं होता होता बैल, डुक्कर, गेंडा, हत्ती, वाघ सगळेच पळू लागले. त्यांच्या मागोमाग आणखीही प्राणी पळू लागले.





वनराज सिंहाने सर्व प्राणी पळत सुटलेले दुरूनच पहिले. नक्कीच काही तरी बिघडलं असणार हे त्यानं ओळखलं. सर्व प्राणी जेव्हा सिंहाच्या जवळ आले तेव्हा सिंहानं म्हटलं, "थांबा. अरे तुम्ही सगळेजण असे का पळत आहात?"

वाघाला तर नीट बोलताही येईना. दम खात खात तो म्हणाला, "जमीन फाटलीय, पळा रे पळा."



सिंहानं विचार केला, 'नक्कीच यांचा काहीतरी गैरसमज झालेला दिसतो. म्हणूनच हे असे घाबरलेले दिसतात. त्यांना आता थांबवलं पाहिजे.'

सिंहाने तीन जोरदार डरकाळ्या फोडल्या. त्याने सगळ्या जंगलाचा थरकाप उडाला. सगळे प्राणी चुपचाप उभे राहिले. सिंहानं विचारलं, "तुम्हाला कुणी सांगितलं जमीन फाटलीय असं?"


वाघ म्हणाला, "मला हत्तीनं सांगितलं." हत्तीला विचारल्यावर तो म्हणाला, "मला बैलानं सांगितलं." अशा प्रकारे गेंडा, डुक्कर, कोल्हा आणि हरणानं एकमेकांची नावं सांगितली.

शेवटी जेव्हा सशाला विचारलं, तेव्हा तो म्हणाला, "हो. मी जमीन फाटण्याचा आवाज ऐकला." सिंह म्हणाला, "कुठे फाटलीय जमीन, मला ती जागा दाखव पाहू."

मग ससा जिथे झोपला होता तिथे सगळ्यांना घेऊन गेला. जवळच बेलाचं फळ पडलं होतं. सगळे ते पहात असतानाच आणखी एक फळ ताडाच्या पानावर पडलं.

सिंह जोरजोरात हसू लागला. "पाहिलंत, सशानं हाच आवाज ऐकला असणार. झोपेत त्याला वाटलं की जमीनच फाटली." हे ऐकून सर्वांच्याच जीवात जीव आला आणि सगळेच हसू लागले.

जातक कथा



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole


Artist S. P. Raju

ढोलीची शेपूट

ढोली नावाची म्हैस फारच आळशी होती. एकदा तळ्यात जाऊन बसली, की ढिम्म हलत नसे. म्हणून तळ्यातले बेडूक फार नाराज होते.

तळं तसं लहानच होतं, म्हणून एकदा का ढोली त्यात येऊन बसली की बेडकांना खेळायला फारच थोडी जागा शिल्लक रहायची. मग ते सगळे रुसून, रागावून, तोंड फुगवून कोप-यात बसून रहायचे.

"आपण ढोली बरोबरच खेळूया का?" बबडू बेडकानं दगडू बेडकाला विचारलं. दगडू म्हणाला, "अरे पण ती कशी खेळायला येईल? ती तर जागची हलत देखील नाही!"



"हलली नाही तर नको हलू दे!" बबडू म्हणाला, "आपण कशाला दूर जायचं? आपण तिच्यावरूनच उड्या मारूया." दगडूला ही कल्पना आवडली.

पुढल्या वेळेस जेव्हा ढोली तळ्यात आली, तेव्हा बबडू तिच्या डाव्या बाजूला बसला आणि दगडू गेला उजव्या बाजूला. तिच्यावरून उडी मारत एक गेला डावीकडून उजवीकडे आणि दुसरा गेला उजवीकडून डावीकडे.

ढोलीच्या अंगावर पाणी उडलं, पण तिनं काहीच केलं नाही. परत जेव्हा बबडू आणि दगडूनं तिच्यावरून उड्या मारल्या, तेव्हा तिनं मान वळवून पाहिलं.



हा काय खेळ चाललाय ते तिच्या लक्षात आलं. परत जेव्हा ते उडी मारायला आले, तेव्हा तिनं आपली शेपूट उचलली, आणि झपकन दगडूला शेपटीत पकडलं.

दगडू चांगलाच गडबडून गेला. मग बबडूनं पलीकडून उडी मारत शेपटीला हात लावला. मग शेपटीनं दगडूला सोडलं आणि ती बबडूकडे वळली.

शेपटीनं बबडूला पकडण्याआधीच दगडूनं शेपटीला हात लावला. मग शेपूट वळलं दगडूकडे. दगडू उडी मारणारच होता, तेवढ्यात शेपटीनं त्याला फटकारलं. मग लगेच बबडूनं शेपटीवर उडी मारली.

मग ढोलीनं आपली शेपूट त्याच्याकडे वळवली. आता तिलाही मजा येऊ लागली. ती आपली शेपूट कधी बबडूकडे वळवायची, तर कधी दगडूकडे, कधी डावीकडे तर कधी उजवीकडे.



शेपूट अगोदर बेडकाला पकडते, की बेडूक शेपटीला शिवतो, हाच त्यांचा खेळ झाला. दूर बाजूला उभे राहिलेले बेडूक पण हा खेळ पहात होते.

एक एक करून ते पण या खेळात सामील झाले. ढोली आपली शेपूट कुठेही उगारायची आणि बेडूक लगेच उड्या मारायचे, "झपाक! झपाक!" मधून मधून बेडूक आनंदानं "डरांऽऽव डरांऽऽव" करायचे आणि ढोली देखील खुशीत येऊन हंबरायची!



दिवसभर हाच खेळ चालला होता. संध्याकाळी जेव्हा ढोली जायला निघाली, तेव्हा बबडू आणि दगडू तिला म्हणाले, "ढोली, उद्या पण ये हं, आपण परत खेळूया." ढोली आपलं डोकं आणि शेपूट जोरात हलवून हंबरली आणि परत यायचं कबूल केलं. दुस-या दिवशी सकाळी ती पळतच आली. ती धपकन तळ्यात बसली आणि "डरांऽऽव डरांऽऽव" करत बेडकांचा खेळ परत सुरू झाला. नवा दिवस! नवा खेळ!

त्रिपुरारी शर्मा

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

नाना आणि चिक्कू

एका गावात दोन मित्र रहात होते. गावातल्या लोकांनी एकाला नाव दिलं होतं 'नाना' कारण तो कधीच कोणाला काही देत नसे. दुस-याला नाव दिलं होतं चिक्कू. कारण कुठलीच वस्तू पैसे देऊन विकत घ्यायला त्याला आवडत नसे.

एक दिवस खूप जोराचा पाऊस पडत होता. चिक्कूकडे छत्री नव्हती. त्यानं नानाकडे छत्री उधार मागितली. नाना कुठली गोष्ट सहजा सहजी देणारच नव्हता. तो म्हणाला, "हे बघ मित्रा! मला वाटतं की तू नेहमी आपल्या स्वत:च्या पायांवर उभं रहावंस. मी जर आता तुला छत्री देऊन मदत केली, तर तू कधीच छत्री विकत घेणार नाहीस. कधीही पाऊस आला, तर तू नेहमीच कुणाकडे तरी छत्री मागशील."





बिचारा चिक्कू त्या दिवशी पावसात भिजतच घरी गेला.

काही दिवसांनी दोन्ही मित्र पोस्टात भेटले. चिक्कूला एक पत्र लिहायचं होतं म्हणून त्यानं नानाकडे पेन मागितलं. नाना थोडंच पेन देणार होता! त्यानं उलट सल्ला दिला, "हे बघ मित्रा! ही उधार घेण्याची सवय आता सोडून दे. मी तुझ्या भल्यासाठीच सांगतो आहे. तू आपलं पेन घेऊन ये, आणि मगच पत्र लिही."

चिक्कूला चांगलाच राग आला. त्यानं नानाला धडा शिकवायचं ठरवलं. त्यासाठी तो योग्य संधीची वाट पाहू लागला.

अखेर तो दिवस आला. एक दिवस दोन्ही मित्र शेजारच्या गावातल्या जत्रेला निघाले होते. रस्त्यात एक नदी होती. नदीवर एक लाकडी पूल होता. दोघेही त्या पुलावरून चालले होते.

अचानक नानाचा पाय घसरला, आणि तो नदीत पडला. त्याला पोहता येत नव्हतं. "वाचवा! वाचवा!" नाना ओरडू लागला.



चिक्कूनं विचार केला की हीच योग्य संधी आहे नानाला धडा शिकवायची. तो म्हणाला, "मित्रा, मी तुला वाचवू शकतो, पण मग तू कधीच पोहायला शिकणार नाहीस. कोणीतरी येऊन तुला वाचवायची तू कायमच वाट पहात राहशील." असं म्हणून चिक्कू पुढे चालायला लागला.

आपली चूक आता नानाच्या लक्षात आली होती. तो म्हणाला, "मित्रा, मला माफ कर. तू जर मला वाचवलं नाहीस तर मी बुडूनच जाईन. यापुढे मी कधीच तुला उपदेश करणार नाही."

चिक्कूला आपल्या मित्राची दया आली. त्यानं आपल्या मित्राला वाचवलं. त्या दिवसापासून त्या दोघांची पक्की मैत्री झाली. गावातले लोक आता त्यांना त्यांच्या रवी आणि चंदू या ख-या नावानं ओळखू लागले, कारण आता दोघेही बदलले होते ना!

तामीळनाडूतील लोककथा



© Katha Jharna 2008

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju

चांदोबा कुठे गेला

कन्नम्माने आपलं तोंड दुसरीकडे फिरवलं. तिच्या डोळ्यातून आता पाणी येणारच होतं. तेवढ्यात तिचे बाबा म्हणाले, "इतकी उदास होऊ नकोस. मी तुझ्या वाढदिवसाच्या आधीच परत येईन.

कन्नम्मानं तरी देखील वळून पाहिलं नाही. "तिकडे बघ. मंदिराच्या कळसावर पूर्ण चंद्र चमकतो आहे. हळू हळू त्याची गोलाई कमी होऊ लागेल. मग तो अर्धा होईल, आणि काही दिवसांनी नाहीसा होईल. काही दिवसांनी त्याला परत पूर्वीचा गोल आकार येईल. जेव्हा तो परत चेंडूसारखा गोल गरगरीत होईल ना, त्या दिवशी तुझा वाढदिवस आहे. पण मी त्याच्या आधीच परत येईन," बाबांनी तिची समजूत घातली.




हे तर पटण्यासारखं होतं. ती मान वळवून चंद्राकडे पाहू लागली. त्याच्या प्रकाशात कन्नम्माचे अश्रू चमकू लागले.

आता ती खूष होते आहे असं पाहून बाबा म्हणाले, "तुला माहित आहे का? लोक चंद्राचा आकार बघून, तो लक्षात घेऊनच कॅलेंडर तयार करतात."

उत्साहानेच ते पुढे म्हणाले, "तू भिंतीवर एक चौकट काढून चंद्राचा आकार कसा बदलतो त्याचं रोज चित्र का काढून ठेवत नाहीस? पाहता पाहता मी परत सुद्धा येईन."

कन्नम्माच्या डोळ्यात या विचारानं आता एक नवीन चमक आली. ती हसू लागली. तेवढ्यात आगगाडी स्टेशनवर आली. तिनं आनंदानं बाबांना निरोप दिला.

दुस-या दिवशी सकाळी कन्नम्मा आपल्या कामात दंग होती. भिंतीवर चौकट आखायची होती ना! शेजारचा तंबी पण तिला मदत करायला आला होता.



केव्हा एकदा अंधार होतो याची ती उत्सुकतेनं वाट पाहू लागली. तिचं लक्ष सारखं देवळाच्या कळसाकडेच होतं. शेवटी एकदाचा चंद्र दिसू लागला.

'हे काय! चंद्र तर आजही गोलंच आहे की! बाबा माझी चेष्टा करत होते का?' तिनं परत एकदा नीट लक्ष देऊन पाहिलं. बाबा म्हणत होते ते खरंच होतं. चंद्र गोल होता, पण पूर्णपणे गोल नव्हता.

ती भिंतीवर त्याचं चित्र काढायला गेली. कुठल्या बाजूला बरं चंद्र गोल नव्हता? ती विसरली होती. परत एकदा बघून आली आणि नीट लक्षात ठेवून तसाच आकार काढला.

दुस-या दिवशी ती चंद्र पहायला विसरूनच गेली. पण तंबी पळत पळत तिला सांगायला आला की चंद्र आणखी लहान झाला आहे. हो! आता तिला पण आठवण झाली.

तिस-या दिवशी कळसाजवळ चंद्र दिसलाच नाही. ती विचारात पडली. झोपण्यापूर्वी परत एकदा बघायला गेली. आता तिला चंद्र दिसला, पण तो कालच्यापेक्षाही लहान होता. हळू हळू भिंतीवरचा चौकोन भरू लागला.

चौथ्या आणि पाचव्या दिवशी पाऊस होता. काय करणार! दोन चौकोन रिकामेच सोडावे लागले. सहाव्या दिवशी आकाश एकदम स्वच्छ होतं. चांदण्या चमचमत होत्या. पण चांदोबाचा पत्ताच नव्हता.

कन्नम्माला आता झोप आली होती. तिला एक स्वप्न पडलं. त्यात एका राक्षसानं चंद्राला चोरून नेलं होतं. चांदोबा गेला कुठे? कदाचित तो उद्या रात्री येईल. नाही! पण तो दुस-या रात्रीही आला नाही. खरोखरच चांदोबाला कुणी चोरून नेलं होतं का?

तंबीला खात्री होती की ज्यानं कोणी चंद्राला चोरून नेलं आहे, तो त्याला नक्की परत आणून देईल. एवढ्या मोठ्या चंद्राला कोणी कसा कुठे घेऊन जाईल? आता आणखी जागण्यात काहीच अर्थ नाही. आईनं हाक मारून सांगितलं की बाबा उद्या परत येणार आहेत. त्या रात्री कन्नम्माला स्वप्नात दिसलं की बाबांनी जादूची कांडी फिरवून चंद्राला राक्षसाकडून परत आणलं आहे.

दुस-या दिवशी पहाटे ती अर्ध्या झोपेतूनच उठली. तिनं आकाशाकडे पाहिलं. अर्धा चंद्र! ती उत्साहातच ओरडली, "आई! चांदोबा परत आला! इतका आळशी झालाय की सकाळीच आला!"

चंद्र आता देवळाच्या कळसाजवळ नव्हता, तर कन्नम्माच्या डोक्यावर होता. दुरून तिला बाबा येताना दिसले. कन्नम्मा अगदी आनंदून गेली. चांदोबाही मिळाला, बाबाही आले. आता भिंतीवरचे सगळे चौकोन भरता येतील. कारण आळशी चांदोबाला आता ती सकाळीच शोधणार आहे.

निरुपमा राघवन



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

Marathi Sujata Godbole

L. S. Saraswathi S. Rajalakshmi


Artist Uma Krishnaswamy



मी कुठे आहे

बाळू नावाचं घुबड सगळ्याचं लाडकं होतं. झाडावरची पानं आणि खारूताईचं तर त्याच्यावर फारच प्रेम होतं. बाळू दिवसभर झाडाच्या ढोलीत सरळ उताणा झोपून रहायचा आणि रात्र झाली की डोळे उघडायचा. डोळे उघडले की त्याला आकाश दिसायचं आणि दूरवरची एक चांदणी.

एकदा बाळूने झोपेतच कूस बदलली. रात्री जेव्हा डोळे उघडले, तेव्हा त्याला आकाशही दिसेना आणि चांदणी पण दिसेना. त्याला दिसलं फक्त दाट जंगल आणि सशाचं घर. तो घाबरून ओरडला,
"मी हरवलोय! मी हरवलोय!"





खारूताई झोपण्याच्या तयारीत होती. बाळूचा आवाज ऐकून ती पळतच बघायला आली. तिनं पाहिलं की बाळू डोळे मिटून झोपलाय आणि म्हणतोय की "मी हरवलोय! मी हरवलोय!"

खारूताई त्याला रागावून म्हणाली, "बाळू, ही रे कसली चेष्टा! तू तर तुझ्या रोजच्या जागेवरच झोपलायस की! खारूताईचा आवाज ऐकल्यावर बाळूच्याही लक्षात आलं की तो त्याच्या जागेवरच आहे.

तो म्हणाला, "मग आज आकाश हरवलेलं दिसतंय."





खारूताईनं त्याला समजावलं, "आकाश पण आपल्या जागेवरच आहे."

बाळू म्हणाला, "पण मला तर कुठे दिसत नाही."

खारूताईने बाळूचं डोकं आकाश दिसेल असं वळवलं आणि ती म्हणाली, "अरे, डोळे उघडलेस तर दिसेल ना!" बाळूने डोळे उघडले, तर आकाशही होतं आणि चांदणी पण.



"तू त्यांना आणलंस ना?"
बाळू आनंदाने म्हणाला.

"अरे, ते होतेच की!"




"मग मला का दिसत नव्हते?"

"कारण तू दुसरीकडेच पहात होतास."



आता काय झालं होतं ते बाळूच्या लक्षात आलं.

खारूताईनं त्याला सांगितलं, "आजूबाजूला आणखी खूप सगळं आहे. नीट पहा तर खरं."



बाळूने पाहिलं, वर आकाश, खाली झाडं-झुडुपं, दगड-माती, एका बाजूला सशाचं घर तर दुस-या बाजूला बदकं आणि तलाव. आता बाळूला जरा बरं वाटलं, तो खारूताईला म्हणाला, "मी कुठे आहे हे तू सांगितलंस ते बरं झालं, नाहीतर मी रात्रभर हरवलेलाच असतो."

खारूताई मग झोपायला तिच्या घरी गेली. बाळू मात्र रात्रभर आपली नजर सगळीकडे फिरवत कुठे कुठे काय काय आहे हे पहात बसला.

त्रिपुरारी शर्मा




P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

शेपूट कोणाची

58



नदीच्या काठावर एक मोठं वडाचं झाड होतं. एक दिवस एक लहानसं माकडाचं पिल्लू झाडाच्या पारंब्या पकडून झोके घेत होतं. तेव्हा त्याला फुलपाखरं उडताना दिसली. त्यांना पकडण्यासाठी माकडानं त्यांच्यावर उडी मारली.

त्याला उडी मारताना पाहून फुलपाखरं लगेच दूर उडून गेली. त्याला एकही फुलपाखरू पकडता आलं नाही. बिचारं पिल्लू! दगडावर जाऊन आपटलं.





अचानक त्याला जमिनीवर काही तरी हलताना दिसलं. माकड लक्ष देऊन पाहू लागलं. ती एक शेपटी होती. 'अरे! माझी तर शेपूट तुटली नाही ना?' माकडानं आपल्या शेपटीला हात लावून पहिला. ती तर नेहमीसारखीच होती. 'मग ही कुणाची शेपूट आहे?' असा विचार करतच माकड निघालं. तळ्यात त्याला एक मासोळी दिसली.

माकड म्हणालं, "मासोळीताई, इकडे बघ. ही तुझी शेपटी आहे का?"

मासोळी म्हणाली, "ही माझी शेपटी कशी असेल? शेपूट नसेल, तर मला पाण्यात पोहताच येणार नाही."

असं म्हणून मासोळीनं सुर्रकन पाण्यात उडी मारली. छोट्या माकडाला काहीच समजेना. "टक...टक... " जवळच्या झाडावरून आवाज आला. झाडावर बसला होता एक सुतारपक्षी.

माकड: अरे, तुझी शेपूट कुठे हरवली आहे का?

सुतारपक्षी: नाही. ही बघ माझी शेपटी. तिच्याशिवाय मला झाडावर बसून चोच कशी मारता येईल?

मग ही कुणाची बरं शेपूट असेल? माकड असा विचार करत होतं, तेवढ्यात धप्प... असा आवाज आला आणि एका खारूताईनं झाडावरून उडी मारली.



माकड: हे बघ खारुताई, माझ्याकडे एक शेपटी आहे, तुझी तर नाही ना?

खारूताई: ही बघ माझी सुंदर शेपूट. ती आहे म्हणून तर मला तिचा पॅराशूट सारखा उपयोग करून उंच झाडावरून उडी मारता येते.

तुर...तुर...तुर... तेवढ्यात कुणाच्या तरी पळण्याचा आवाज आला. माकडानं वळून पाहिलं तर एक ससा आपल्या पिलांना घेऊन बिळाकडे पळत निघाला होता.

माकड: अरे तू असा का पळतोस?


ससा: अरे पानांची सळसळ ऐकून मी घाबरलो. मला वाटलं की कोल्हाच आला.

माकड: हे बघ, ही तुझी शेपूट आहे का?

ससा: नाही नाही. ही काय माझी शेपूट. माझ्याकडेच तर आहे.

माकड: हे काय? तुझ्या शेपटीवर पांढरे ठिपके आहेत?

ससा: अरे, जंगलात कोल्हे, लांडगे, सगळेच आम्हाला शोधत असतात. आमचा भुरकट रंग शत्रूला चटकन दिसत नाही. जेव्हा धोका असेल, तेव्हा मी माझी शेपटी वर उचलून पुढे पळतो, आणि माझी पिल्लं माझ्या शेपटीचा पांढरा रंग पाहून माझ्यामागे पळत येतात.



शेपटीचा असाही एक उपयोग असतो तर! छोटं माकड आणखीच गोंधळून गेलं. तेवढ्यात माकडाला दिसली एक पाल. तिला शेपूटच नव्हती.

माकड: तुझी शेपूट हरवली आहे ना? पण काळजी करू नकोस. ही बघ तुझी शेपूट.

पाल: पण मला आता माझी शेपूट नकोच आहे.

माकड: काय! तुला शेपूट नको? शेपटीशिवाय मासोळीला पोहता येत नाही, सुतारपक्षाला झाडावर उभं राहता येत नाही, खारूताईला उडी मारता येत नाही, ससा आपल्या पिल्लांना शत्रूपासून वाचवू शकत नाही. इतकंच नाही, तर मी सुद्धा माझ्या शेपटीशिवाय झाडावर झोके घेऊ शकत नाही.

पाल: मला शेपटीची गरज नाही असं कोण म्हणतंय. काल मला सापानं पकडलं होतं. शेपूट टाकून मी तर पळून गेले. बिचा-या सापाची जिरली! तुटलेली शेपटी तर आता मी परत चिकटवू शकत नाही ना! पण तू नको काळजी करू. मला नवी शेपूट आपोआप परत येईल.

चला बरं झालं. आता माझी धावपळ तरी संपली. प्रत्येकाच्या शेपटीचा आपला वेगळाच उपयोग! असं म्हणत माकडानं एक मोठा श्वास घेतला आणि आनंदानं फांदीला धरून परत झोके घेऊ लागला.



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

Marathi Sujata Godbole

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Artist S. P. Raju

जत्रा

त्या दिवशी आमच्या वर्गातील सर्व मुले आनंदात आणि उत्साहात होती. शाळा सुटल्याची घंटा वाजल्याबरोबर मी धावतच घरी गेलो. आईला विचारलं, "आई! आई! पुढल्या आठवड्यात आमच्या शाळेतर्फे एक शिबीर भरणार आहे. कमला, रहीम, सगळे जाणार आहेत. मी पण जाऊ ना?"

आईनं विचारलं, "पण हे शिबीर कुठे भरणार आहे?"

मी म्हटलं, "शेजारच्या गावात. तिथे एक मोठी जत्रा भरणार आहे. आजूबाजूच्या गावातले खूप लोक येतील. तिथे राहून आम्ही त्यांना मदत करणार आहोत."



रविवार उजाडला. सगळे आपलं सामान घेऊन बसमध्ये जाऊन बसले. सगळ्यांचे आई-वडील मुलांना पोचवायला आले होते. बस सुरू झाल्यावर सगळ्यांनी त्यांना टा...टा.. केला. गावी पोचेपर्यंत आम्ही सगळे गाणी गात होतो. लवकरच आम्ही गावात पोचलो.

बाप रे! जिकडे पहावं तिकडे सगळीकडे गर्दीच गर्दी होती! रस्त्याच्या दोन्ही बाजूना दुकानं लागलेली होती. आम्ही हे सर्व पहात पहातच मैदानात पोचलो. तिथे तंबू ठोकलेले होते आणि त्यात आमची रहायची सोय होती. त्या दिवशी आम्हाला सगळ्यांना वेगवेगळी कामं वाटून देण्यात आली.

रात्रीच्या जेवणाच्या वेळेस कमला म्हणाली, "मला काय काम दिलं आहे माहित आहे का? इस्पितळात डॉक्टराना मदत करायची आहे."

रहीम म्हणाला, "मला वाहतूक पोलिसांना मदत करायला जायचं आहे." मी म्हणालो, "मला नव्या लोकांना रस्ता दाखवायचं काम दिलं आहे."


दुस-या दिवशी सकाळी आम्ही सगळे लवकर उठलो. जेवणाचे डबे घेऊन आपापल्या कामाच्या ठिकाणी पोचलो. दिवस खूपच गडबडीत गेला.



संध्याकाळी मी आणि रहीम गप्पा मारत तंबूकडे परत येत होतो. समोर एक म्हाता-या बाई देवळाच्या पाय-या चढत होत्या पण त्यांना चढायला त्रास होत होता. मी त्यांना हात धरून हळू हळू पाय-या चढायला मदत केली. रहीम त्यांचं सामान उचलून घेऊन आला.

आजींना देवळापर्यंत पोचवून मी आणि रहीम खाली येत होतो, तेवढ्यात "अरे! वाचवा...वाचवा...!" असं कोणीतरी ओरडत असलेलं आम्हाला ऐकू आलं. आम्ही दोघेही दचकलो आणि आवाजाच्या दिशेनं धावत गेलो. तेव्हा आम्हाला दिसलं की एक लहान मुलगा खेळता खेळता तळ्यात पडला होता.

रहीमला चांगलं पोहता येतं. एका क्षणाचाही विचार न करता त्यानं तळ्यात उडी घेतली. जोरात पोहत जाऊन त्यानं मुलाला पकडलं आणि लगोलग तळ्याच्या काठावर घेऊन आला. आम्हाला शिकवलं होतं त्याप्रमाणे आम्ही मुलाला पालथं झोपवलं आणि त्याच्या पाठीवर दाब दिला.



मुलाच्या पोटात फारसं पाणी गेलं नव्हतं ते बरंच झालं. मुलाच्या आई-वडिलांनी त्याला उचलून घेतलं आणि आम्ही सगळे त्याला जवळच्या इस्पितळात घेऊन गेलो.

डॉक्टरांनी मुलाला तपासलं आणि म्हणाले, "तुम्ही योग्य वेळीच मदत केलीत, आता घाबरण्याचं काहीच कारण नाही." मुलाच्या आई-वडिलांनी आमचे आभार मानले आणि ते मुलाला घेऊन गेले.


इस्पितळात कमला डॉक्टराना मदत करत होती. मग तिचं काम झाल्यावर आम्ही तिघे चालत चालत तंबूकडे परत आलो.


त्या रात्री बराच वेळ आम्ही दिवसभरातल्या गोष्टींबद्दलच बोलत होतो.



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist S. P. Raju





चला ओळखूया...


पानं आहेत पण फांदी नाही
फुलं आहेत पण वास नाही
फळ आहे पण बी नाही
बुंधा आहे पण लाकूड नाही

फुलं याची मोत्यासारखी
फुटभर लांबीची शेंग हिरवी
आमटीला देई स्वाद खास
मग ताकद येईल भारंभार

झाड मोठं, पानं छोटी, फळं आंबट शेंगेसारखी
सावली इतकी मोठी, की आरामात झोपेल हत्ती

उंच झाड, चिंचेसारखी पानं
मोठी बी, आंबट याचं गोल फळ
ठासून भरलंय जीवनसत्व क
आजार पळवतो, घट्ट मुटट बनवतो


कडू साल, कडू पानं, कडू त्याचं शरीर,
दात करतो मजबूत, उपयोग आहेत भरपूर



उंच झाड त्याला काटे फार
डोक्यावर त्याच्या फूल लाल
कळीतून होतो जणू बर्फाचा वर्षाव
गाद्या उशा गुबगुबीत बनतात

उभा राहतो सरळ सोट
पितो पाणी जमिनीतलं
आम्हाला पाजतो पाणी
घेऊन घडे डोक्यावर

उंच आहे झाड, पानं त्याची सगळ्यात वर
वास असा दरवळतो, सर्दी पडसं पळवून लावतो



छोटं झाड काटेरी
फळ पिवळं आंबट रसदार
पान सुवासिक हिरवंगार
सरबत माझं फारच खास



उन्हाळ्यात एका झाडाला फळं येतात हिरवी- पिवळी

हिरव्याचं करतात लोणचं, पिवळ्याला म्हणतात फळाचा राजा

असं नवल पाहिलंत का

एका झाडाला खांब हजार

पानं त्याची छोटी छोटी, फांदी याची काटेदार

पिवळी छोटी फुलं आली की दिसतं मोठं बहारदार

खूप मोठं झाड, फळं त्याची जांभळी

एकदा का पडलं कपड्यावर, तर डाग जाणार नाही कधी

वसंत ऋतूत येतात याला


फळं हिरवी, लाल आणि काळी

रेशमाचा किडा वाढतो त्यावर

सांगा त्याचं नाव काय

हृदयाच्या आकाराची पानं याची

सावली असते गारेगार



मुलांना माझी फळं आवडतात, हिरवी किंवा पिवळी
हळूच पोपट खाऊन जातो, बिया यात भारी

सावली देते सगळ्यांना शहरात किंवा गावात
लाल रंगाचा शृंगार माझा, तीच माझी शान

मि-यासारखं बी, पंख्यासारखं माझं पानं,
कच्चं तोडलं तर चीक गळतो, सांगा मी कोण

झाड माझं खूप मोठं
फळ लहान, पान मोठं
डोळ्याच्या आकाराचं बी माझं
खाऊन व्हाल ताकदवान



पोपई, केळे, आंबा, शेवरी, आवळा, पिंपळ, लिंबू, वड,
पेरू, चिंच, कडुलिंब, जांभूळ, बदाम, गुलमोहर, तुती,
नारळ, बाभूळ, शेवगा, निलगिरी

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

अकबर आणि बिरबल

एक दिवस अकबराचा मंत्री बिरबल दरबारात उशिरा आला, म्हणून अकबराला फार राग आला होता.

अकबर: आज इतका उशीर का केलास?

बिरबल: महाराज, मी रोजच्या सारखा वेळेवरच निघालो होतो. पण त्याच वेळी माझा मुलगा रडायला लागला. त्याची समजूत काढण्यात वेळ गेला.

अकबर: मला काय मूर्ख समजतोस का? एका लहान मुलाला गप्प करायला इतका वेळ लागतो का?




बिरबल: हो महाराज! रडणा-या मुलाला गप्प करणं फारच कठीण असतं.

अकबर: छे! त्यात काय कठीण! मी रडणा-या मुलाची एका क्षणात समजूत काढून दाखवेन.

बिरबल: असं म्हणत असाल तर करूनच पाहूया. आपण एक नाटक करूया. मी होतो लहान मूल आणि तुम्ही माझे वडील व्हा.

अकबर: चालेल. मी तयार आहे.

अकबराच्या चेह-यावर आता उत्साह दिसत होता. बिरबल जमिनीवर लोळत रडायला लागला.



अकबर: बाळा, तू का रडतोस?

बिरबल: उंSSSS उंSSSS मला ऊस पाहिजे.

अकबर: रडू नको. तुला ऊस हवाय ना? आत्ता आणून देतो.




अकबरानं आपल्या नोकरांना ऊस आणायला पाठवलं. थोड्याच वेळात ते ऊस घेउन आले. ते पाहून बाळ परत जमिनीवर हात-पाय आपटून रडू लागलं.

अकबर: आता का रडतोस? ऊस आणलाय ना?

बिरबल: उंSSSS उंSSSS मला उसाचे लहान लहान तुकडे करून हवेत. असा नको.

अकबर: एवढंच ना! आत्ता उसाचे तुकडे करून देतो.

नोकरांनी उसाचे लहान लहान तुकडे केले. मुलाने ते तुकडे फेकून दिले आणि परत जोरात रडायला लागला. अकबराला आता काहीच समजेना.



अकबर: आता का रडतोस? तुला हवे तसे उसाचे तुकडे तर करून दिले होते.

बिरबल: उंSSSS उंSSSS आता ते तुकडे जोडून परत सबंध ऊस करून द्या.

अकबर: (चिडून) अरे! कापलेले तुकडे परत कसे जोडता येतील?

बिरबलाला काय म्हणायचं होतं ते आता अकबराच्या चांगलं लक्षात आलं होतं.

अकबर: तू म्हणतोस ते बरोबर आहे. मुलांची समजूत काढणं ही काही सोपी गोष्ट नाही.

बिरबल हसला आणि आपल्या कपड्यावरची धूळ झटकत उठून उभा राहिला.



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju

सुनंद राजाचा त्याग


62





गंगा नदीच्या काठावर एक मोठं आंब्याचं झाड होतं. त्याचे आंबे खूप गोड आणि चवदार होते. रोज रात्री माकडांची एक टोळी तिथे येऊन मनसोक्त आंबे खायची.






एक दिवस सुनंद या माकडांच्या राजानं सगळ्यांना सावध करून सांगितलं, "हे पहा! झाडाची एक फांदी नदीवर कलली आहे. त्या फांदीवरचा एकही आंबा नदीत पडू देऊ नका. तसं झालं तर त्यातून आपल्यावर मोठंच संकट येईल."



माकडांनी हे नीट लक्षात ठेवलं. पण तरीही एक दिवस फांदीवरचा एक आंबा नदीत पडला. नदीत मासे पकडायला आलेल्या कोळ्यांना तो सापडला. कोळ्यांनी तो राजाला भेट म्हणून दिला.

आंबा खाल्यावर राजा म्हणाला, "हा आंबा तर फारच स्वादिष्ट आहे. असे आंबे कुठे लागतात? चला आपण त्याचा शोध घेऊया." राजा आपल्या शिपायांना घेऊन निघाला आणि झाडापर्यंत येऊन पोचला. सगळ्यांनी थोडे आंबे खाल्ले आणि रात्री तिथेच मुक्काम करायचं ठरवलं.




रोजच्याप्रमाणे माकडांची टोळी रात्र झाल्यावर तिथे आली. सगळ्यांनी आनंदानं आरडाओरडा करत उड्या मारत आंबे खायला सुरुवात केली. त्यांच्या आवाजानं राजा जागा झाला. राजानं आदेश दिला, "ही जागा सर्व बाजूंनी घेरा आणि सगळ्या माकडांना मारून टाका."

सगळे शिपाई आपले धनुष्यबाण उचलून तयार होऊ लागले. ते पाहून माकडं भीतीनं थरथर कापू लागली. धावतच ते सुनंद राजाकडे गेले.

सुनंद म्हणाला, "भिऊ नका. मी तुम्हाला वाचवेन." जवळच्याच झाडातून त्यानं एक लांबलचक वेल उपटून आणला.

त्याचं एक टोक त्यानं झाडाला बांधलं आणि दुसरं टोक बांधलं आपल्या कमरेला. मग एक जोरदार उडी मारून नदीच्या दुस-या किना-यावर पोचण्याचा प्रयत्न केला. "अरे! हे काय! वेलाची लांबी पुरेशी नाही! मग त्यानं झाडाची एक फांदी पकडून ठेवली. आणि एक पूल तयार झाला.



सुनंदनं सगळ्या माकडांना सांगितलं, "लवकर या! या वेलाला पकडून माझ्या पाठीवर चढा आणि पलीकडच्या बाजूनं उडी मारून पळून जा."

एक एक करून सगळी माकडं आपल्या राजाच्या पाठीवर चढून पळून गेली. शेवटच्या माकडाचं सुनंदशी भांडण होतं. त्यानं इतक्या जोरात उडी मारली, की सुनंद जखमी झाला.


माकडांचं काय चाललंय ते राजा दुरून पहात होता. तो म्हणाला, "हे माकड महान आहे. याला मारणं म्हणजे अन्याय होईल. याला झाडावरून खाली उतरवा." सैनिकांनी लगेच त्याला खाली काढलं आणि जमिनीवर झोपवलं.

राजा सुनंदाला म्हणाला, "तू एक महान नेता आहेस. तू आपल्या जिवाची देखील पर्वा न करता सर्व माकडांना वाचवलंस. असा त्याग मी कधीच पहिला नव्हता."

सुनंदनं उत्तर दिलं, "माझे साथीदार माझ्यावर अवलंबून होते. ते खूप घाबरले होते. एका चांगल्या राजाचं आपल्या प्रजेवर स्वत:च्या जिवापेक्षाही अधिक प्रेम असायला हवं." असं म्हणून सुनंदनं प्राण सोडला.

बनारसचा राजा हे ऐकून फार प्रभावित झाला. त्यानं तेव्हापासून आपल्या प्रजेच्या हितासाठीच काम करायला सुरुवात केली.

जातक कथा



© Katha Jharna 2008

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

तेनालीराम आणि जादूगार



विजयनगरला एक दिवस एक जादुगार आला. राजाच्या महालात त्याने निरनिराळ्या प्रकारचे जादूचे प्रयोग करून दाखवले. एक रिकामी टोपली घेऊन ती उलटी घातली. आणि लगेच उचलली, तर काय चमत्कार! तिथे एक आंब्याचं रोप होतं! सगळ्यांनी टाळ्या वाजवून त्याचं खूप कौतुक केलं.

दुस-या वेळी त्याने मूठभर खडे हातात घेतले आणि एका मिनिटातच त्यांच्या सोन्याच्या मोहरा झाल्या. इतकंच नाही, तर राजाची अंगठी आपल्या बोटात आणून दाखवली.



एका रिकाम्या पिंज-यावर त्याने एक चादर घातली आणि लगेच ती काढून झटकली, आणि पिंज-याचं दार उघडल्यावर त्यातून एक पोपट उडून बाहेर गेला! त्याची हुशारी पाहून राजा खूष झाला आणि चांदीच्या मोहरा भरलेली एक थैली त्याला बक्षिस दिली.

पण जादुगाराचा उद्देश काही निराळाच होता. त्याला राजाच्या दरबारातील हास्यकवी तेनालीरामचा अपमान करायचा होता. त्याने दरबारात सर्वांना एक आव्हान दिलं की दरबारातील कोणी जर त्याला हरवलं, तर त्याला मिळालेली सर्व बक्षिसं तो त्याला देईल. पण जर तो जिंकला, तर तेनालीरामला त्याच्या ताब्यात द्यावं लागेल.

जादुगाराचं आव्हान स्वीकारायला कोणीच पुढे येईना. राजाही आता अस्वस्थ दिसू लागला.

तेनालीरामानं विचार केला, 'याला फार गर्व झालेला दिसतो. त्याला आता चांगलाच धडा शिकवायला हवा.'

तेनालीराम पुढे आला आणि म्हणाला, "जादुगार साहेब, तुम्ही आम्हाला बरेच चमत्कार करून दाखवलेत. पण तरीही मी तुमचं आव्हान स्वीकारायला तयार आहे. पण माझीही एक अट आहे.




मी जे काही डोळे मिटून करेन, ते तुम्हाला डोळे उघडे ठेवून करावं लागेल."

जादुगार लगेच तयार झाला. मग तेनालीरामनं जवळच्याच फुलाच्या कुंडीतून एक मूठभर माती घेतली. आपले डोळे मिटले आणि सगळी माती डोळ्यावर टाकली. शेवटी ती माती रुमालानं पुसून टाकली.



त्यानंतर तेनालीराम म्हणाला, "मी आता जे केलं ते तुला दोन्ही डोळे उघडे ठेवून करावं लागेल." जादुगारापुढे मोठंच संकट उभं राहिलं. त्याने लाजेनं आपली मान खाली घातली आणि तिथून निघून गेला.

हे पाहून राजा खूष होऊन म्हणाला, "बरं झालं. तेनालीरामनं ही चांगली युक्ती काढली." राजाने मग तेनालीरामला अनेक बक्षिसं देऊन त्याचा गौरव केला.



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi


Marathi Sujata Godbole

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Artist S. P. Raju




अप्पूची चिंता



अप्पू एक लहानसा हत्ती होता. एक दिवस तो एकटाच उदास होऊन बसला होता. खेळायला देखील बाहेर गेला नाही. म्हणून त्याच्या सगळ्या मित्रांना काळजी वाटू लागली. अप्पूला काय बरं झालं असेल? झाडावरल्या खंड्या पक्षानं त्याला विचारलं, "अप्पू, तुला कसली चिंता आहे? मला सांग तरी." पण अप्पूनं काहीच उत्तर दिलं नाही.

खंड्या म्हणाला, "मला माहित आहे. तुझी सोंड इतकी लांब आहे, तिची तुला लाज वाटते ना?"

अप्पू लगेच म्हणाला, "नाही नाही! मला माझी सोंड खूपच आवडते. तिच्यामुळे तर मी किती तरी कामं करू शकतो."



मग माकड म्हणालं, "तुला तुझी शेपूट लहान आहे म्हणून वाईट वाटतंय का? माझ्यासारखे झाडाच्या फांद्यांवर झोके घेता येत नाहीत म्हणून तू उदास आहेस ना?"




अप्पू म्हणाला, "नाही नाही! माझी शेपूट लहान आहे, पण फारच कामाची आहे."

हरीण म्हणालं, "तुझे पाय फार जाडजूड आहेत त्याची तुला चिंता वाटते का? तुझे पाय माझ्यासारखे बारीक आणि सुंदर का नाहीत असंच तुला वाटतंय ना?"

"नाही. असं काही नाही. मला माझे पाय सुंदरच वाटतात." अप्पूनं उत्तर दिलं.

मोरानं विचारलं, "तुझा काळसर रंग तुला आवडत नाही का? माझ्यासारखे सुंदर रंग तुला का नाही मिळाले याचंच तुला वाईट वाटतंय ना?"



अप्पूनं मान हलवली. "नाही, नाही! माझ्या रंगाबद्दल माझी काहीच तक्रार नाही. उलट हा काळसर रंगच मला शिका-यांपासून वाचवतो."




माकड म्हणालं, "असं आहे तर मग बाहेर ये ना! इथे खूप ऊस आहे. आपण सगळे मिळून मजेत खाऊया."

"मी फार लठ्ठ आहे. म्हणून मला आता काहीच खायचं नाही आहे." असं म्हणून अप्पू एकदम रडायलाच लागला.

"अरे, एवढंच ना? खरं म्हणजे हत्तीनं ताकदवान असायलाच हवं. तू काही एवढा लठ्ठ नाहीस." हरणानं अप्पूची समजूत घालायचा प्रयत्न केला.

"लठ्ठ तर मी आहेच ना! तीन दिवस मी काहीच खाल्लं नाही. उपवास केला, तरी देखील मी बारीक झालो नाही." अप्पू दु:खी होऊन म्हणाला.

तेवढ्यात एक आवाज आला, "वाचवा! वाचवा!" सगळे आवाजाच्या दिशेकडे धावले. तिथे वाघाच्या अंगावर एक झाड पडलं होतं. वाघ दु:खानं ओरडत होता.




मा‍कड, हरीण, मोर, खंड्या, सगळ्यांनी झाड दूर करायचा प्रयत्न केला, पण कुणालाच ते जमलं नाही.

"अरे, काही करून वाघाला वाचवायला हवं." असं म्हणत सर्वजण अप्पूला तिथे घेऊन आले. अप्पूनं झाड ढकलायचं खूप प्रयत्न केला, पण झाड हललं देखील नाही. तीन दिवस त्यानं काही खाल्लं नव्हतं ना! म्हणून त्याला झाड हलवता येईना.

सगळे मित्र म्हणाले, "हे घे. ऊस खा, मग तुला झाड उचलता येईल." "हो, बरोबर आहे. तीच तर माझी ताकद आहे." असं म्हणून अप्पूनं घाईघाईने सगळा ऊस खाल्ला. मग काय! उत्साहानं लगेच त्यानं झाड बाजूला केलं. सगळ्या प्राण्यांना आनंद झाला ते म्हणाले, "आता समजलं. तूच तर सगळ्यात ताकदवान आहेस." अप्पूही आता खूष झाला! आपली सोंड उभारून आनंदानं चित्कार करू लागला.

पारो आनंद यांच्या गोष्टीवर आधारीत



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

राजा कोण असावा?

एक दाट जंगल होतं. त्यात सगळे प्राणी एकमेकांशी प्रेमाने वागत होते आणि आनंदात रहात होते. सिंह त्यांचा राजा होता. तो खूप बलवान आणि हुशार होता. जंगलात ज्या काही अडचणी येतील, त्या घेऊन सगळे प्राणी सिंहाकडे जात असत. आणि सिंह त्यावर हुशारीने तोडगा काढत असे. सर्व प्राण्यांना सिंहाबद्दल मोठाच आदर आणि विश्वास वाटत असे.

एक दिवस काही शिकारी जंगलात आले आणि त्यांनी जनावरांचा पाठलाग केला. जंगलात यामुळे फारच गडबड उडाली आणि घाबरलेले प्राणी घाईघाईने सिंहाकडे आले.


परिस्थिती गंभीर आहे हे सिंहाच्या लक्षात आलं. त्याने प्राण्यांना सांगितलं, "शत्रू मोठा ताकदवान आहे. तुम्हाला त्याच्याशी लढता येणार नाही. तुम्ही सगळे इथेच थांबा. मी त्यांचा समाचार घेऊन येतो."



सिंहाने शिका-यांवर हल्ला केला. तेव्हा काही पळून गेले तर काहींनी सिंहावर हल्ला केला. सिंह त्यांच्याशी खूप शौर्याने लढला आणि अखेर तोच जिंकला.

सर्व प्राणी सिंहाचे आभार मानण्यासाठी धावतच त्याच्याकडे गेले. अरे पण हे काय झालं? सिंह दु:खाने विव्हळत होता. तो चांगलाच जखमी झाला होता. शिका-यांनी त्याच्यावर इतके वार केले होते की त्यामुळे सिंहाच्या पायांवर खूप जखमा झाल्या होत्या. ते पाहून सर्वच प्राण्यांना अतिशय वाईट वाटले.

बरेच दिवस झाले तरी सिंहाचे पाय बरे होत नव्हते. मग त्याच्यासाठी चाकाची खुर्ची आणली. तिच्यावरून तो इकडे तिकडे फिरू लागला. पण आता त्याला शिकार करता येत नव्हती. सर्वजण त्याच्यासाठी जेवण आणून देऊ लागले.




काही दिवसांनी त्यांना कंटाळा येऊ लागला. सिंहाची सेवा करणं हे मोठंच ओझं आहे असं त्यांना वाटू लागलं. काही प्राणी आपलं काम टाळू लागले. काहीजण आपल्या अडचणी घेऊन सिंहाकडे येईनासे झाले.

सिंह मात्र सर्वांशी नेहमीच्याच उत्साहाने बोलत असे. त्याच्यासाठी जेवण आणणा-या जनावरांची तो वाट पहात असे. जंगलात घडणा-या सर्व गोष्टींची त्यांच्याकडून माहिती घेत असे. आपल्या सर्व जबाबदा-या तो पूर्वीप्रमाणेच पार पाडत असे.

एक दिवस जंगलात अचानक शांतता पसरली. एकही प्राणी कुठेच दिसेना. सिंहाला याचं फारच आश्चर्य वाटलं. आपल्या चाकाच्या खुर्चीवर बसून हळू हळू तो सर्वांना शोधायला बाहेर पडला.

एका ठिकाणी सर्व प्राण्यांची एक सभा भरली होती. ते पाहून सिंहाला धक्काच बसला. एका झाडामागे लपून तो त्यांचं बोलणं ऐकू लागला.



एकजण म्हणाला, "मला वाटतं आता आपल्याला एक नवा राजा निवडावा लागेल."

दुसरा म्हणाला, "का म्हणून? सिंहच आपला राजा का नाही राहू शकणार?" आणखी कोणी म्हणालं, "सिंहाकडे आता आपलं रक्षण करण्याइतकी ताकद राहिली नाही."

"का शारीरिक शक्ती म्हणजेच सगळं काही असतं का? सिंहाची बुद्धी चांगली शाबूत आहे. त्याला खूप मोठा अनुभव देखील आहे." एका म्हाता-या प्राण्यानं आपलं मत मांडलं.

"हो! सिंहकाका नेहमीच योग्य न्याय देतात. तेच आपले राजा असले तर बरंच होईल." एका लहानशा प्राण्यानं आपला विचार मांडला.

त्यानंतर मग सर्व प्राण्यांनी आणखी काही वेळ विचार-विनिमय केला. अखेर सर्वांनी सिंहच आपला राजा असावा असा निर्णय घेतला. आणि मग सर्वजण मिळून सिंहाच्या गुहेकडे जायला निघाले.

'विद्यासागर' (चेन्नई)
मुलांच्या एका नाटकावर आधारीत



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist S. P. Raju


मधमाशीचा फेरफटका

एका बागेत मधमाशांचं एक कुटुंब रहात होतं. त्यातली सर्वात छोटी मधमाशी खूप धीट आणि उत्साही होती. तिचं नाव होतं जीजी.

जीजीला सगळं जग पाहण्याची आणि समजून घेण्याची इच्छा आणि उत्सुकता होती. एक दिवस झाडावरून उडता उडता ती बरीच दूर गेली. वाटेत एका ठिकाणी तिला खूप सुरेख वास आला.

तो वास कुठून येतोय ते शोधता शोधता ती एका तळ्याकाठी जाऊन पोचली. तळ्यात खूप सुंदर कमळं उमलली होती. तिनं एकदम एका कमळावर उडी मारली.

नाजूक कमळ त्या धक्क्यानं कापू लागलं. ते जीजीला रागावून म्हणालं, "वेडी कुठली! तू माझ्या पाकळ्यावर इतक्या जोरात का उडी मारलीस? जा, आता मी तुला मध देणारच नाही."





मधमाशी झटकन तिथून निघाली आणि झाडावर जाऊन बसली. तिथे तिला एक कोळ्याचं जाळं दिसलं. तिनं कोळ्याला विचारलं, "कमळ मला मध देत नाही. मी काय केलं म्हणजे ते मला मध देईल?"

कोळ्यानं जाळं विणता विणता उत्तर दिलं, "कदाचित त्यालाही माझ्यासारखीच माशी आवडत असेल."



जीजी परत कमळाकडे गेली आणि त्याला विचारलं, "तू मला माशीच्या बदल्यात मध देशील का?" कमळ चांगलंच रागावलं आणि म्हणालं, "काय? कमळ कधी माशी खातं का?"

मग जीजी आणखी उंच उडाली आणि ढगापाशी जाऊन पोचली आणि तिनं ढगाचा सल्ला घेतला. ढग म्हणाला, "झाडांना आणि फुलांना पाऊस खूप आवडतो. कदाचित कमळ पावसाच्या थेंबांची वाट पहात असेल.”

जीजी परत कमळाकडे आली आणि त्याला विचारलं, "तुला काय हवंय ते मला माहित आहे. तुला पावसाचे थेंब हवे आहेत ना?" कमळ म्हणालं, "मला तळ्यातलं हवं तेवढं पाणी मिळतं. मला तुझ्या पावसाचं पाणी नकोच आहे."

दु:खी होऊन जीजी परत उडून गेली. झाडाच्या फांद्यांमधून सूर्याची किरणं चमकत होती. मग जीजीनं सूर्यकिरणांचा सल्ला घेतला.





सूर्य म्हणाला, "कमळाच्या पाकळ्या सूर्याला पाहूनच उमलतात. कमळाला विचार की त्याला सूर्याची उष्णता हवी आहे का?"

जीजी आनंदाने परत उडत निघाली आणि कमळाकडे आली, त्याला विचारलं, "तुझ्यासाठी सूर्याची किरणं आणून देऊ का?"

कमळ म्हणालं, "सूर्याची किरणं तर माझे मित्रच आहेत. त्यांच्यामुळेच तर मी उमलतो."

जीजी आता चांगलीच दमली होती. ती एका झाडावर जाऊन बसली. तिथे तिला भेटलं एक घुबड. तिनं त्याला पण कमळाबद्दल विचारलं. म्हणाली, "तुला तर जगातलं सगळंच माहित असतं. कमळ मला मध देईल अशी काही तरी युक्ती सांग बरं."

घुबडानं मधमाशीच्या कानात काही तरी सांगितलं. झाडांच्या फांद्या, पक्षी, किरणं, सर्वांनी घुबड काय सांगतय ते ऐकायचा प्रयत्न केला, पण कुणालाच काही ऐकू आलं नाही.

जीजी आनंदानं उडत उडत परत कमळाकडे आली. हळूच येऊन अलगद कमळावर बसली. प्रेमानं कमळाकडे मध मागितला. कमळ हसलं आणि आनंदानं आपल्या पाकळ्या उघडल्या. जीजीला मध दिला आणि म्हटलं, "आज तू जगातली सर्वात महत्त्वाची गोष्ट शिकली आहेस. सर्वांशी नेहमी प्रेमानं आणि नम्रपणे वागावं, बोलावं."

शोभिता पुंज यांच्या लोककथेवर आधारीत



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy


असे होते गांधीजी

त्या दिवशी ऑक्टोबरची २ तारीख होती म्हणजे गांधीजींचा जन्मदिवस. त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी मी आणि माझा लहान भाऊ फुलांचा हार घेऊन निघालो होतो.

आश्रमात खूपच गर्दी होती. सर्वांनी खादीचे कपडे घातले होते. काहींनी खादीची टोपी देखील घातली होती.

आम्ही दोघे गांधीजींजवळ गेलो. त्यांचे अभिनंदन करून त्यांना हार घातला.

गांधीजींनी आम्हाला हसत हसत विचारलं, "पुढच्या वर्षी मला याहून चांगली भेट द्याल ना?"



मी विचारलं, "बापू, तुम्हाला कोणती भेटवस्तू आवडेल?"

"आपल्या हाताने चरख्यावर सूत काढून त्याचा हार बनवून आणाल?" गांधीजींनी हसत हसत विचारलं.

"पण आम्हाला तर चरखा चालवता येत नाही" माझ्या लहान भावानं लगेच उत्तर दिलं. त्यावर गांधीजी म्हणाले, "तुमचे आई-वडील तुम्हाला शिकवतील."

घरी परत येताना माझा भाऊ मला विचारु लागला, "बापू आपल्याला चरखा शिकायला का सांगत होते?"

मी त्याला समजावून सांगितलं, "परदेशी कपडे घातले, तर आपल्या देशातल्या गरीब लोकांमध्ये बेकारी वाढते. खादीमुळे लहान लहान गावातल्या लोकांना काम मिळते. म्हणून गांधीजी हाताने सूत कातून बनवलेल्या कापडाचे कपडे वापरण्याचा सल्ला देतात."




घरी गेल्याबरोबर आम्ही आईला सगळी गोष्ट सांगितली. मग आईनंही आम्हाला आणखी समजावून सांगितलं की, "इंग्रज लोकांची सत्ता हटवून गांधीजींना भारत स्वतंत्र करायचा आहे. त्यासाठीच ते खादीच्या चळवळीवर भर देत आहेत."

त्या दिवसापासूनच आम्ही चरखा चालवायला सुरुवात केली.

***

एकदा गांधीजी मदुराईला गेले होते. तिथे ते नदीवर अंघोळीला गेले. तिथे एक महिला आपल्या छोट्या बाळाला घेऊन आली होती.

ती आपली अर्धीच साडी नेसून राहिलेला अर्धा भाग धूत होती. तिच्याकडे एकच साडी होती आणि ती देखील फाटलेली.



तिची गरिबी पाहून गांधीजींचं मन हेलावलं. त्यांनी लगेच आपली शाल तिला दिली. त्यांनी विचार केला की देशात इतके गरीब लोक असताना आपण रोज निरनिराळ्या प्रकारचे शर्ट घालणे योग्य नाही. त्या दिवसापासूनच त्यांनी शर्ट घालणं बंद केलं.

***

एक दिवस साबरमती आश्रमात एक लहान मुलगा त्यांना भेटायला आला. त्यानं विचारलं, "बापू, बापू, तुम्ही शर्ट का घालत नाही? मी माझ्या आईकडून तुमच्यासाठी एक शर्ट शिवून आणू का?"

गांधीजी हसू लागले. मग त्यांनी विचारलं, "तुझी आई माझ्यासाठी किती शर्ट शिवून देईल?"

मुलगा म्हणाला, "तुम्हीच सांगा, तुम्हाला किती शर्ट हवेत?"

बापूजी प्रेमानं म्हणाले, " हे बघ बाळ, मला चाळीस कोटी भाऊ-बहिणी आहेत. काही लहान आहेत, काही मोठे. पण त्यांच्याकडे शर्ट नसताना मी एकटा कसा काय शर्ट घालणार? तुझ्या आईला इतक्या सर्वांसाठी शर्ट शिवता येईल का?"

गांधीजींना काय म्हणायचं आहे ते आता मुलाच्या लक्षात आलं. देशातल्या सगळ्या लोकांना बापू आपलं कुटुंब मानत होते. देशातले सगळेच लोक त्यांचे नातेवाईक होते. सगळेच त्यांचे मित्र होते. मग एक शर्ट शिवून त्यांचं कसं भागणार?



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation


P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju

चार मित्र



एका दाट जंगलात एक सरोवर होतं. सरोवराच्या काठावर एक हरीण, एक उंदीर, एक कावळा आणि एक कासव रहात असत. त्या चौघांची खूप छान दोस्ती होती. फक्त आपलं अन्न शोधायला ते एकटे एकटे जात असत, बाकी सगळा वेळ ते एकत्रच असायचे.

एक दिवस सर्वजण नेहमीप्रमाणे आपलं अन्न शोधायला बाहेर गेले होते. पण खूप वेळ झाला तरी हरीण परत आलं नव्हतं. मित्रांना काळजी वाटू लागली.

'हरणावर काही संकट तर आलं नसेल ना?' याचा ते विचार करू लागले. मग कावळा म्हणाला, "मी उडत जातो आणि हरणाला काय झालंय ते पाहून येतो." असं म्हणून तो दूरपर्यंत उडत गेला.

एका ठिकाणी त्याला हरीण दिसलं. ते जाळ्यात अडकलं होतं. ते पाहून कावळा घाबरला आणि त्यानं परत येऊन आपल्या मित्रांना ही बातमी दिली.



"काहीही करून हरणाला वाचवायलाच हवं. आपण लवकर तिकडे जाऊया." असं म्हणून उंदीर कावळ्याच्या पाठीवर बसला. कावळा लगेच उडत उडत त्याला हरणाकडे घेऊन गेला.

उंदराने घाईघाईने जाळं कुरतडून हरणाला सोडवलं. तोपर्यंत कासवही तिथे येऊन पोचलं. सगळ्या मित्रांना आश्चर्य वाटलं.

उंदीर म्हणाला, "अरे, तू आपली सुरक्षित जागा सोडून इथे का आलास? शिकारी आला तर कावळा उडून जाईल. मी कुठल्या तरी बिळात जाऊन लपून बसेन. हरीण जोरात पळून जाईल. पण तू तर अडकशील ना?"

कासव म्हणालं, "हरीण संकटात आहे हे समजल्यावर मी कसा तळ्यात बसून राहणार? म्हणून मी पण इथे आलो." असं तो सांगत होता, तितक्यात शिकारी तिथे आलाच. हरीण घाईघाईने पळून गेलं, उंदीर बिळात जाऊन लपला आणि कावळा उडून गेला.





आता कासव एकटंच राहिलं आणि बिचारं शिका-याच्या तावडीत सापडलं. जवळच पडलेलं वाळकं गवत घेऊन शिका-यानं कासवाचे पाय बांधून टाकले. आणि त्याला घेऊन आपल्या घराकडे निघाला. सगळे मित्र काय होतंय ते लपून पहात होते.

'आता कासवाला कसं बरं वाचवावं' याचा सर्वजण विचार करू लागले. उंदराला एक युक्ती सुचली.

तो हरणाला म्हणाला, "तू शिका-याच्या रस्त्यात जा आणि मेल्यासारखा पडून रहा. कावळा तुला चोच मारल्याचं नाटक करेल.




मग शिकारी कासवाला सोडून तुझ्याकडे येईल. मग योग्य संधी पाहून मी कासवाची दोरी तोडून टाकेन आणि कासवाला सोडवेन."

सगळ्यांनी ठरवल्याप्रमाणे व्यवस्थित काम केलं. रस्त्यात पडलेलं हरीण पाहून शिका-याला आश्चर्य वाटलं. त्यानं लगेच कासवाला जमिनीवर ठेवलं आणि हरणाकडे गेला.

पण हे काय! हरीण विजेच्या वेगानं पळून नाहीसंच झालं. शिकारी तर पहातच राहिला. मग मागे वळून कासवाला ठेवलं होतं तिकडे आला तर कासवही गायब झालं होतं.

शेवटी बिचारा शिकारी उदास होऊन हात हलवतच घरी गेला.

जातक कथा



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi


Marathi Sujata Godbole


L. S. Saraswathi S. Rajalakshmi


Artist S. P. Raju

हनुमान सूर्याशी खेळतो 69









हनुमान लहानपणी खूपच खोडकर आणि धाडसी होता. नेहमी खेळत आणि उड्या मारत असे. त्याच्या आईला, अंजनाला, त्याला संभाळणं कठीणच होत असे.

एक दिवस हनुमान खेळत होता. तेवढ्यात सूर्याची किरणं त्याच्यावर पडली. त्यानं आकाशाकडे पाहिलं, तर सूर्य एका लालबुंद चेंडूसारखा दिसत होता.



"आता मला या चेंडूशीच खेळायचं आहे," असं म्हणत त्यानं एक जोराची उडी मारली आणि तो थेट आकाशापर्यंत पोचला. सूर्याला पकडण्याचा प्रयत्न करू लागला.

सूर्याला हे अजिबात आवडलं नाही. तो जोरजोरात पळू लागला. हनुमान त्याचा पाठलाग करू लागला. जगभर दिवस - रात्र खूप जलद गतीने होऊ लागले. हनुमानाला हा खेळ म्हणजे मजाच वाटली.

गडबडून गेलेल्या सूर्यानं इंद्राची मदत मागितली. सूर्य असा घाबरलेला पाहून इंद्राला फारच राग आला. त्याने हनुमानावर आपलं वज्र फेकलं. हनुमान त्यामुळे बेशुद्ध पडला. त्याचा श्वासोच्छवास थांबला. तो आकाशातून खाली पडू लागला.

परंतु हनुमानाचा पिता वायुने त्याला योग्यवेळीच पकडलं. वायू रागाने इंद्राला म्हणाला, "तो एक लहान बालक आहे हे सुद्धा तुला दिसलं नाही का? बघ, त्याची काय अवस्था करून ठेवली आहेस."

वायुने मग एक जोराचा श्वास घेतला आणि तो जोरातच बाहेर सोडला. मग काय! सगळीकडे जोराची वादळे सुरू झाली. झाडं, डोंगर, द-या सर्व काही हलू लागले. पृथ्वीवरील लोक भयभीत होऊन सैरावैरा पळू लागले.




"जोपर्यंत माझा पुत्र श्वास घेणार नाही, तोपर्यंत जगात हवा असणार नाही." वायुने आज्ञा केली. त्याबरोबर हवा थांबली. तो आपल्या पुत्राला घेऊन पाताळात गेला.

झाडं-झुडपं, पशु-पक्षी, मानव सगळेच गुदमरू लागले. सगळे बेशुद्ध होऊ लागले. सगळीकडे शांतता पसरली.

हवा नसेल, तर सारं जगच नष्ट होईल अशी सर्व देवांना चिंता वाटू लागली. ते वायुकडे गेले आणि "इंद्राला क्षमा कर" अशी त्याला विनंती केली. त्यांनी हनुमानाला परत जिवंत केलं. शिवाय त्याला असा वरही दिला की, "तुला हवे तेव्हा तुला आकाशात उडता येईल आणि तुला हवे तेव्हा तू लहान किंवा मोठाही होऊ शकशील."

याशिवाय इंद्राने त्याला आणखी असाही वर दिला की, "वीज आणि ढगांच्या गडगडाटापासून तुला कधीही धोका असणार नाही."

सूर्यानेही वर दिला की, "अग्नी तुला कधीही स्पर्श करू शकणार नाही."





वायू म्हणाला, "केवळ शक्ती असून उपयोग नाही. बुद्धी असेल तरच शक्तीचा योग्य तसा उपयोग करता येईल."

सर्व देव म्हणाले, "चिंता करू नकोस. हनुमान अतिशय बुद्धिवान असेल."

वायुने मग हळूहळू श्वास घ्यायला सुरुवात केली. जगात परत हवा खेळू लागली. झाडं-झुडुपं, पशु-पक्षी, माणसं सर्वजण परत जिवंत झाले.



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

Marathi Sujata Godbole

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Artist Uma Krishnaswamy


तीन पिसे

एका पर्वतावर एक शिष्य आपल्या गुरूकडे रहात असे. एक दिवस तो फळं गोळा करून आणण्यासाठी जंगलाकडे निघाला होता. गुरुंनी त्याला सावध केलं, "जंगलात एक भयानक मायावी राक्षस राहतो असं म्हणतात. नीट लक्ष दे. ही तीन पिसं तुझ्याकडे ठेव. वाटेत काही अडचण आली, तर त्यांचा उपयोग करून स्वतःला वाचव."


शिष्य मोठ्या उत्साहातच निघाला. फळं गोळा करता करता किती वेळ गेला हे त्याला कळलंच नाही. अंधार पडू लागला.

तेवढ्यात त्याच्या मागून आलेल्या एका आवाजानं तो चांगलाच दचकला. मागे वळून पाहिलं, तर एक म्हातारी बाई तिथे उभी होती. ती म्हणाली, "बाळ, यावेळी अंधारात तू या जंगलात काय करतो आहेस? तू दमलेला दिसतोस. माझ्या घरी चल आणि थोडा आराम कर."

शिष्य दमलेला होता आणि त्याला भूकही लागली होती. त्याला म्हातारीचं म्हणणं पटलं. दोघेही एका महालात जाऊन पोचले. इतक्या दाट जंगलात इतका सुंदर महाल! शिष्य घाबरलाच.



"हा..हा..हा..हा..." असा एकदम कोणाच्या तरी हसण्याचा जोरजोरात आवाज येऊ लागला. मागे वळून पाहिलं तर म्हातारीच्या जागी एक अक्राळ विक्राळ राक्षस उभा होता. शिष्य भीतीने किंचाळायलाच लागला. राक्षस म्हणाला, "आज तूच माझं जेवण आहेस. मी आता तुला खाणार आहे."



यातून कसं वाचता येईल याचा शिष्य आता विचार करू लागला. तो म्हणाला, "पहा ना! मला किती माती लागली आहे. मी स्वच्छ अंघोळ करून येतो, मग मला खा." असं म्हणतच तो न्हाणीघरात गेला. गुरुंनी दिलेलं एक पीस काढलं आणि त्याला आज्ञा दिली, "जेव्हा जेव्हा हा मायावी राक्षस मला हाक मारेल, तेव्हा माझ्या आवाजात त्याला उत्तर दे." आणि तो खिडकीतून उडी मारून पळून गेला.

जेव्हा जेव्हा राक्षस हाक मारायचा, तेव्हा न्हाणीघरातून आवाज यायचा, "आलोच. आलोच."

बराच वेळ झाल्यावर राक्षसाला शंका आली. त्यानं न्हाणीघरात जाऊन पाहिलं, पण शिष्य तिथे नव्हताच. राक्षसाला अतिशय संताप आला. "केवढा हा उद्धटपणा! मला फसवतो काय? बघतोच आता कसा वाचतो ते."

असं म्हणून तो शिष्याच्या मागे धावू लागला आणि लवकरच त्याच्याजवळ जाऊन पोचला.

शिष्य तर भीतीने कापूच लागला. त्याने दुसरं पीस हातात घेतलं, आणि त्याला आज्ञा दिली, "माझ्या पाठीमागे एक मोठी नदी तयार कर." मग त्याच्यामागे एक खूप मोठी नदी वाहू लागली. आणि प्रवाहात सापडलेला राक्षस दूरवर वहात गेला. "अरे देवा! वाचलो एकदाचा!" असं म्हणून त्यानं एक मोठा श्वास घेतला.

"गड...गड...गड...गड..." असा मोठा आवाज ऐकून शिष्यानं मागे वळून पाहिलं. गड...गड...गड... असा आवाज करत राक्षसाने नदीचं सगळं पाणी पिऊन टाकलं! आणि शिष्यामागे धावला. शिष्यानं आता तिसरं पीस काढलं आणि त्याला आज्ञा दिली, "माझ्या मागे आग पेटवून दे."



मग काय! पहावं तिकडे सगळीकडेच आग पसरली. पण राक्षसावर त्याचा काहीच परिणाम झाला नाही. त्यानं नदीचं सगळं पाणी आपल्या तोंडातून बाहेर फेकायला सुरुवात केली आणि बघता बघता आग विझून गेली. जीव वाचवण्यासाठी शिष्य जोरात पळत सुटला आणि आपल्या गुरूकडे गेला. राक्षसही त्याच्या पाठोपाठ तिथे पोचला.



गुरुंना धमकी देत राक्षस म्हणाला, "तुमच्या शिष्याला माझ्या हवाली करा. नाहीतर मी तुम्हालाच खाऊन टाकेन." गुरु हसू लागले, ते म्हणाले, "जी जादू तुला येते ती मला पण येते. मी जे सांगेन तसं जर तू केलंस, तर तू जिंकलास. मग मी हा शिष्य तुला देईन."


राक्षस याला कबूल झाला. तो म्हणाला, "ठीक आहे. काय करून दाखवू?" गुरु म्हणाले, "तू एखाद्या महालाइतका मोठा होऊ शकतोस का?" मग लगेच राक्षसाने आपलं शरीर महालाइतकं मोठं केलं.

त्याची चेष्टा करत गुरु म्हणाले, "मोठं होणं ही तर सोपी गोष्ट आहे. तुला मटारच्या दाण्याइतकं लहान होता येईल का?"

"ते तर अगदीच सोपं आहे." असं म्हणून राक्षसाने एका छोट्याशा मटारच्या दाण्याचं रूप घेतलं. गुरुंनी मग तो मटारचा दाणा तोंडात टाकून गिळूनच टाकला.

तेव्हापासून हा भयानक राक्षस जगात कोणाला कुठेच दिसला नाही.

जपानी लोककथा



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy





घरटी

आपल्या आजूबाजूला आपण बरेच पक्षी पाहतो. त्यांची घरटीही वेगवेगळ्या प्रकारची असतात.

पक्षी आपल्या घरट्यात झोपतात, आराम करतात, अंडी घालतात आणि आपल्या पिल्लांचं पालन-पोषणही करतात. त्यांना उडायला शिकवतात आणि मग त्यांना बाहेरच्या जगात स्वतंत्रपणे जगण्यासाठी पाठवतात.



शिंपी हा एक कुशल पक्षी आहे. तो पानांच्या रेषांची जणू एक तार बनवून आपल्या चोचीने त्याचा दो-यासारखा उपयोग करतो आणि दोन पानं एकत्र ठेवून त्यांच्या कडा अतिशय कुशलपणे शिवून टाकतो.

मग या हिरव्या पिशवीत शिंपिण आपल्या पिल्लांचं संगोपन करते. इतर प्राण्यांना ती सहजासहजी दिसतही नाहीत.



सुगरण देखील गवत आणि पानांच्या रेषांचा उपयोग करून चांगलं मजबूत घरटं बनवते आणि ते झाडाला टांगून ठेवते.




घरट्याचा वरचा भाग गोल आणि मोठा असतो. त्यात अंडी ठेवण्यासाठी एक वेगळी खोली असते. घरट्यात जाण्यासाठीचं दार लहान असतं आणि त्याचं तोंड खाली असतं. त्यामुळे शत्रूला घरट्यात जाता येत नाही. बाहेरून त्याचा आकार एखाद्या उलट्या टांगलेल्या सुरईसारखा दिसतो.


सुतारपक्षी, घुबड आणि धनेश झाडाच्या ढोलीत राहतात. धनेश पक्षाची एक खास सवय आहे. अंडी घातल्यावर मादी घरट्यातच राहते. गवत आणि लाकडाच्या ढलप्यांनी नर ढोलीचं दार बंद करून टाकतो. मादीला चोच बाहेर काढण्यापुरतं एक छोटंसं भोक ठेवलेलं असतं.




नर पक्षी रोज चारा आणून मादीला भरवत राहतो. छोटे धनेश अंड्यातून बाहेर आले की मग नर आणि मादी दोघे मिळून चारा शोधायला बाहेर पडतात.



काही पक्षी आपली घरटी बांधतच नाहीत. मधुर सुरात गाणारी कोकिळा त्यातलीच एक आहे. ती दुस-या पक्षाच्या घरट्यात, नाही तर जमिनीवर अंडी घालते. जेव्हा ती जमिनीवर अंडी घालते तेव्हा ती आपली अंडी हळूच कावळ्याच्या घरट्यात ठेवून येते. तिची अंडी कावळ्याच्या अंड्यासारखीच दिसतात. कावळा ती अंडी आपली समजून उबवतो. जरा मोठं झालं की कोकीळेचं पिल्लू घरट्यातून उडून जातं.






खंड्या हा देखील एक हुशार आणि सुंदर पक्षी आहे. मासे पकडण्यात तरबेज! नदी, ओढे, सरोवर यांच्या काठावर तो पाण्याकडे टक लावून पाहत बसतो आणि संधी मिळाली की झटकन पाण्यात झेप घेऊन मासा पकडून उडून जातो.

किना-यावरच्या मातीत बीळ करून खंड्या आपलं घरटं करतो आणि त्याचं दार वाळलेल्या गवतानं झाकून टाकतो.

पक्षाच्या अशा प्रकारच्या खूप मजेशीर गोष्टी आहेत. त्यांच्याकडे नीट लक्ष देऊन पाहिलं तर आपल्याला त्यातून आणखीही खूप मजेदार माहिती मिळते.



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

चला ओळखूया




उन्हाळ्यात येणारं फळ, आहे मोठं रसदार
साल हिरवं पिवळं, आणि गोल आहे आकार

हिरव्या काचेच्या जणू गोट्या, घोस त्यांचा सुंदर
वेलावर असतात कच्ची, पिकतात खाली काढल्यावर



फुलताना असतो पिवळा, मग होतो लाल,
पिकला की होतो काळा, असं कसं याचं साल

डोक्यावर ठेवलाय मुकुट
अंगभर आहेत डोळे
रस भरलाय याच्या आत






बाहेर याच्या हजारो काटे, मोठा आकार, चीकही फार
कापला, सोलला, निवडून घेतले, तर गरे मात्र छानच फार

लालबुंद किंवा पिवळं
बहरतं सिमल्यात आणि काश्मिरात
लहान-मोठे सगळेच खातात
मनापासून दाद देतात

बाहेरून आहे हिरवी साल
आत रक्त लालंच लाल

लाल डबीत पिवळे कप्पे
आत ठेवलेत माणकाचे दाणे




फळ मोठं गुणकारी
येत नाही कधी एकाकी
खावं मात्र सोलून
चव चाखून चाखून



अननस, केळे, द्राक्षे, मोसंबी, सफरचंद,
फणस, डाळिंब, कलिंगड, खजूर




मातीतच लपून बसतो,
रंगही माझा मातीचा
कोणाचीही साथ करतो,
मी आहे सर्वांचा




माझं जितकं काढाल साल,
तितकेच तुम्ही सगळे रडाल
माझ्याशिवाय जेवणाला
चव कशी आणाल

थंडीत येणारी ही भाजी, कच्ची देखील लागते छान
हिरव्या रंगाच्या लांब पेटीत मोती भरलेत हिरवे गार




गोल माझा आकार
आणि हिरवा माझा रंग
शेतात पिकतो मी,
पानांचं माझं अंग
कच्चा खा, भाजी करा,
आहेच मी चवदार



आहे मोठा लठ्ठ-मुठ्ठ, साल हिरवं, गर पिवळा
करतात सगळे भाजी माझी, खात नाहीत माझ्या बिया

मोठे खातात विचार करून, मुलं मात्र पळतात दूर
चव माझी कडू, पण पोषण मात्र भरपूर
पितील कोणी माझा रस, चमक येईल चेह-यावर

लांब आणि पांढरा, यात आहे काय गंमत
शिजवून खा नाहीतर कच्चा करकरीत,
पचनाला नक्कीच होईल मदत



टोपी आणि शेपूट माझी कोणी नाही खात
आत माझ्या आहेत शिरा, शरीर माझं हिरवंगार
मी असेन पोळीबरोबर तर मुलं जेवतात आवडीनं

मटार, लाल भोपळा, भेंडी, मुळा,
बटाटा, कांदा, कारलं, कोबी

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

न बोलणारा वक्ता

मुल्ला नसिरुद्दीनच्या हुशारीच्या गोष्टी तर प्रसिद्धच आहेत. तो बोलण्यातही फार चतुर होता. त्याच्या गोष्टी लोकांना केवळ हसवत असत एवढेच नव्हे, तर त्यांना विचार करायलाही प्रवृत्त करत असत.

एकदा एका गावातल्या लोकांनी मुल्लांना एका समारंभात भाषण करण्याचं आमंत्रण दिलं.




खरं तर नसिरुद्दीन साहेबांना या समारंभास जाण्याची इच्छा नव्हती, पण ते टाळण्यासारखं नव्हतं, म्हणून त्यांनी ते मान्य केलं होतं. शेवटच्या क्षणी काहीतरी सबब सांगून जाणं टाळावं असा त्यांचा विचार होता.

अखेर भाषण देण्याचा दिवस उगवला. मुल्लाजी मंचावर चढले. जमलेल्या गर्दीला त्यांनी विचारलं, "मी काय बोलणार आहे हे तुम्हाला माहित आहे का?"

गर्दीतून आवाज आले, "नाही माहित", "नाही माहित". हे उत्तर ऐकून मुल्लांना फार राग आला. ते म्हणाले, "ज्या लोकांना काहीच माहित नाही, अशांना मला काहीच सांगायचं नाही." असं म्हणून ते तिथून निघून गेले.



गर्दीतल्या लोकांना मोठाच प्रश्न पडला. काही लोक त्यांच्या घरी गेले आणि त्यांची माफी मागू लागले. लोकांनी त्यांना परत पुढल्या शुक्रवारी भाषणाला येण्याचं निमंत्रण दिलं. मुल्लांनी ते मान्य केलं.



सगळ्यांनी विचार करून ठरवलं की यावेळी ते मुल्लांना नाराज करणार नाहीत.

शुक्रवार उजाडला. सभा सुरू झाली. मुल्ला बोलायला उभे राहिले. परत मुल्लांनी तोच प्रश्न विचारला, "मी काय बोलणार आहे ते तुम्हाला माहित आहे का?" लोकांनी आधीपासूनच ठरवून ठेवलं होतं त्याप्रमाणे गर्दीतून आवाज आले, "हो, आम्हाला माहित आहे... आम्हाला माहित आहे."

"तुम्हाला जर माहितच आहे, तर मग मी बोलण्याची गरजच नाही." असं म्हणून मुल्ला मंचावरून निघून गेले. लोक परत एकदा गोंधळून गेले. आपसात विचार करून त्यांनी एक निर्णय घेतला.

त्यांनी परत मुल्लांना पुढल्या शुक्रवारी भाषणाला येण्याचं आमंत्रण दिलं. मुल्ला शुक्रवारी ठरल्याप्रमाणे भाषणाला आले. त्यांनी परत तोच प्रश्न विचारला, "मी काय बोलणार आहे ते तुम्हाला माहित आहे का?"

लोकांना हे आधीपासूनच माहित होतं! त्यांनी अगोदरच ठरवून ठेवलं होतं त्याप्रमाणे अर्ध्या लोकांनी म्हटलं, "माहित आहे" आणि इतरांनी म्हटलं, "माहित नाही."

मग मुल्ला म्हणाले, "असं आहे तर! आता ज्या लोकांना मी काय बोलणार आहे ते माहित आहे, त्यांनी ज्यांना माहित नाही त्यांना ते सांगावं!" असं म्हणून मुल्ला परत निघून गेले.

लोक चांगलेच गोंधळून गेले आणि मुल्लाजींनी काही न बोलण्याची आपली इच्छा पूर्ण केली.



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

Marathi Sujata Godbole


L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Artist S. P. Raju

हजार बादल्या पाणी

युहियो समुद्राच्या किना-यावर उभा राहून लाटांकडे लक्ष देऊन पहात होता. लाटा त्याच्या पायापर्यंत येऊन परत जात होत्या.

अचानक त्याचं लक्ष खडकांमध्ये अडकलेल्या एका व्हेलकडे गेलं. व्हेल आपली मोठी शेपूट जमिनीवर जोरजोरात आपटत होता. आणि घाबरल्यामुळे आपले डोळे सगळीकडे फिरवून इकडे तिकडे पहात होता.



"अरे! पाण्याशिवाय तुला जगता येणार नाही. थांब. मी येतो मदत करायला." असं म्हणून युहियो पळतच समुद्राकडे गेला. एक बादलीभर समुद्राचं पाणी घेऊन ते व्हेलच्या डोक्यावर ओतलं.

उन्ह चांगलंच तापलं होतं. युहियो म्हणाला, "तू तर किती मोठा आहेस. तुला खूपच पाणी लागेल. पण काळजी करू नकोस, एक हजार बादल्या तुझ्यावर ओतल्याशिवाय मी थांबणार नाही."

दर वेळेस पाणी ओतताना तो एक...दोन...तीन...चार असं मोजत होता. डोक्यावर चार बादल्या, पाठीवर चार बादल्या, शेपटीवर चार बादल्या, अशा प्रकारे तो व्हेलच्या अंगावर पाणी ओतत राहिला.

थोड्या वेळाने युहियो दमला. श्वास घेण्यासाठी तो एक मिनिटभर थांबला. तेव्हा व्हेलच्या डोळ्यांकडे त्याचं लक्ष गेलं.



व्हेलला दिलेल्या शब्दाची त्याला आठवण आली. लगेच तो बादली घेऊन परत समुद्राकडे निघाला. आतापर्यंत किती बादल्या पाणी व्हेलवर ओतलं असेल ते त्याला आठवतही नव्हतं.

तो आपला पाणी ओततच राहिला. तो इतका दमला होता की आता त्याला पाऊलही उचलत नव्हतं. त्याचे पाय आता थरथरू लागले होते.



तेवढ्यात युहियोचे आजोबा गावातल्या इतर लोकांबरोबर तिथे येऊन पोचले. त्यांनी युहियोला उचलून घेतलं, आणि म्हणाले, "अरे, बास आता! खूप काम केलंस, आता राहिलेलं आम्ही बघून घेऊ." आणि किना-यावरल्या एका मोठ्या खडकाच्या सावलीत त्यांनी युहियोला नेऊन ठेवलं.

सगळ्यांनी मिळून मिळतील ती सगळी भांडी भरून व्हेलवर पाणी टाकलं. काही जणांनी आपले शर्ट पाण्यात भिजवून ते व्हेलच्या अंगावर टाकले. त्याचं संपूर्ण शरीर पाण्यानं भिजवलं.

संध्याकाळ झाल्यावर मोठ्या लाटा येऊ लागल्या आणि व्हेलची शेपटी त्यात भिजू लागली. आणखी लाटा त्याच्यापर्यंत आल्यावर व्हेलच्या जिवात जीव येऊ लागला. एक मोठी लाट आल्यावर तिच्याबरोबर खडकात अडकलेला व्हेल त्यातून बाहेर पडला. पण थोडा वेळ तो किना-यावर तसाच पडून राहिला. आणि मग आपल्या शेपटीला एक जोराचा झटका देऊन खोल समुद्रात पोहू लागला.

सर्वजण किना-यावर उभे राहून व्हेल समुद्रात दिसेनासा होईपर्यंत पहात राहिले होते. युहियोला खडकाच्या सावलीत शांत झोप लागली होती.

जपानी कथा



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

Marathi Sujata Godbole

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Artist S. P. Raju


तांदळाचा एक दाणा

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका देशातील सर्व लोक आपल्या शेतात आलेल्या धान्याचा बराच मोठा भाग सरकारला देत असत. ही प्रथा अनेक वर्षे चालू होती.

एकदा त्या देशात खूप मोठा दुष्काळ पडला. लोकांना खाण्यासाठी देखील तांदूळ शिल्लक राहिला नव्हता. मंत्र्यानी राजाला सल्ला दिला, "महाराज, गोदामे उघडा. लोकांना तांदूळ वाटून टाका."

"दुष्काळ किती काळ राहील हे आपल्याला माहित नाही. महालात नेहमी भात असायलाच हवा. शिवाय आपल्याला मेजवान्या देखील द्याव्याच लागतात." असं म्हणून राजानं तांदूळ वाटण्यास नकार दिला.

एक दिवस राजवाड्यातील मेजवानीसाठी गोदामातून तांदळाची काही पोती बाहेर काढून हत्तीवरून राजवाड्यात नेली जात होती. एका पोत्याला पडलेल्या भोकातून तांदळाचे दाणे बाहेर पडत होते.




सीमा नावाच्या एका मुलीनं ते पाहिलं. गळत असलेला तांदूळ आपल्या परकरात गोळा करत ती हत्तीमागून चालू लागली.

राजवाड्याच्या दरवाजाशी पोचताच शिपायांनी तिची चौकशी करायला सुरुवात केली. सीमा म्हणाली, "पोत्यातून तांदूळ खाली पडत होता. तो सगळा गोळा करून मला महाराजांना नेऊन द्यायचा आहे."

सीमाच्या प्रामाणिकपणाविषयी राजाला समजल्यावर राजाने तिला बोलावलं आणि म्हटलं, "मी तुला काहीतरी बक्षीस देणार आहे. तुला जे हवं असेल ते माग."

सीमा म्हणाली, "खरं तर मला काहीच बक्षीस नको आहे. पण तुम्हाला जर काहीतरी द्यायचंच असेल, तर मला तांदळाचा एक दाणा द्या. तेवढंच माझ्यासाठी पुरेसं आहे."

हे ऐकून राजाला आश्चर्य वाटलं. तो म्हणाला, "मी राजा आहे. मला शोभेल असंच बक्षीस मला द्यायचं आहे. तू आणखी काही तरी माग."




सीमाने थोडा विचार केला आणि म्हणाली, "ठीक आहे. आज मला तांदळाचा एक दाणा द्या. उद्या दोन दाणे, परवा चार दाणे, पहिल्या दिवशीच्या दुप्पट दाणे दुस-या दिवशी असे देत जा. आणि असे तीस दिवस द्या."

राजाला सीमाची ही मागणी काही फार मोठी वाटली नाही. त्याने तिची मागणी लगेच मान्य केली. सीमाला त्या दिवशी तांदळाचा एक दाणा मिळाला. दुस-या दिवशी दोन दाणे, तिस-या दिवशी चार दाणे असं करत दहाव्या दिवशी तिला ५१२ तांदूळ दिले गेले ते एक मूठभर झाले.

सोळाव्या दिवशी तिला दोन टोपल्या तांदूळ देण्यात आले. त्यात ३२,७६८ तांदूळ होते. राजाने विचार केला, "या दुप्पट देण्याच्या पद्धतीने मला वाटलं होतं त्यापेक्षा किती तरी जास्त तांदूळ द्यावा लागतो आहे. पण ठीक आहे. काही हरकत नाही."

चोविसाव्या दिवशी सीमाला आठ टोपल्यात ८३,८८,६०८ तांदूळ दिले गेले.



सत्ताविसाव्या दिवशी चौसष्ट टोपल्या घेऊन बत्तीस हत्ती सीमाच्या घरी गेले त्यात ६,७१,०८,८६४ तांदूळ होते. तांदळाच्या एका दाण्यापासून सुरुवात करून त्यांची संख्या इतकी वाढलेली बघून राजा आता अस्वस्थ होऊ लागला.



तिसाव्या दिवशी राजाचं गोदाम रिकामं झालं. ५३,६८,७०,९१२ तांदळाचे दाणे घेऊन २५६ हत्ती सीमाच्या घरी पाठवण्यात आले. राजाने सीमाला विचारलं, "बाळ, इतका तांदूळ घेऊन तू काय करणार?"

"मी भुकेल्या लोकांना हा तांदूळ वाटून टाकणार आहे. तुम्हाला पण एक टोपलीभर तांदूळ देईन. यापुढे तुम्ही केवळ तुमच्या गरजे पुरताच तांदूळ ठेवाल असं मला वचन द्याल का?" असं सीमानं विचारल्यावर राजानं ते मान्य केलं. तो म्हणाला, "ठीक आहे. मी तसंच करेन."

तीस दिवसात मिळून सीमाला एकूण १,०७,३७,४१,८२३ तांदूळ मिळाले.

एक कॅलेंडर घेऊन त्यावर सीमाला दररोज मिळालेल्या तांदळाच्या दाण्यांची संख्या लिहा. मग त्या सर्वांची बेरीज केल्यावर ही संख्या मिळेल.

भारतातील लोक कथा

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju


जादूचा खडा



छोटू अस्वल रोज नदीच्या काठावर फिरायला जात असे. जाता येता तो सुंदर सुंदर खडे आणि लहान लहान दगड गोळा करत असे. त्याच्या घरी कुठेही पाहिलं तरी सगळीकडे बरेच दगड आणि खडे पसरलेले असत.

एक दिवस त्याला एक लाल रंगाचा सुंदर खडा मिळाला. छोटुला तो फारच आवडला आणि तो घेऊन त्याचं कौतुक करत तो मजेत चालत होता.


अचानक पाऊस पडायला लागला. छोटूच्या मनात विचार आला, 'आता पाऊस थांबला तर किती बरं होईल.' त्याबरोबर आश्चर्य म्हणजे लगेच पाऊस थांबला.



'अरे वा! हा तर जादूचा खडा दिसतोय! हा हातात घेतला की मनात आणावं तसंच होतं असं दिसतंय! आता घरी जाऊन मी आई- बाबांना हा खडा दाखवतो.' असा विचार करतच छोटू घराकडे निघाला.

चालता चालता अचानक छोटू थांबला. पाहतो तर काय, त्याच्या समोर एक सिंह उभा होता. अरे बापरे! छोटू तर भीतीने कापूच लागला. तेवढ्यात त्याला आपल्या हातातल्या खड्याची आठवण झाली. त्याने विचार केला, 'मी जर एक खडक बनलो तर...' लगेच छोटू एक खडक बनला. त्याच्या हातातला लाल खडा जमिनीवर पडला.





बरंच झालं की छोटू सिंहाच्या तावडीतून वाचला. पण आता तो परत छोटं अस्वल कसा काय होणार? जादूचा खडा तर खाली पडला होता.

तिकडे छोटूच्या आई-बाबांना त्याची काळजी वाटू लागली. 'अंधार झाला तरी छोटू अजून परत कसा आला नाही?’ त्यांनी आजूबाजूला, शेजारी पाजारी चौकशी केली. पण कोणीच छोटूला पाहिलं नव्हतं.

असे बरेच दिवस गेले. छोटूचे आई-वडील त्याला शोधण्यासाठी सगळीकडे फिरत होते. एक दिवस शोधता शोधता ते दमले आणि एका खडकावर जाऊन बसले.

तो खडक म्हणजे छोटूच होता. आपल्या आई-बाबांना पाहून छोटू फारच खूष झाला. पण त्याच्या आई-बाबांनी त्याला ओळखलंच नाही.

छोटूच्या आईला जवळच पडलेला लाल खडा दिसला. तो तिनं उचलून घेतला. "माझ्या छोटूला असे खडे किती आवडत असत" असं म्हणून तिनं तो खडा खडकावर ठेवला.

आता खडक बनलेल्या छोटूच्या मनात विचार आला, 'मी जर परत अस्वल झालो तर किती बरं होईल!' आईने खडा तर खडकावर ठेवलाच होता. लगेच खडकाचा परत छोटू झाला! त्याला पाहून त्याच्या आई-बाबांना खूप आनंद झाला. त्यांनी त्याला उचलून कडेवर घेतलं. आणि आनंदानं त्याला हवेत उडवून ते त्याच्याशी खेळू लागले, त्याचे लाड करू लागले.



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

कोळी आणि मायावी राक्षस

समुद्राच्या किना-यावर एक गाव होतं. तिथे मासे पकडणारा एक कोळी रहात होता. तो दिवसातून तीन वेळा मासे पकडण्यासाठी जाळं टाकत असे. जाळ्यात सापडतील तेवढे मासे विकून तो आपली गुजराण करत असे.

एक दिवस नेहमीप्रमाणेच त्यानं मासे पकडण्यासाठी जाळं टाकलं. जेव्हा त्यानं जाळं ओढायला सुरुवात केली तेव्हा ते त्याला फारच जड वाटलं. त्यात एक मेलेला प्राणी अडकला होता.

कोळ्यानं त्याला बाहेर काढून जाळं परत समुद्रात टाकलं. 'निदान या वेळी तरी चांगले मासे मिळू देत' अशी तो मनापासून प्रार्थना करू लागला.

या वेळी देखील मोठाच प्रयत्न करून त्यानं जड जाळं बाहेर ओढून घेतलं. एक मोठा थोरला हंडा जाळ्यात अडकला होता. हंड्यात नुसती दगड, माती आणि काचेचे तुकडे भरलेले होते.




'अरे बापरे! हे कसलं नशीब! आज एकही मासा मिळालाच नाही' असा विचार करून कोळी निराश झाला. 'आता हे मात्र शेवटचंच' असं म्हणून त्यानं परत एकदा जाळं टाकलं.

तिस-या वेळेसही जाळं चांगलंच जड लागलं. पण हे काय! जाळ्यात एक पितळेची सुरई होती. 'चला, आता ही सुरई विकून निदान आजच्यापुरती तरी काही कमाई होईल' असा विचार करून कोळ्यानं सुरईचं झाकण उघडलं. आत काहीच नव्हतं. अचानक त्यातून काळा धूर निघू लागला.

हळू हळू हा काळा धूर आकाशापर्यंत पोचला. आता त्यात एक आकार दिसू लागला. तो एक जिन म्हणजे मायावी राक्षस होता. पाहता पाहता त्याचं डोकं आकाशाला जाऊन भिडलं. त्याचे डोळे हि-यासारखे चमकू लागले. त्याचं तोंड तर एखाद्या गुहेसारखं दिसत होतं.

त्याला पाहून कोळी फारच घाबरला. त्याचे हात पाय थर थर कापू लागले. तोंडाला कोरड पडली. पुतळ्यासारखा तो एका जागी थिजूनच गेला.

जिन म्हणाला, "आता मी तुला मारून टाकणार आहे."





थोडा धीर करून कोळी म्हणाला, "मी तर तुला समुद्रातून बाहेर काढलं, मग तू मलाच का मारणार आहेस?"

जिन म्हणाला, "किती तरी वर्षांपासून मी या सुरईत अडकून पडलो होतो. सुरुवातीला मी विचार केला होता की जो कोणी मला यातून बाहेर काढेल, त्याला मी खूप धन-संपत्ती देईन. पण कोणीच मला बाहेर काढलं नाही."

"मग काय झालं?" कोळ्यानं विचारलं.

जिन म्हणाला, "अशी चारशे वर्षं गेली. मग मी ठरवलं की जो कोणी मला बाहेर काढेल, त्याला मी तीन वर देईन. तरीही मला कोणीच सोडवलं नाही. मग मी निश्चय केला की जो कोणी मला सोडवेल त्याला मी मारूनच टाकेन. दुर्दैवाने आज तू मला बाहेर काढलंस."

"आता हा कुठला न्याय झाला? मदत केल्याबद्दल कोणी शिक्षा करतं का?" कोळ्यानं धीर एकवटून विचारलं.

"हे बघ! उगाच माझा वेळ वाया घालवू नकोस" असं म्हणत जिन कोळ्याजवळ येऊ लागला.

कोळी विचार करू लागला, "आता याच्यापासून कशी बरं सुटका करून घ्यावी?" मग कोळी त्याच्याशी गप्पा मारू लागला. "ठीक आहे. पण मला एक शंका आहे. आकाशापर्यंत पोचण्याइतका तू मोठा आहेस. तुझ्या पायाचं एक नख देखील या सुरईत जाणार नाही. मग इतकी वर्षं तू या सुरईत कसा काय राहिला असशील? तू माझी चेष्टा करतोयस ना?" असं म्हणत कोळी त्याला चिडवू लागला.

जिन लगेच म्हणाला, "तुझा माझ्यावर विश्वास नाही का? हे बघ. मी आताच तुला सुरईत जाऊन दाखवतो." आणि आपलं शरीर लहान करत तो परत सुरईत जाऊन बसला.

बस! ही संधी साधून कोळ्यानं चटकन सुरईचं झाकण लावून टाकलं. "आता आणखी हजार वर्षं असाच पडून रहा!" असं म्हणून कोळ्यानं सुरई परत समुद्रात फेकून दिली.

अरेबियन नाईटस



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

खरी संपत्ती

एका गावात तीन भाऊ रहात होते. ते अतिशय बुद्धिमान होते. एक दिवस त्यांच्या म्हाता-या वडिलांनी त्यांना बोलावले आणि म्हटले, "मुलांनो, तुम्हाला देण्यासारखं माझ्याकडे काहीच नाही. ना धन-संपत्ती, ना सोनं-नाणं, ना शेळ्या-मेंढ्या. परंतु, मी तुम्हाला सर्वात मौल्यवान ठेवा दिला आहे, तो म्हणजे हुशारी. आता मी शांतपणे मरू शकतो."

वडील मरण पावल्यानंतर तिन्ही भावांनी आपलं ज्ञान वाढवण्याचा विचार केला. ते एका मोठ्या प्रवासाला निघाले. अनेक देश पालथे घातले. एक दिवस त्यांना एक सैनिक दिसला. तो काहीतरी शोधत होता. तिन्ही भाऊ त्याच्याशी बोलण्यासाठी थांबले.



पहिला भाऊ: दादा, तुम्ही एखादा उंट शोधत आहात का?

सैनिक: हो.

दुसरा भाऊ: त्याच्या उजव्या डोळ्याला दिसत नाही ना?

तिसरा भाऊ: त्या उंटावरून एक महिला जात होती का?

सैनिक: अगदी बरोबर. म्हणजे तुम्हाला माझा उंट दिसला आहे का? कुठे आहे तो?

पहिला भाऊ: पण आम्ही तर तुमचा उंट पहिला देखील नाही.

सैनिक: असं कसं? मग तुम्हाला माझ्या उंटाविषयी इतकं सगळं कसं माहित आहे? तुम्ही नक्कीच काही तरी लपवत असणार.

एवढं बोलून तो सैनिक तिन्ही भावांना घेऊन आपल्या राजाकडे गेला आणि सर्व हकीकत राजाला सांगितली. तेव्हा तिन्ही भावांनी राजाला सांगितलं की त्यांनी खरोखरच उंट पाहिलेला नाही. राजाला याचं फारच आश्चर्य वाटलं.

राजा: माझ्या सैनिकानं तुम्हाला काहीच सांगितलं नाही, तरी देखील तुम्हाला उंटाची सगळी माहिती आहे. हे कसं शक्य आहे?

तिन्ही भाऊ: आम्ही आमची बुद्धी वापरून माहिती करून घेतली.

राजा: जे तुम्ही पहिलंही नाहीत त्या माहितीचा अंदाज तुम्हाला कसा आला? थांबा, मला तुमच्या हुशारीची परीक्षा घेऊ द्या.

राजाने आपल्या सेवकांच्या कानात काहीतरी सांगितलं. सेवक बाहेर जाऊन एक पेटी घेऊन आले. तिन्ही भाऊ सेवकांच्या प्रत्येक हालचालीकडे बारकाईने पहात होते.

राजा: या पेटीत काय आहे ते तुम्हाला सांगता येईल का?

पहिला भाऊ: या पेटीत वजनाला हलकी असलेली एक गोष्ट आहे.

दुसरा भाऊ: ही वस्तू आकाराने गोल आहे.

तिसरा भाऊ: पेटीत एक डाळिंब आहे.

राजाने पेटी उघडायला सांगितली आणि काय आश्चर्य, त्यात खरोखरच एक डाळिंब होतं!

राजा: शाबास! तुम्हाला कसं समजलं की पेटीत डाळिंब आहे?

पहिला भाऊ: सेवक पेटी ज्याप्रकारे आणत होते त्याकडे आम्ही बारकाईने लक्ष दिलं. या पेटीतली वस्तू काही जड नाही असं मला वाटलं. आमची परीक्षा घेण्यासाठी केवळ एकच वस्तू यात ठेवली असावी.



दुसरा भाऊ: पेटीतली वस्तू घरंगळत होती. त्यावरून ही वस्तू गोल असणार असा मी तर्क केला.

तिसरा भाऊ: तुमच्या बागेत डाळिंबं लागली आहेत हे मी येताना पाहिलं होतं. पेटीत एकच वस्तू ठेवली आहे आणि ती गोल आहे यावरून ते डाळिंब असावं असा मी अंदाज केला.

राजा: तुम्ही खरोखरच फार हुशार आहात. आता उंटाबद्दल तुम्हाला कसं कळलं ते सांगा पाहू.

पहिला भाऊ: पायांच्या ठशावरून मला समजलं की एक उंट या रस्त्यानं गेला आहे.

दुसरा भाऊ: रस्त्याच्या डाव्या बाजूच्या झाडांची पानं आणि गवत कुरतडलेलं होतं, पण उजव्या बाजूचं मात्र जसंच्या तसं होतं. यावरून त्याला उजव्या डोळ्याला दिसत नसावं असा मी अंदाज केला.

तिसरा भाऊ: रस्त्यावर एका ठिकाणी उंट पाय दुमडून खाली बसल्याचे ठसे होते आणि जवळच एका महिलेच्या चपलेचेही ठसे होते.

राजा: वा! तुमची हुशारी खरंच कौतुक करण्यासारखी आहे. तुम्ही उंट नक्कीच चोरला नाहीत. तो कुठेतरी गेला असणार. तुम्ही जर माझ्या देशात राहिलात आणि माझ्या कामकाजात मला मदत केलीत तर मला फार आनंद वाटेल.

उझबेकिस्तानातील कथा

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju

दोघातली वाटणी

राम आणि शाम हे दोन भाऊ होते. एक दिवस शाम म्हणाला, "आपल्याकडे आपल्या वडिलांनी दिलेल्या तीन गोष्टी आहेत - एक गाय, एक कांबळं आणि एक आंब्याचं झाड. आपण त्यांची वाटणी करूया. रामनं आपल्या भावाचं म्हणणं मान्य केलं.

शाम लबाड होता. तो म्हणाला, "गायीचा पुढला भाग तुझा आणि मागला भाग माझा. आंब्याच्या झाडाचा खालचा भाग तुझा आणि वरचा भाग माझा, तसंच कांबळं दिवसा तुझं आणि रात्री माझं." राम भोळा होता, तो म्हणाला, "ठीक आहे. तसंच करूया."





राम रोज गायीला चारा द्यायचा. शाम सकाळ-संध्याकाळ गायीचं दूध काढून विकायचा आणि पैसे मिळवायचा.

राम रोज आंब्याच्या झाडाला पाणी घालायचा आणि शाम आंबे घ्यायचा.

रामला दिवसा कांबळ्याचा काहीच उपयोग नसायचा, आणि रात्री शाम आरामात कांबळं पांघरून झोपायचा. राम बिचारा रात्री थंडीनं कुडकुडायचा.

एक म्हातारा या दोघांचा दिनक्रम लक्ष देऊन पहात असे. एक दिवशी त्यानं रामला बोलावलं आणि त्याच्या कानात काहीतरी सांगितलं. ते ऐकून राम हसत हसतच घरी आला.


दुस-या दिवशी सकाळी उठल्यावर रामनं कांबळं पाण्यात भिजवून ठेवलं. रात्रीच्या वेळी कांबळं ओलं होतं म्हणून शामला ते पांघरता आलंच नाही. थंडीत तो कुडकुडू लागला. तो रागावून रामला म्हणाला, "तू असं का केलंस?"

राम म्हणाला, "सकाळी कांबळं माझं असतं, मी त्यावेळी काहीही करेन."

यावर शामला काहीच बोलता आलं नाही. तो गप्पच बसला. सकाळ झाल्यावर तो गायीचं दूध काढायला गेला. रामने गायीच्या गळ्यातली दोरी जोरात ओढली. गाय चांगलीच चिडली. तिनं जोरात एक लाथ मारली. ती दूध काढत असलेल्या शामला लागली. शाम एका बाजूला पडला आणि दुधाची कासंडी दुस-या बाजूला!

शाम ओरडला, "अरे, तुला काय वेड लागलंय का?"

रामने उत्तर दिलं, "गायीचा पुढला भाग माझा आहे ना, मी तोच तर ओढतोय. त्याचा तुला कशाला इतका राग येतोय?"



शामला यावर काहीच बोलता येईना. तो मुकाट्याने झाडाखाली जाऊन झोपला. थोड्याच वेळात ठक... ठक... असा झाड कापण्याचा आवाज येऊ लागला.

त्या आवाजाने शाम घाबरूनच झोपेतून जागा झाला. राम झाड कापत होता. "अरे! अरे! हे काय करतोयस?" शाम ओरडू लागला.

राम म्हणाला, "झाडाचा खालचा भाग माझा आहे. तोच तर कापतोय." आता शामच्याही लक्षात आलं की रामला आता पूर्वीसारखं फसवता येणार नाही. त्या दिवसापासून दूध आणि आंबे विकून जे पैसे मिळायचे ते दोन्ही भाऊ सारखेच वाटून घेऊ लागले. कांबळं देखील आता दोघेही वापरू लागले. एक दिवस राम कांबळं घेऊन झोपायचा, तर दुस-या दिवशी शाम कांबळं पांघरून झोपायचा.



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju

तीन रेघा

रावण जेव्हा लंकेत राज्य करत होता त्या काळातली ही गोष्ट आहे. एक दिवस दहा मस्तके असणा-या रावणाने रामाची पत्नी सीतेला पळवून नेलं.

सीतेला सोडवून आणण्यासाठी रामानं रावणाशी युद्ध करण्याचा निर्णय घेतला. वानरांची सेना घेऊन रामाने लंकेकडे जाण्यास सुरुवात केली. बराच प्रवास केल्यावर ते सर्वजण समुद्रकिनारी आले. लंकेत जाण्यासाठी त्यांना समुद्र ओलांडावा लागणार होता.

समुद्रात जोरदार लाटा उसळत होत्या. लाटांवर ताबा मिळवण्यासाठी रामाने बाण सोडले.

तेव्हा समुद्राचा राजा रामासमोर आला आणि म्हणाला, "समुद्रात असंख्य प्राणी, जीव-जिवाणू राहतात. या सर्व प्राण्याचं रक्षण करणं हे राजाचं कर्तव्य आहे. निसर्गाशी वैर धरून कोणीच यशस्वी होऊ शकणार नाही. म्हणून माझी तुम्हाला विनंती आहे की समुद्रावर एक मोठा मजबूत पूल उभारूनच तुम्ही समुद्र ओलांडावा."



सर्वांशी सल्ला मसलत करून रामाने वानर सेनेला पूल बांधण्याचा आदेश दिला. पाहता पाहता हजारो वानरे कामाला लागली. मोठ मोठे खडक शोधून ते घेऊन येऊ लागले. अजिबात विश्रांती न घेता ते काम करू लागले.



एक छोटीशी खारही लहान लहान खडे आपल्या तोंडात धरून तेथे आणू लागली. आणि मोठमोठ्या खडकांजवळ नेऊन ठेवू लागली. ती मोठ्याच उत्साहाने सगळीकडे पळत होती. ते पाहून रामाला कळेना की एवढी लहानशी खार इथे काय करते आहे.

खारीला सगळीकडे वेडं वाकडं पळताना पाहून वानरांना राग येऊ लागला. ते तिच्यावर ओरडू लागले, "ए, चिमुकले, हे काही तू करण्यासारखं काम नाही आहे. उगाच आमच्या कामात मधे मधे येऊ नकोस." खारीनं वर मान करून उत्तर दिलं, "मी तर पूल बांधायलाच मदत करते आहे."





सगळी वानरं जोरजोरात हसू लागली आणि तिची चेष्टा करू लागली. "अशी मूर्खासारखी गोष्ट कोणी कधी ऐकली तरी आहे का?"

खार म्हणाली, "मला काही मोठे मोठे खडक उचलता येत नाहीत. पण मी लहान लहान खडे तर आणू शकते ना!"


वानरांनी खारीला दूर ढकलून दिलं. तरी देखील ती एका कोप-यात छोटे छोटे खडे आणून ठेवतच राहिली. एका वानराला ते मुळीच सहन होईना. चिडून त्याने खारीला आकाशात उंच फेकलं.



खार घाबरली आणि ओरडली, "हे राम!" रामानं तिला आपल्या हातात झेललं. मग वानरांना समजावून सांगितलं, "तुम्ही खूप बलवान आहात. पण जे तुमच्याइतके शक्तिशाली नाहीत त्यांची चेष्टा करणंही योग्य नाही. प्रत्येकजण आपल्या कुवतीनुसार मदत करत असतो. केवळ शक्तीपेक्षा कोण किती प्रेमाने आणि मन लावून काम करतो हे महत्त्वाचं आहे. आपल्याला तर सगळ्यांची मदत हवी आहे."

रामाच्या या बोलण्याचा नीट विचार केल्यावर वानरांच्या लक्षात आलं की मोठमोठ्या खडकांमध्ये बारीक बारीक दगड घातल्यावरच पूल मजबूत होईल.

रामाने खारीच्या पाठीवर प्रेमाने हात फिरवला. तिच्या पाठीवर रामाच्या बोटांच्या तीन रेघा उमटल्या. आजही खारीच्या पाठीवर त्याच तीन रेघा दिसतात असंच सगळे मानतात.



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

ढोल

ढम...ढम...ढम...ढम... असा ढोलाचा आवाज ऐकून अंगणात बसलेला राजू एकदम उठून उभा राहिला. 'शेजारच्या गल्लीत काय चाललंय जरा बघून तरी येऊया' असा त्यानं विचार केला.

थोड्याच वेळात राजू उड्या मारतच घरी आला. त्याची आई बाजारात निघाली होती. राजू तिला म्हणाला, "आई, माझ्यासाठी बाजारातून एक ढोल आण ना." काही न बोलताच आई बाजारात निघून गेली.


आईने शेतातलं धान्य बाजारात विकलं आणि त्या पैशातून पीठ आणि मीठ विकत घेतलं. ढोल घेण्यासाठी तिच्याकडे पैसे शिल्लकच राहिले नाहीत. राजूसाठी काही घेता आलं नाही याचं तिला वाईट वाटत होतं. पण ती तरी काय करणार? रस्त्यात तिला एक लाकडाचा तुकडा मिळाला. तो घेऊन ती घरी आली आणि तो राजूला दिला.

थोडा वेळ राजू त्या लाकडाच्या तुकड्याशी खेळला आणि मग खेळायला बाहेर निघून गेला. रस्त्यात त्याला एक म्हातारी बाई दिसली.



ती पालापाचोळा घालून चूल पेटवण्याचा प्रयत्न करत होती. तिच्या डोळ्यातून पाणी येत होतं. राजूनं विचारलं, "आजी, तुम्ही का रडता?"

आजीबाई म्हणाल्या, "मी रडत नाही. पाचोळा ओला आहे, म्हणून चूल पेटतच नाही आहे." राजू म्हणाला, "एवढंच ना? हे माझ्याकडचं लाकूड घ्या. त्यानं चूल लगेच पेटेल." आजी खूष झाल्या, त्यांनी राजूला एक पोळी दिली.



पोळी घेऊन राजू पुढे निघाला. पुढच्या गल्लीत कुंभाराची मुलगी रडत असलेली त्याला दिसली. राजूनं तिच्या आईला तिच्या रडण्याचं कारण विचारलं. आई म्हणाली, "तिला भूक लागलीय म्हणून ती रडतीय." राजूनं लगेच आपल्याकडची पोळी तिला दिली. मुलगी लगेच रडायची थांबली. मग मुलीच्या आईनं राजूला प्रेमानं एक मातीचा घडा दिला.

घडा घेऊन राजू नदीकिनारी गेला. तिथे एक धोबी आणि त्याची बायको भांडत होते. "एकच घडा शिल्लक होता, तो देखील फुटला, आता पाणी कसं उकळणार?" हे ऐकून राजूनं आपल्याकडचा घडा त्यांना देऊन टाकला. धोबी खूष झाला आणि त्यानं राजूला एक गरम कोट दिला.



कोट घालून राजू मोठ्या ऐटीत चालू लागला.
जाता जाता राजूला रस्त्यावरच्या पुलाजवळ एक म्हातारा
 माणूस दिसला. राजूनं पाहिलं की तो थंडीत कुडकुडत बसला होता.
राजूनं त्याला आपला गरम कोट दिला. म्हातारा माणूस म्हणाला,
"बाळ, तू फार दयाळू आहेस. मला तुला काहीतरी द्यायचं आहे.
माझा घोडा तू घेऊन जा."

राजू घोडा घेऊन जात असताना त्याला वाटेत एक व-हाड भेटलं. ते सगळेजण एका झाडाखाली बसले होते. काय झालं असं राजूनं विचारल्यावर ते म्हणाले, "नवरदेवाला घेऊन जाण्यासाठीचा घोडा अजून आलाच नाही. आता तर मुहूर्त देखील टळून जाईल."



हे ऐकल्यावर राजूने आपला घोडा त्यांना दिला. व-हाडी मंडळी फार खूष झाली. नवरदेवानं राजूला म्हटलं, "तुला काय हवं ते माग."

राजू म्हणाला, "तुमच्या वाजंत्रीवाल्यांना मला एक ढोल द्यायला सांगाल का?"

नवरदेव म्हणाला, "हो तर! सांगतो की!" आणि त्यानं वाजंत्रीवाल्यांना राजूला एक ढोल द्यायला सांगितलं. मग काय! रस्ताभर "ढम...ढमा...ढम" "ढम...ढमा...ढम" असा ढोल वाजवतच राजू घरी आला.

भारतातील लोककथा

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole


Artist Uma Krishnaswamy

निसर्गाची किमया

दुपारची वेळ होती. कडक उन्ह पडलं होतं. एक शेतकरी बदामाच्या झाडाखाली विश्रांती घेत पडला होता. समोरच्या शेतात कलिंगडाचे वेल जमिनीवर पसरले होते. वेलाला बरीच कलिंगडं लागली होती.

शेतक-यानं मान वर करून पाहिलं, तर झाडाला लहान लहान बदाम लागले होते.

'नाजूक वेलींवर इतक्या मोठ्या आकाराची कलिंगडं आणि बदामाच्या मोठ्या वृक्षाला मात्र इतके छोटे बदाम! निसर्गाचा खेळ मोठा अजबच आहे!' असा विचार करून त्याला मनातल्या मनात हसू आलं.






शेतकरी असा विचार करत होता, तेवढ्यात एक बदाम टपकन त्याच्या डोक्यावर पडला आणि तो एकदम दचकला.

'हां! आता आलं लक्षात! बदामाचं फळ जर कलिंगडाइतकं मोठं असतं तर माझी काय अवस्था झाली असती!'

निसर्गाचा हा खेळ पाहून शेतकरी बराच वेळ त्याचाच विचार करण्यात दंग झाला.

इराणी गोष्ट



प्रवासी आणि नारळ

मार्कोस नावाचा एक प्रवासी आपल्या घोड्यावरून बरेच नारळ घेऊन प्रवासाला निघाला होता. जाता जाता तो रस्ता चुकला. काही अंतर गेल्यावर त्याला एक मुलगा भेटला. त्याला थांबवून मार्कोसने त्याला रस्ता विचारला. आणि गावापर्यंत पोचायला किती वेळ लागेल ते ही विचारलं.

मुलानं टक लावून घोड्याकडे पाहिलं आणि म्हणाला, "तुम्ही जर सावकाश गेलात तर लवकरच गावाला पोहोचाल, पण घाई केलीत तर मात्र फारच उशीर होईल."



मार्कोसने नवलानं मुलाकडे पाहिलं. 'हा काही तरी विचित्रच बोलतोय!' असा विचार करून त्याने घोड्याला टाच मारली. घोडा जोरात दौडू लागला. थोडं अंतर गेल्यावर घोड्यावर लादलेले नारळ एक एक करून खाली पडू लागले. घोड्याला थांबवून त्याने पडलेले सगळे नारळ गोळा केले.

"अरे बाप रे! फारच उशीर होतोय. आता लवकरच गावात पोचलं पाहिजे" असं म्हणून त्यानं घोड्याला आणखी जोरात जायला लावलं. परत सगळे नारळ चारी बाजूला पडू लागले. मग घोड्याला थांबवून सगळे नारळ गोळा केले आणि परत निघाला. अशा प्रकारे घोड्यावरून जाताना परत परत थांबून नारळ गोळा करत गावी पोहोचेपर्यंत खूप उशीर झाला आणि चांगलाच अंधार पडला.

वाटेतला मुलगा काय म्हणत होता त्याचा मार्कोस विचार करू लागला. 'सावकाश गेलात तर गावाला लवकर पोहोचाल' असं मुलगा का म्हणत होता ते आता मार्कोसच्या लक्षात आलं.

फिलिपीन्समधील गोष्ट



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

सोनेरी मुंगूस

पांडव आपला विजयोत्सव साजरा करत होते त्या काळातली ही गोष्ट आहे. धर्मराजाने सगळ्या राजांना आमंत्रण दिलं होतं. आपल्या प्रजेला यावेळी ते अन्नदान करत होते.

अचानक एक मुंगूस तिथे आलं आणि जमिनीवर लोळू लागलं. माणसाच्या आवाजात ते जोरजोरात हसू लागलं. सगळे लोक आश्चर्यानं हा प्रकार पाहू लागले. त्या मुंगसाचं अर्धं शरीर सोन्यासारखं चमकत होतं.





मुंगूस धर्मराजाला म्हणालं, "महाराज, हा उत्सव फारच महत्त्वपूर्ण आहे. मोठ्या उदारपणे तुम्ही आपली संपत्ती दान देत आहात. परंतु, तरीही मला एका गरिबाने जे दान दिलं होतं त्याची बरोबरी होऊ शकणार नाही."

धर्मराजाने विचारलं, "का बरं? तुला इथे कोणती उणीव दिसते आहे?"

"अगोदर, माझं अर्धं शरीर सोनेरी कसं झालं याची गोष्ट मी तुम्हाला सांगतो" असं म्हणून मुंगसानं आपली गोष्ट सांगायला सुरुवात केली.

"एका गावात एक गरीब माणूस रहात होता. दररोज शेतात काम करून तो थोडंफार धान्य घरी आणत असे. घरातल्या सर्व लोकांची त्यावरच गुजराण होत असे.

एकदा गावात दुष्काळ पडला. खाण्यासाठी काहीच मिळेना. तीन दिवस उपाशी राहिल्यानंतर त्या गरीब माणसाला थोडेसे धान्याचे दाणे मिळाले. ते दळून ते पीठ त्याने त्याची बायको, मुलगा आणि सून यांनी वाटून घेतलं.

अचानक एक म्हातारा प्रवासी तिथे आला. तो म्हणाला, "मला फार भूक लागली आहे. मला कृपा करून काही तरी खायला द्या." त्या गरीब माणसानं मग आपल्या वाटयाचं अन्न त्याला दिलं. परंतु, म्हातारा माणूस अजूनही भुकेलेला होता. त्यानं आणखी अन्न मागितलं.

गरीब माणसाच्या बायकोनं आपल्या वाटचं अन्न लगेच त्याला देऊन टाकलं. तरीही त्याची भूक भागली नाही. मग गरीब माणसाच्या मुलानं आपला वाटा म्हाता-या माणसाला दिला. तो संपला, तरीही त्याची भूक शमली नव्हती. मग सुनेनं आपला वाटा देखील त्याला देऊन टाकला.

एवढं सगळं झाल्यावर म्हातारा तृप्त झाला. तो म्हणाला, "तुम्ही सगळे उपाशी असून देखील आपलं अन्न मला दिलंत. राजांनी केलेल्या मोठमोठ्या यज्ञाने आणि दानधर्माने सुद्धा याची बरोबरी होणार नाही." आणि त्या सर्वांना आशीर्वाद देऊन म्हातारा नाहीसा झाला.




मी लपून हे सर्व पहात होतो. मी हळूच बाहेर आलो. जमिनीवर पडलेले पिठाचे काही कण माझ्या अर्ध्या अंगाला चिकटले. तो भाग सोनेरी झाला. माझं राहिलेलं अर्धं शरीर मात्र पहिल्यासारखंच राहिलं.

त्या दिवसापासून मी अनेक ठिकाणी भटकतो आहे. जिथे जाईन तिथे जमिनीवर लोळून माझं उरलेलं शरीर सोन्यासारखं होतंय का ते पाहतो आहे. पण अजून तरी तसं झालं नाही.

आज तुमच्या समारंभात आलो आहे. इथेही जमिनीवर लोळून पाहिलं. पण बाकीचा भाग सोनेरी झाला नाही. म्हणून मी म्हणालो की हा उत्सव कितीही मोठा आणि शानदार असला, तरी तो त्या गरीबाच्या दानाची बरोबरी करू शकत नाही."

एवढं बोलून मुंगूस नाहीसं झालं. जमलेले सगळे लोक मात्र विचारात पडले.




Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi


Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

चला ओळखूया




चेंडूसारखा गोल पण येत नाही खेळता
गोड गोळा तोंडात टाकला, येत नाही थांबता.

मैद्याच्या घरात भरला डाळ-मसाला,
चेंडूसारखा गोल करून मग केला चपटा
गरम तेलात तळला चांगला लाले लाल
लवकर याचं नाव सांगा, चव फारच छान.



तीन टोकांची झोपडी, आत बसला बटाटा
पटकन खाऊन टाकतात, विनय किंवा रिटा.

तांदूळ, साखर, बदाम-बेदाणे, सगळे दुधात शिजवले
खूप वेळ आटवले, चटकन खाऊन संपले.



गरम तेलात तळली, टमकन फुगली


कणकेची केली, सगळ्यांनी खाल्ली.

दोरी केली गोलाकार, तळली गरम तेलात

मग घातली पाकात, खाऊन टाकली गरम गरम.

डाळ-तांदूळ भिजवले रात्री, काळ्या तव्याची ही कमाल

चटणी-सांबार असेल साथ, तर उत्तर-दक्षिण सगळ्यांची धमाल.



खव्याचा चेंडू, त्यात सुकामेवा

तळून लाल केला आणि पाकात टाकला.

गव्हासारखा पिवळा रंग, मध्ये आहे भोक

आहे मी उडद डाळीचा, सांगा मी कोण.

समोसा, वडा, लाडू, कचोरी, गुलाबजाम, पुरी, डोसा, खीर, जिलबी



एका पायावर मी नाचतो

दमलो की झोपून जातो.



कागदाचं शरीर माझं आहे रंगीबेरंगी

सगळे मला हवेत उडवतात उंच उंच आकाशी.

वर फेकाल तर खाली येईन

जमिनीवर टाकाल तर वर उसळेन.

हवा भराल तर मोठा होईन


वारा आला तर उडून जाईन.

हात पाय आहेत पण चालता येत नाही


तोंड आहे पण बोलता येत नाही


शरीर आहे पण श्वास नाही

मुलांची मैत्रीण आहे मात्र लाडकी.









सगळ्यांच्या ओळखीचे हत्ती-घोडे
खूप फिरतात गोल गोल
कितीही जरी फिरले तरी
येतात मात्र पहिल्याच जागी.

छोट्याला मी करतो मोठा
मला ओळखाल तरच वापराल.



जोरजोरात पुढे जातो, मागे जातो
जो कोणी बसेल तो खूष होतो.



लाकडाच्या दोन दांडक्यानी खेळायचा हा खेळ
मोठं लाकूड लहानग्याला मारून पळवतं दूरच दूर.

झोपाळा, चेंडू, विटीदांडू, पतंग, फुगा, भोवरा,
सूक्ष्मदर्शक भिंग, मेरी गो राउंड, बाहुली

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation


P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy


टोमॅटोच्या शोधात



मोहनने आपल्या बागेत टोमॅटो लावले होते. पिकून लाल बुंद झालेले टोमॅटो फारच सुरेख दिसत होते. ते पाहून त्याला खूपच आनंद होत असे आणि कौतुकही वाटत असे.

एक दिवस एक हरीण बागेत घुसलं. त्याला पळवून लावायला मोहनने एक दगड उचलला. तेवढ्यात त्याची बायको म्हणाली, "हरणाला मारू नका. त्याला पण थोडे टोमॅटो खाऊ द्या की."





पण मोहनने काही ते ऐकलं नाही. दुस-याच दिवशी त्यानं आपल्या बागेभोवती काटेरी कुंपण लावलं. मग आरामात घरी आला. पण त्याच्या नशिबात काही आराम नव्हता.

काही दिवसांनी काही पक्षी उडत आले आणि टोमॅटो खाऊ लागले. मोहन खूप चिडला. त्याने विचार केला, "आता टोमॅटो असे अधिक दिवस ठेवून चालणार नाही."

दुस-या दिवशी सकाळी उठल्याबरोबर त्याने सगळे टोमॅटो तोडले, गाडीत भरले आणि बाजाराकडे निघाला.

बाजारात पोचल्यावर गाडी थांबवली आणि मागे वळून पाहिलं. त्याला धक्काच बसला. "हे काय? गाडी तर रिकामी! माझे टोमॅटो कुठे गेले?" तो ओरडायलाच लागला.

तेव्हा त्याला दिसलं की गाडीच्या मागच्या बाजूला एक भोक होतं. त्यातूनच बहुधा टोमॅटो खाली पडले असतील.

खाली पडलेले टोमॅटो गोळा करण्याच्या विचारानं मोहन त्याच रस्त्यानं परत मागे जायला लागला. पण काय आश्चर्य! रस्त्यात एकही टोमॅटो पडला नव्हता.

काही अंतरावर त्याला दोन हरणाची पाडसं दिसली. ती अगदी आनंदात टोमॅटो खात होती. काही खारी पण टोमॅटो चाखत होत्या.



उदास होऊन मोहन एका झाडाखाली जाऊन बसला. झाडावर छोटे छोटे पक्षी आनंदानं चिवचिवाट करत होते. त्यांची आई त्यांना टोमॅटो खाऊ घालत होती. मोहन भान विसरून ते दृश्य बघतच राहिला.

"वा! किती छान!" म्हणतच तो पुढे निघाला.

रस्त्यात एका घरातून त्याला मुलांच्या हसण्याचा आवाज आला. जवळ जाऊन खिडकीतून डोकावून पाहिलं तर सगळ्या मुलांच्या हातात टोमॅटो होते आणि चेहरा आनंदानं फुललेला!

'अरे! माझ्या टोमॅटोमुळे इतक्या सगळ्या लोकांना आनंद मिळाला!' मोहन खूप खूष झाला. आता त्याला टोमॅटो नाहीसे होण्याचं दु:ख नव्हतं. "खरं तर मी आधीच काही टोमॅटो वाटायला हवे होते" असा विचार करतच तो घरी पोचला.



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

Marathi Sujata Godbole

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Artist S. P. Raju

तीन पुतळे



विजयनगर राज्यात आज बरीच गडबड होती. परदेशातून एक विद्‌वान तीन सोन्याच्या मूर्ती घेऊन दरबारात आले होते. तिन्ही मूर्ती दिसायला अगदी एकसारख्याच होत्या. त्यात काहीच फरक दिसत नव्हता.

त्या विद्‌वानांनी दरबारात सर्वांसमोर सांगितलं की, "या तीन मूर्तिंमध्ये थोडासा फरक आहे. जो कोणी तो ओळखेल, त्याला दहा हजार सोन्याच्या मोहरा आणि या तिन्ही मूर्ती इनाम म्हणून मिळतील. पण दहा दिवसात जर फरक ओळखता आला नाही, तर मात्र मला दहा हजार सोन्याच्या मोहरा द्‌याव्या लागतील."

तिन्ही मूर्ती लोकांना पाहण्यासाठी ठेवण्यात आल्या होत्या. नऊ दिवस असेच निघून गेले. कोणाला काहीच फरक सांगता आला नाही.

राजाला काळजी वाटू लागली. दहा हजार मोहरा तर द्याव्या लागतीलच, शिवाय हारही मानावी लागेल.

तेनालीराम म्हणाला, "महाराज, काळजी करू नका. अजून एक संपूर्ण दिवस बाकी आहे. काही करून यातला फरक शोधून काढूया."

दहावा दिवस आला. दरबारात सर्वजण काळजीत होते. तेनालीराम या मूर्तिंकडे परत परत टक लावून पहात होता.



त्याने एक पातळ काडी एका मूर्तीच्या कानात घातली. ती दुस-या कानातून बाहेर आली.

मग त्याने एक काडी दुस-या मूर्तीच्या कानात घातली. ती तिच्या तोंडातून बाहेर आली. जेव्हा त्याने काडी तिस-या मूर्तीच्या कानात घातली, तेव्हा ती आतच राहिली. सगळे लोक पहातच राहिले.

मग तेनालीरामने सर्वांना समजावून सांगितले, "तिन्ही मूर्तिंमध्ये हाच फरक आहे. पहिली मूर्ख आहे. जे काही ऐकते, ते दुस-या कानाने बाहेर सोडते.



दुसरी मूर्ती सर्वसामान्य लोकांसारखी आहे. जे काही ऐकेल, ते विचार न करताच सांगून टाकते.

पण तिसरी मूर्ती फार हुशार आहे. जे काही ऐकेल, त्यावर प्रथम ती नीट विचार करते."

दरबारातील सर्वांनी तेनालीरामच्या हुशारीचं खूप कौतुक केलं. परदेशातून आलेल्या विद्वानाने तेनालीरामला दहा हजार सोन्याच्या मोहरा आणि तिन्ही मूर्ती बक्षिस दिल्या.

तेनालीरामने त्या तिन्ही मूर्ती राजाला दिल्या आणि मोहरा आपल्याकडे ठेवून घेतल्या.



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju

आपली बाग

निळं आकाश! ताजी हवा! कोवळं उन्ह! या सगळ्या वातावरणात रंगीबेरंगी फुलं आनंदाने डोलत होती. गुलाब, जाई-जुई, चाफा, कमळ, जास्वंद अशी बागेत किती तरी प्रकारची फुलं होती.

त्यातच हिरवं गार गवत, निरनिराळ्या वेली आणि लहान झुडपं देखील बहरली होती. त्यामुळे फुलं अधिकच सुंदर दिसत होती. फुलांना आपल्या बागेचा खूपच अभिमान होता.

माळ्यानं एक दिवस बागेत एक नवं झाड लावलं. त्यावर एक वेगळ्याच प्रकारचं लाल फूल आलं. बाकीच्या फुलांना हे लाल फूल मुळीच आवडलं नाही. ते त्याच्यापासून दूर दूरच राहू लागले. लाल फूल एकटं पडलं आणि त्याला फार उदास वाटू लागलं.



एक दिवस एका छोट्याशा पांढ-या गुलाबाच्या फुलानं या लाल फुलाला हसून विचारलं, "मित्रा, तू कुठून आलास?"

लाल फूल यावर फारच खूष झालं आणि म्हणालं, "मी फार दूरवरून आलो आहे." आणि मग दोघांमध्ये गप्पागोष्टी सुरू झाल्या.

लाल फुलानं आपल्या पूर्वीच्या बागेची सगळी माहिती सांगितली. पांढ-या गुलाबानं उत्सुकतेनं लाल फुलाचं म्हणणं ऐकून घेतलं.

लवकरच दोघांची पक्की मैत्री जमली. दोघेही दिवसभर एकमेकांशी गप्पागोष्टी करू लागले. पांढरा गुलाब बदलणा-या हवामानाविषयी आणि बागेतल्या इतर झाडांविषयी सांगत असे आणि गप्पांमध्ये दिवस कधी संपायचा ते त्यांच्या लक्षातही येत नसे.

काही दिवसांनी माळी आणखी काही नवी झाडे घेऊन आला. बाकीची फुलं आणखीच काळजीत पडली. संपूर्ण बागच नव्या फुलांनी भरून जाईल की काय अशी त्यांना चिंता वाटू लागली.

पांढ-या गुलाबाने त्यांची समजूत घातली. "तुम्ही सगळे उगीचच काळजी करत आहात. ही नवी फुलं देखील आपले मित्रच आहेत." काही फुलांना हे ऐकून जरा बरं वाटलं.

पण इतर काही फुलांना मात्र स्वस्थ बसवेना. मधमाशा आणि फुलपाखरं त्यांच्याकडे आली की ते त्यांना सांगत, "तुम्ही नव्या फुलांकडे जाऊ नका. ते आपल्याहून वेगळे आहेत. ते आपले मित्र नाहीत."

पण मधमाशा म्हणाल्या, "आपल्याकडे सगळ्यांसाठी पुरेशी माती आहे. छान हवा, पाणी, उन्ह सगळं काही आहे. पुरेसे किडेही आहेत. का उगीच काळजी करता?"

थोड्याच दिवसांत निरनिराळ्या रंगीबेरंगी फुलांनी बाग बहरून गेली. दूरदूरचे लोक मुद्दाम बाग पाहण्यासाठी येऊ लागले. प्रत्येक फुलावर सूर्याची किरणं चमकू लागली. पावसाचे थेंब सगळ्या फुलांना न्हाऊ घालू लागले. हवेच्या झुळुकीबरोबर सगळी फुलं डोलू लागली.

आता सगळ्याच फुलांना दिलासा मिळाला. ती म्हणू लागली, "पांढरा गुलाब आणि मधमाशा म्हणत होत्या ते खरंच आहे. नव्या फुलांमुळे आपल्याला काहीच त्रास झाला नाही. त्यांनी आपली जागा देखील बळकावली नाही." मग बागेत सगळीकडे आनंदाचं आणि मैत्रीचं वातावरण पसरलं.

मग काय! अनेक प्रकारच्या फुलांनी आणि विविध रंगांनी बगीचा खुलून गेला. ही सुंदर बाग पाहण्यासाठी लोक दूरवरून येऊ लागले आणि खूष होऊन परत जाऊ लागले.



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist S. P. Raju

मूर्खांच्या शोधात

एक दिवस अकबर आणि बिरबलात वाद चालला होता. अकबर म्हणाला, "हुशार लोकांना ओळखणं एकवेळ सोपं आहे, पण मूर्खांना ओळखणं फारच कठीण आहे." पण बिरबलाचं म्हणणं होतं की मूर्ख लोक ओळखणं अगदी सोपं आहे.

तेव्हा अकबर म्हणाला, "असं जर असेल, तर मग उद्या दुपारपर्यंत तू आठ मूर्खांना घेऊन ये. मी त्या सगळ्यांना बक्षीस देईन. आणि त्याचबरोबर तुलाही बक्षीस मिळेल."



दुस-या दिवशी सकाळी बिरबल मूर्खांच्या शोधासाठी बाहेर पडला. रस्त्यात एक माणूस गाढवावर बसून जात होता. त्याच्या डोक्यावर कापडाचा एक मोठा गठ्ठा होता.

बिरबलाने त्याला विचारलं, "एवढं जड गाठोडं तू डोक्यावर का उचलून घेतलं आहेस? गाढवावरच का नाही ठेवत?"

त्या माणसानं उत्तर दिलं, "साहेब, माझं गाढव आता म्हातारं होऊ लागलं आहे. त्याच्यात आता पूर्वीसारखी ताकद राहिलेली नाही. त्याला जास्त वजन होऊ नये म्हणून तर मी हे गाठोडं माझ्या डोक्यावर घेऊन चाललो आहे."

हसत हसत बिरबलानं त्याला सांगितलं, "आज दुपारी दरबारात ये. महाराज तुला बक्षीस देतील." आणि बिरबल पुढे निघाला. थोडं अंतर गेल्यावर एक शेतकरी आणि त्याचा मुलगा शेतात काही तरी शोधत होते. बिरबलानं त्यांना विचारलं, "तुम्ही इथे काय शोधत आहात?"

शेतकरी म्हणाला, "आम्ही साठवलेले पैसे इथेच शेतात लपवले होते, ते शोधतो आहोत." बिरबल म्हणाला, "पण त्या जागेवर काही खूण ठेवली नव्हती का?"

मुलगा म्हणाला, "वा! खूण ठेवली होती तर! त्या दिवशी इथे एक मोर नाचत होता, त्याच्या जवळच तर पैसे खड्यात पुरले होते." हसत हसत बिरबलाने त्यांनाही दरबारात यायला सांगितलं.

मग बिरबल आणखी थोडा पुढे गेला. रस्त्यात दोन माणसं भांडत होती. बिरबलाने त्यांना दोघांना एकमेकांपासून दूर केलं आणि विचारलं, "काय झालंय?" त्यातला एकजण म्हणाला, "याला आपल्या वाघाकडून माझा बैल मारायचा आहे."

दुसरा म्हणाला, "हो तर! मी नक्कीच माझ्या वाघाला तुझा बैल मारायला सांगणार आहे." बिरबलाने इकडे तिकडे पहात विचारलं, "कुठे आहे तुमचा वाघ आणि बैल?"

पहिला माणूस म्हणाला, "आम्ही देवाकडे एक वर मागणार आहोत. मी जेव्हा म्हणालो की मी एक बैल मागणार आहे, तेव्हा हा म्हणू लागला की तो एक वाघ मागणार आहे. आता त्याला जर वाघ मिळाला तर तो माझ्या बैलाला मारणार नाही का?" बिरबलाने त्या दोघांनाही दरबारात यायला सांगितलं.

आणखी थोडं पुढे गेल्यावर बिरबलाला एक माणूस चिखलात पडलेला दिसला. तो आपले हात वर धरून उठण्याचा प्रयत्न करत होता. त्याला उठवण्यासाठी बिरबलाने त्याला हात दिला.

तो माणूस बिरबलाला म्हणाला, "माझ्या हाताला हात नको लावूस. मी जे कपाट बनवणार आहे त्याचं माप या दोन्ही हातानं घेतलेलं आहे. तू जर मला हात दिलास तर मी घेतलेलं माप बिघडून जाईल ना!"



बिरबलाने त्यालाही दरबारात यायला सांगितलं. बिरबलानं ज्या सहा लोकांना बोलावलं होतं, ते सगळे दुपारपर्यंत दरबारात येऊन पोचले. त्यांची सगळी हकीकत बिरबलाने राजाला सांगितली. दरबारातील लोकांना मूर्खांच्या गोष्टी ऐकून खूपच हसू आले आणि मजादेखील वाटली.

तिथे बोलावलेल्या सहा लोकांना काहीच समजले नाही. अकबराने दिलेलं बक्षीस घेऊन ते आनंदात घरी गेले. अकबराने बिरबलाकडे पाहून म्हटलं, "तुला आठ मूर्ख आणायला सांगितले होते, पण तू तर फक्त सहाच मूर्ख आणलेस. म्हणून तुला मात्र बक्षीस मिळणार नाही."

त्यावर बिरबलाने उत्तर दिलं, "दिवसभर मूर्खांना शोधत फिरलो म्हणून सातवा मूर्ख तर मीच आहे आणि आठवा मूर्ख म्हणाल तर... " असं म्हणून बिरबल थांबला.

अकबराच्या लक्षात आलं. तो हसत हसत म्हणाला, "या कामासाठी तुला पाठवणारा आठवा मूर्ख तर मीच आहे ना!" यावर दरबारात मोठाच हशा पिकला.



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju

हुशार मेंढरू

मेंढरानं हळूच बाहेर येऊन पाहिलं. सगळं किती छान दिसत होतं. हळू हळू मेंढरू गुहेच्या बाहेर आलं. त्याचे आई-बाबा तर चारा घेऊन एकदम संध्याकाळीच परत येणार होते.

मेंढराच्या आई-वडिलांनी जाताना त्याला सांगितलं होतं की, "जंगलात वाघ, सिंह, लांडगे असे सगळे प्राणी फिरत असतात. म्हणून तू एकटा कुठे जाऊ नकोस." पण मेंढराला काही चैन पडेना. फिरता फिरता तो बराच दूर गेला. अंधार पडू लागला तशी त्याला घराची आठवण येऊ लागली. पण परत जायचा रस्ता तर त्याला माहितच नव्हता!

जवळच त्याला एक गुहा दिसली. मेंढरू त्या गुहेत शिरलं. ती एका कोल्ह्याची गुहा होती. पण कोल्हा बाहेर गेला होता. आपले आई-बाबा परत येईपर्यंत तिथेच वाट पहात बसावं असा मेंढरानं विचार केला.






सकाळ झाली. कोल्हा आपल्या गुहेकडे परत आला. गुहेजवळ पोचल्याबरोबर 'आत कोणीतरी बसलं आहे' अशी कोल्हयाला शंका आली. तो गुहेच्या तोंडाशीच थबकला.

"कोण आहे रे आत? लगेच बाहेर ये पाहू!" कोल्ह्यानं धमकावणीच्या सुरात म्हटलं. पण मेंढरू थोडंच अशा धमकावणीला भिणार होतं! आवाज बदलून ते म्हणालं, "हा! हा! हा! मी आहे सिंहाचा बाप! मी एक दिवसात पन्नास वाघ खातो. लवकर जा आणि माझ्यासाठी पंचवीस वाघ पकडून आण!"

बस! हे ऐकून कोल्हा तर घाबरूनच गेला आणि तिथून पळत सुटला. तो गेला थेट वाघांच्या प्रमुखाकडे आणि म्हणाला, "वाघकाका, वाघकाका, माझ्या घरात एक भयानक प्राणी शिरला आहे. आणि तो खाण्यासाठी पन्नास वाघ मागतोय."







'हा! हा! हा!' वाघ हसू लागला. "अरे वा! असा कुठला प्राणी आहे जो खाण्यासाठी पन्नास वाघ मागतोय! जरा मला दाखव तरी! मी आत्ता त्याला पळवून लावतो!" .

या वेळेपर्यंत मेंढराचे आई-वडील त्याला शोधत तिथे येऊन पोचले होते. मेंढराच्या पायाच्या ठशावरून त्यांनी त्याला शोधून काढलं होतं.

मेंढराने आपल्या आई-वडिलांना सगळी हकीकत सांगितली. तेवढ्यात त्यांना वाघ आणि कोल्हा लांबून येताना दिसले. तिघेही गुहेत जाऊन लपले आणि त्यांनी एक बेत आखला.

वाघ आणि कोल्हा जसे गुहेजवळ आले, तसे मेंढराच्या आईने त्याचे कान जोरात ओढले. "आ...." मेंढरु जोरात ओरडलं.




बक-यानं आवाज बदलून विचारलं, "बाळ का ओरडतंय?"

बकरी म्हणाली, "बाळ हट्ट करतंय की इथे आल्यापासून त्याला फक्त हत्ती, अस्वल आणि म्हैसंच खायला मिळाली आहे. आज त्याला खायला वाघ हवा आहे."

बकरा म्हणाला, "ठीक आहे. मी वाघाला घेऊन यायला कोल्ह्याला पाठवलं आहे. आता इतक्यात ते येतीलच."

हे ऐकून वाघ भीतीनं कापूच लागला. 'बाप रे! आत बसलेलं बाळ हत्ती, म्हैस आणि अस्वलं खातं असं दिसतंय! मी जर त्याच्या तावडीत सापडलो, तर माझी काय दशा होईल!' असा विचार करून एक क्षणही वाया न घालवता तो तिथून पळत सुटला. मग कोल्हा थोडाच तिथे थांबणार होता!

भारतातील लोककथा



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

श्रावण बाळ

श्रावणबाळ मोठ्या प्रेमाने आपल्या आई-वडिलांची सेवा करत असे. त्याच्या आई-वडिलांना दिसत नसे आणि ते म्हातारेही झाले होते. फार दिवसांपासून त्यांची तीर्थयात्रेला जाण्याची इच्छा होती. पण ते एकटे कसे जाणार? म्हणून श्रावणबाळाने त्यांची ही इच्छा पूर्ण करायचं ठरवलं.

एक दणकट लाकूड आणि दोन टोपल्या घेऊन त्याने एक कावड बनवली. आई-वडिलांना त्या टोपल्यात बसवून तो त्यांना घेऊन तीर्थयात्रेला निघाला.






त्याला पाहून गावातल्या लोकांनी त्याला मनापासून खूप आशीर्वाद दिले.

श्रावणाने अनेक गावे, डोंगर आणि नद्या पार केल्या. वाटेतल्या लोकांना हे दृश्य पाहून आश्चर्य वाटे आणि ते त्यांची प्रेमाने चौकशी करत. असे असामान्य प्रवासी पाहून त्यांचे डोळे भरून येत.

बरेच महिने त्यांचा असा प्रवास चालू होता. एकदा ते दाट जंगलातून जात होते. अचानक पक्षी एकदम ओरडू लागले. हरणांचे कळप घाबरून पळू लागले. ससे आपल्या बिळात जाऊन लपून बसले. धाडसी श्रावणाला देखील भीती वाटू लागली.

अंधार पडू लागला होता. तिघेही एक झाडाखाली विश्रांती घेण्यासाठी थांबले. श्रावणाच्या वडिलांना तहान लागली होती. श्रावणाने पाहिलं तर कावडीला बांधलेल्या तांब्यातलं पाणी संपलं होतं.

"मी पाणी घेऊन येतो" असं म्हणून श्रावण पाणी आणायला निघाला. थोड्याच अंतरावर त्याला झुळुझुळु वाहणारी नदी लागली. त्याने आपला तांब्या पाण्यात बुडवला. त्यात पाणी भरलं जात असताना 'गुड..गुड..' असा आवाज येत होता.



त्याच वेळी शिकार करण्यासाठी तिथे आलेल्या दशरथ राजाने देखील तो आवाज ऐकला. दशरथ राजाला वाटलं की कोणीतरी प्राणीच पाणी पिण्यासाठी आला आहे. त्याने नेम धरून बाण सोडला. पण माणसाच्या ओरडण्याचा आवाज ऐकून राजा घाबरला.

आवाजाच्या दिशेने तो पळत निघाला. जखमी झालेला श्रावण दु:खाने विव्हळत असलेला पाहून राजाला फार वाईट वाटले. दशरथ म्हणाला, "मला क्षमा करा. कोणीतरी प्राणी पाणी पिण्यासाठी आला असेल असं समजून मी बाण सोडला. माझी चूक झाली."

दु:खाने विव्हळणारा श्रावण म्हणाला, "माझी काळजी करू नका. माझे आई-वडील तहानलेले आहेत, त्यांना हे पाणी नेऊन द्या."

श्रावणाची हकीकत ऐकून दशरथ राजाला फार पश्चात्ताप झाला. "अरेरे! हा आपल्या आई-वडिलांची किती प्रेमाने सेवा करता होता. अशा पुण्यवान व्यक्तीवर मी बाण सोडला."

"लवकर पाणी नेऊन द्या" असं म्हणतच श्रावण मरण पावला. दशरथाने त्याचं कलेवर आपल्या खांद्यावर उचलून घेतलं आणि दुस-या हातात पाण्याचा तांब्या घेऊन दशरथ निघाला.

पावलांचा आवाज ऐकून श्रावणबाळाचे आई-वडील म्हणाले, "बाळ, आलास का? इतका वेळ का लागला? तुला काही झालं तर नाही ना, अशी आम्हाला काळजी वाटू लागली होती. आता लवकर पाणी दे." दशरथ शरमेने कापत होता. थरथरत्या हाताने त्याने त्यांना पाणी दिलं आणि श्रावणबाळाच्या मृत्यूची बातमी सांगितली.

श्रावणाच्या आई-वडिलांच्या दुःखाला पारावर राहिला नाही. ते जोरजोरात रडू लागले. त्यांचा आवाज संपूर्ण जंगलात ऐकू येत होता. सगळीकडे दुःखाचं वातावरण पसरलं. 'आता मी यांचं सांत्वन कसं करू?' दशरथाला काही सुचेना. तो म्हणाला, "आजपासून तुम्ही मला तुमचा मुलगा समजा. माझ्याबरोबर चला."

दोघेही म्हणाले, "आम्ही श्रावणाशिवाय जगू शकत नाही. आम्हाला हे दुःख सहन होत नाही. जेव्हा तुझा मुलगा तुला सोडून जाईल तेव्हाच तुला आमचं दुःख समजेल." असं म्हणून दोघांनीही आपले प्राण सोडले.

अनेक वर्षांनंतर दशरथाची आपला मुलगा राम याच्यापासून ताटातूट झाली. ते दुःख दशरथाला सहन झालं नाही. अतिशय शोकाकुल असताना श्रावणाच्या वडिलांचे शब्द त्याला आठवू लागले.

P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist S. P. Raju

बासरीची जादू

चीनमध्ये पिंग नावाचा एक श्रीमंत माणूस रहात असे. तो नेहमी आपले पैसे मोजत असे. त्याच्या मुलांनी त्याला कधी खेळायला बोलावलं तर तो म्हणायचा, "मला वेळ नाही. मला पैसे मोजायचे आहेत."

त्याच्या घराजवळच ली नावाचा एक गरीब माणूस रहात असे. तो दिवसभर आपल्या शेतात काम करायचा. कधी मोकळा वेळ मिळाला की तो बासरी वाजवायचा. त्याची बायको, मुलं सगळे त्याची बासरी ऐकून खूष व्हायचे आणि आनंदानं डोलू लागायचे. प्राणी, पक्षी, झाडं, झुडपं सगळेच भान हरपून बासरी ऐकायचे.

बासरीचे मधुर स्वर पिंगच्याही कानावर पडत. मग त्याचं पैसे मोजण्यातील लक्ष विचलित व्हायचं. "अरे! मी कुठपर्यंत मोजलं होतं बरं? आता ते विसरूनच गेलं!" असं म्हणत तो परत पहिल्यापासून सुरुवात करायचा.

'ही कटकट आता काही तरी करून थांबवायलाच हवी.' असा विचार करून पिंगने एक उपाय शोधला. पैशांनी भरलेली एक थैली घेऊन पिंग लीच्या घरी गेला आणि ती थैली त्यानं ली ला भेट म्हणून दिली.






'त्याच्या हातात जेव्हा पैसे असतील, तेव्हा तो बासरी कशी काय वाजवतो ते मी बघतोच आता.' असा विचार करून मनातल्या मनात हसतच पिंग घरी आला.

ली ला काहीच समजेना. इतके पैसे तर त्याने कधी पहिलेच नव्हते. तो ते पैसे मोजू लागला. अर्धे पैसे मोजून झाल्यावर त्याला शंका आली. 'मी बरोबरच मोजलंय ना, की काही चूक झाली आहे?' तो परत पहिल्यापासून मोजू लागला. असं होता होता सगळा दिवस त्यातच गेला. ली नं त्या दिवशी बासरी वाजवलीच नाही.

'आता ही पैशाची थैली कुठं बरं संभाळून ठेवावी?' अशी दुस-या दिवशी ली ला काळजी पडली. प्रथम त्याने ती एका घड्यात ठेवली, मग एका पेटीत, मग माळ्यावर, असा तो सारखा जागा बदलत राहिला. अखेर त्यानं ती थैली एका विहिरीत लपवून ठेवली. त्या दिवशी देखील त्याने अजिबात बासरी वाजवलीच नाही.

तिस-या दिवशी तो विचारात पडला की 'आता हे पैसे कसे खर्च करू? बैल घेऊ की नांगर घेऊ, का कोंबड्या आणू?' त्या दिवशी देखील त्याने बासरी वाजवलीच नाही.



नंतरच्या दिवशी त्याच्या मनात आणखी एक शंका आली. 'सगळ्या गोष्टी विकत घेण्यासाठी त्या थैलीत पुरेसे पैसे असतील ना?' मग विहिरीत लपवलेली थैली त्याने परत बाहेर काढली आणि पैसे मोजायला सुरुवात केली.

त्यावेळी त्याच्या मुलांनी त्याला विचारलं, "बाबा, तुम्ही बासरी का नाही वाजवत?" ली एकदम रागावला. "आता मला वेळ नाही, मला पैसे मोजायचे आहेत." ली ची ही गडबड पाहून त्याची बायको फार उदास झाली.



मग ती ली ला म्हणाली, "प्रेम हीच सर्वात मोठी संपत्ती आहे. ज्यांच्याकडे प्रेम, माया आहे, ते कधीच गरीब होत नाहीत."

थोडा वेळ ली ने पैसे मोजायचे थांबवले. मान वर करून आकाशाकडे पाहिलं. चांदण्यानी भरलेलं आकाश त्याला बागेसारखं वाटलं. बराच वेळ तो आकाशाकडे पहातच राहिला. संपत्तीचं काय करायचं ते आता त्याच्या लक्षात आलं.

रात्रभर जागून त्याने ब-याच बास-या बनवल्या. सकाळ होताच तो पिंगच्या घरी गेला. पैसे भरलेली थैली त्याने पिंगला परत दिली आणि म्हणाला, "यामुळे माझ्या मनाची शांती नाहीशी होऊ लागली होती. हे मला नको. बासरी ही माझी संपत्ती आहे आणि ती आपण दोघेही वाटून घेऊया." ली ने बास-यांचा एक गठ्ठाच पिंगला दिला.

लगेच पिंगच्या मुलांनी एक एक बासरी घेऊन वाजवायला सुरुवात केली आणि ते खुशीने डोलू लागले. ली म्हणाला, "सोनं आणि चांदीची आपण किंमत करू शकतो, पण सुख आणि शांती तर अनमोल आहे." पिंगही मग याचा विचार करू लागला. मग त्यानेही एक बासरी उचलली आणि वाजवायला सुरुवात केली.

चिनी लोककथा



Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi


Marathi Sujata Godbole

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Artist S. P. Raju

राजा आणि खार

ब-याच वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एक होता राजा. तो विद्वान, बलवान, हुशार आणि खूप श्रीमंत होता. एक दिवस बागेत फिरता फिरता तो आपल्या प्रधानाला म्हणाला, "माझ्यासमोर कोणीही आपली स्वत:ची प्रशंसा करण्याची हिम्मत करत नाही. कारण मीच सर्वश्रेष्ठ आहे."



प्रधान हसला आणि म्हणाला, "क्षमा करा महाराज! प्रत्येक व्यक्तीला स्वत:बद्दल गर्व वाटतोच. अशक्त व्यक्ती देखील आपल्याला बलवान समजते. जे कोणी असा गर्व करतील त्यांच्याकडे दुर्लक्ष करणंच योग्य ठरेल. इतरांनी कितीही गर्व केला तरी आपली मन:शांती बिघडू देऊ नये, हेच खरं."

तेवढ्यात तिथे एक खार आली. तिच्या हातात एक नाणं होतं. ते नाणं दाखवून ती गाऊ लागली:

"ऐका हो ऐका, पैसा पहा कसा छळतो
माझं नाणं पाहून राजा सुद्धा जळतो"

हे ऐकून राजा चांगलाच संतापला आणि खारीला पकडण्यासाठी तिच्यामागे धावला. खार पळून गेली, पण तिचं नाणं मात्र खाली पडलं. राजाने ते उचलून घेतलं.



त्याच दिवशी संध्याकाळी राजा आपल्या महालात बसून पाहुण्यांशी बोलत होता. अचानक खार तिथे आली आणि गाऊ लागली:

"मी आहे श्रीमंत राणी, काय सांगते ऐका
माझं धन घेऊन, बसलाय इथला राजा"

राजा फारच संतापला, पण पाहुण्यांसमोर तो काहीच करू शकला नाही. त्याला आपल्या रागावर ताबा ठेवावा लागला. दुस-या दिवशी सकाळी राजा गरिबांना दान-धर्म करत होता. खार परत तिथे आली आणि गाऊ लागली:

"काय सांगू, कसं सांगू, तुम्हीच आता समजून घ्या
राजा करतो दान-धर्म, पण धन तर आहे सगळं माझंच"

राजाने आपल्या सेवकांना सांगितलं, "या दुष्ट खारीला पकडून माझ्यासमोर घेऊन या." पण खार थोडीच अशी सापडणार होती! ती तिथून निसटलीच! दुपारी राजा भोजन करत होता तेवढ्यात खारीनं खिडकीतून डोकावून पाहिलं आणि परत गाऊ लागली:

"सगळे या, पहा पहा, राजवाड्यातली श्रीमंती
माझ्याच पैशांनी राजा करतो मेजवानी"







राजा हे ऐकून फारच संतापला आणि भोजन सोडून उठून गेला. रात्रीच्या जेवणाच्या वेळी पण खार परत आली आणि तेच गाणं गाऊ लागली. आता तर राजाच्या संतापाला पारावारच राहिला नाही. त्याने खारीचं नाणं काढलं आणि तिच्याकडे फेकून दिलं. खारीनं आपलं नाणं उचललं आणि परत गाऊ लागली:

"पहा हो पहा, राजाची कशी जिरली
मला घाबरून माझी संपत्ती परत केली"



राजाने चिडून खारीचा पाठलाग केला, पण ती सापडलीच नाही. राजाला रात्रभर झोप आली नाही. सकाळी उठल्याबरोबर त्याने प्रधानाला सांगितलं, "सैन्य पाठवा आणि सगळ्या खारींना मारून टाका."

प्रधानाने राजाची समजूत घालायचा प्रयत्न केला. तो म्हणाला, "महाराज, तुम्हाला खूप राग आलाय हे मला माहित आहे. पण शेतात, दाट जंगलात, डोंगरद-यात लाखो खारी राहतात. त्या सर्वांना पकडायचं ही काही सोपी गोष्ट नाही. आणि जरी पकडलं तरी शेजारच्या देशातल्या खारी आपल्याकडे येतील, त्यांचं काय करणार? शिवाय आपल्या शूर सैनिकांना आपण जर खारी पकडायला पाठवलं, तर ते निराश नाही का होणार? इतकंच नव्हे, तर इतिहासात 'खारीशी लढणारा राजा' अशी तुमची नोंद होईल आणि तुमची चेष्टा केली जाईल."

"मग मी करू तरी काय?" राजाने निराश होऊन विचारलं. प्रधान म्हणाला, "तुम्ही खारींकडे मुळीच लक्ष देऊ नका. सुरुवातीला जेव्हा खार टोमणे मारत होती, तेव्हा तुम्ही जर न रागावता तिचं म्हणणं ऐकून घेतलं असतं तर गोष्ट इतकी वाढलीच नसती."



दुस-या दिवशी खार परत आली आणि पहिल्या दिवशीसारखी गाऊ लागली. राजा हसला आणि गाऊ लागला:

"तू धनाची राणी आहेस हे तर खरंच आहे गं खारी
पण तू तर आहेस सर्वज्ञानी हे देखील जाणतात सारी"

हे ऐकून खार आश्चर्यचकित झाली आणि काही न बोलता तिथून निघून गेली ती परत कधीच आली नाही.

भारतातील लोककथा

© Katha Jharna 2008

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy

एक थेंब



पाण्याच्या एका थेंबानं सूर्यप्रकाशाकडे पाहून विचार केला, 'मला या प्रकाशाजवळ जाता आलं तर किती मजा येईल!' त्यानं इतर थेंबांना तिथं जाण्याचा रस्ता विचारला.



काही थेंबांनी म्हटलं, "वाफ होऊन जाता येईल, पण आपण घड्यातच सुरक्षित आहोत."


पण या छोट्या थेंबाला मात्र काहीही करून बाहेर पडायचंच होतं. तो घड्याच्या तोंडापर्यंत येऊन पोचला आणि चटकन उडी मारून घड्याबाहेर पडला.



एक क्षण त्या थेंबाला भीती वाटली. पण जसं त्याचं लक्ष सूर्याकडे गेलं, तशी त्याची भीती पळून गेली. वाफ होऊन वर जाण्याची त्याला खूपच मजा वाटली.

त्याला कापसासारखे पांढरे ढग दिसू लागले. ते वाफ झालेल्या इतर थेंबांपासून बनले होते. छोट्या थेंबाने त्यांना प्रकाशाकडे जाण्याचा रस्ता विचारला.

त्याला बरीच निरनिराळी उत्तरं मिळाली. "मला माहित नाही", "तिकडे वळून जा", "आणखी वर जा..." थेंब बरेच दिवस इकडे तिकडे भटकत राहिला.






एक दिवस त्याला एक वेगळ्याच प्रकारचा ढग दिसला. तो खूप मोठा, काळा आणि जड होता. छोटा थेंब उडी मारून त्या ढगात गेला.

त्या रात्री तो ढग फार अस्वस्थ होता. त्याचा गडगडाट होत होता. वीज कडाडली की त्याचा चमचमाट होत होता. तेव्हा थेंबाच्या लक्षात आलं की तो भलत्याच ढगात आला आहे.

जसजसा जोराचा वारा वाहू लागला आणि विजा चमकू लागल्या, तसा पाण्याचा थेंब जोरात खाली आला आणि एका झ-यात जाऊन पडला.

थेंबाने विचार केला, 'मला तर प्रकाशाकडे जायचं होतं, आणि इथे कुठे येऊन पडलो!' वेगाने वाहणा-या झ-याच्या प्रवाहातून तो कितीतरी गुहा, डोंगर, द-यांमधून वाट काढत खूप दूरवर वहात गेला.



हळू हळू झ-याची गती कमी कमी होऊ लागली. छोट्या थेंबाने विचारलं "हा झरा कुठे निघाला आहे?" त्याला उत्तर मिळालं, "आता हा नदीला जाऊन मिळणार आहे.

छोट्या थेंबाला आता या प्रवासात खूप मजा येऊ लागली होती.

झ-याच्या दोन्ही बाजूंना मोठमोठे वृक्ष होते. कुठे कुठे झाडातून सूर्याची किरणं आली की पाणी चमकत होतं.

छोटा थेंब वेगाने नदीला जाऊन मिळाला. नदीचा प्रवाह थेंबाला फारच आवडला. नदीला आता सागराला जाऊन मिळण्याची ओढ लागली होती.
ती त्याच दिशेने निघाली होती.

थोड्या वेळाने थेंब सागरात जाऊन पोचला.


थेंबाने आकाशाकडे पाहिलं. त्याला कापसासारखे पांढरे ढग दिसले. सगळ्यात प्रथम थेंब ज्या पांढ-या ढगात गेला होता त्याची त्याला आठवण झाली.

ढगांना सोडून थेंबाने आपली नजर आता सूर्याकडे वळवली. आता काय करायला हवं ते थेंबाच्या लक्षात आलं. थेंब किना-याकडे गेला आणि जोरात उडी मारली. वाफ होऊन तो परत वर जाऊ लागला.





आकाशात गेल्यावर त्याला सर्वकाही स्पष्ट दिसू लागलं. दिवसा सूर्य आणि रात्री तारे. मग थेंबाने खाली पाहिलं. ज्या समुद्रातून तो वर आला होता तो समुद्र, त्याला प्रवाहातून घेऊन आली होती ती नदी, तो खाली पडला होता तो झरा... सर्व काही स्पष्ट दिसत होतं.



छोट्या थेंबाभोवती आता छोटे छोटे ढग जमू लागले होते. काय करायचं ते थेंबाला आता माहित झालं होतं. तो ढगातून निघाला आणि खूप उंचावर गेला आणि दिसेनासा झाला.

थेंबाच्या आता लक्षात आलं होतं की तो स्वतंत्र होता.

'वन ड्रॉप ऑफ वॉटर'
या ख्रिस्तोफर ई. जोन्स यांच्या कथेवर आधारित

Katha Jharna 2008

P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

वाघावरची स्वारी

त्या दिवशी जंगलात खूप जोरदार पाऊस पडत होता. सगळीकडे अंधार झाला होता. विजा कडकडत होत्या आणि जोराचं वादळ घोंघावत होतं. वादळामुळे बरीचशी झाडंही उन्मळून पडली होती. खूप घाबरलेला एक वाघ जंगलातून बाहेर पळून गेला. तो जवळच्याच एका गावाजवळ पोचला आणि एका झोपडीच्या भिंतीचा आडोसा पाहून तिथे उभा राहिला.



झोपडीत बसलेली एक बाई बोलत होती, "फक्त दोन दिवसच थोडासा आराम मिळाला. ही 'टपटपी' परत आली!" पावसामुळे तिची झोपडी गळत होती. आणि घरातलं सामान, पेटारे, भांडीकुंडी सगळं काही तिला इकडे तिकडे हलवावं लागत होतं. धडाड धूम... धडाड धूम... असा त्यांचा आवाज होत होता आणि झोपडीची भिंत त्यामुळे हलत होती.

वाघ हे ऐकून घाबरला. 'हे 'टपटपी' काय प्रकरण आहे कोण जाणे! त्याचा आवाजच इतका भयानक आहे की प्रत्यक्षात ते किती भयंकर असेल!' वाघाला काहीच सुचेना.

तेवढ्यात गावातला भोलानाथ आपल्या गाढवाला शोधत शोधत तिथे आला. म्हातारीच्या झोपडीच्या भिंतीजवळ एक प्राणी उभा असलेला त्याला दिसला. अंधारात त्याला वाटलं की ते त्याचं गाढवच आहे. रागानेच भोलानाथने त्याचा कान पिळला आणि ओरडला, "अरे! तुला काय वेड लागलंय का? इतक्या पावसात तुला आता कुठे शोधत फिरू? आता मुकाट्यानं घरी चल." आणि तो वाघावर बसला आणि घराकडे निघाला.

आतापर्यंत वाघाचे कान असे कोणीच पिळले नव्हते. म्हणून वाघ तर भीतीने कापूच लागला. 'टपटपी''च्या भीतीनं तो काहीच बोलला नाही. मुकाट्यानं चालत राहिला. घरी पोचल्यावर भोलानाथाने त्याला घरासमोर दोरीनं बांधलं आणि झोपायला घरात निघून गेला.

दुस-या दिवशी भोलानाथची बायको सकाळ झाल्याबरोबर बाहेर आली. घरासमोर बांधलेला वाघ पाहून ती किंचाळायलाच लागली. तिचा आवाज ऐकून भोलानाथही बाहेर आला.

वाघाला पाहून तो ही ओरडतच घरात शिरला आणि घराचं दार आतून बंद करून घेतलं.

गावातले लोकही भोलानाथच्या घरासमोर बांधलेल्या वाघाला पाहून सैरावैरा धावू लागले. या सगळ्या गडबडीत भांबावलेल्या वाघानं दोरी तोडून टाकली आणि आपला जीव वाचवण्यासाठी जंगलात पळून गेला.



'भोलानाथ वाघावर बसून आला होता' ही बातमी गावात सगळीकडे पसरली. सगळे त्याला भेटायला येऊ लागले. आश्चर्यानं त्याला विचारू लागले, "तू खरंच का वाघावर बसून आलास?"

भोलानाथ गर्वानं त्यांना सांगायचा, "नुसता वाघावर बसलो इतकंच नाही, तर मी त्याचे कान देखील पिरगळले!" ही बातमी राजापर्यंत पोचली. राजाने भोलानाथला मोठं बक्षीस देऊन त्याचा सन्मान केला.

काही महिन्यांनी शत्रूच्या सैन्याने राज्यावर हल्ला केला. राजाने लगेच आपल्या प्रधानाला हुकूम दिला, "जो शूर बहाद्दूर माणूस वाघावर बसला होता, त्याला शत्रूशी सामना करायला ताबडतोब जायला सांगा. तो शत्रूला निश्चितच हरवेल. त्याला माझा हा सर्वात शक्तिशाली घोडा द्या."

राजाचा हुकूम ऐकून भोलानाथ चांगलाच अडचणीत आला. त्यानं विचार केला, 'आता आपली काही यातून सुटका नाही. लढाईवर तर जावंच लागेल!' तो याआधी कधी घोड्यावर



बसलाही नव्हता. मोठा प्रयत्न करून तो घोड्यावर बसला आणि त्यानं आपल्या बायकोला सांगितलं, "मला घोड्यावर चांगलं घट्ट बांधून टाक, म्हणजे मी घोड्यावरून पडणार तरी नाही." भोलानाथाच्या बायकोनं त्याला घोड्यावर सगळ्या बाजूंनी घट्ट बांधून टाकलं. घोडा वेगाने दौडू लागला. शेतं, नद्या, डोंगर पार करून घोडा शत्रूच्या सैन्याकडे जाऊ लागला.

"अरे बापरे! तिकडे नको जाऊस!" भोलानाथ जोरात ओरडला. या घोड्याला कसं थांबवावं हे त्याला समजेना. घाबरून त्याने आपले दोन्ही हात वर केले आणि झाडाची एक फांदी पकडली. पण तरीही घोडा दौडतच राहिला. माती ओली असल्यामुळे सबंध झाडच जमिनीतून उखडलं गेलं आणि भोलानाथाच्या हातात आलं.

एक मोठं झाड हातात फिरवत घोड्यावरून वेगाने त्यांच्याकडे येणा-या भोलानाथला शत्रूनं पाहिलं.



त्यांच्यातला एकजण म्हणाला, "अरे तो किती बलवान आहे पहा. त्याने तर सबंध झाडच उपटून आणलं आहे. तो आपल्याशी लढायलाच येतोय. जो वाघावर बसला होता तोच हा माणूस असणार." मग सगळेच आपला जीव वाचवण्यासाठी दूर जाऊन लपून बसले.

थोड्या वेळाने घोडा एक झटका देऊन थांबला. दोरी तुटली आणि भोलानाथ खाली पडला. सुदैवाने त्यावेळी तिथे कोणीच नव्हते. भोलानाथ स्वत:शीच म्हणाला, "देवाचीच कृपा झाली आणि माझा जीव वाचला." मग तो घोड्याला घेऊन चालत चालत घरी निघाला. आता तो कशाला उगीच घोड्यावर बसेल!

लोकांनी त्याला चालत परत येताना पाहिलं. ते आश्चर्यानं म्हणाले, "पहा! यानं एकट्यानंच लढून शत्रूला हरवलं. एवढं मोठं काम करून देखील तो साधेपणानं चालतच घरी येतो आहे. हा खरंच फार महान आहे!"

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju

मायावी सरोवर



पांडवांचा १२ वर्षांचा वनवास संपत आला होता. एक दिवस पांडवांनी जंगलात एका हरणाचा पाठलाग केला. ते एक मायावी हरिण होते. पळता पळता त्याने पांडवांना जंगलात खूप दूरवर नेले आणि मग ते दिसेनासेच झाले. त्यामुळे थकलेले आणि निराश झालेले पांडव एका वडाच्या झाडाखाली बसले. युधिष्ठीर म्हणाला, "फार तहान लागली आहे, बाबा!"

नकुल एका झाडावर चढला आणि आजूबाजूच्या परिसरावर नजर टाकून म्हणाला, "जवळच खूप गवताळ प्रदेश आहे, सारस पक्षीही उडताहेत. म्हणजे तिथे पाणी असणार. मी लगेच जाऊन पाणी घेऊन येतो."

थोडंसं अंतर गेल्यावर त्याला एक तळं लागलं. त्यानं तळ्यात हात घातला, तेवढ्यात अचानक आकाशातून आवाज आला, "थांब! हे माझं तळं आहे. अगोदर माझ्या प्रश्नाचं उत्तर दे आणि मगच पाणी पी."






नकुल एकदम दचकला. पण त्याला फार तहान लागली होती. त्यामुळे या इशा-याकडे दुर्लक्ष करून तो पाणी प्यायला. पाणी प्यायल्याबरोबर तो जमिनीवर पडला.

बराच वेळ झाला तरी नकुल परत आला नाही म्हणून युधिष्ठिराने सहदेवाला त्याला शोधण्यासाठी पाठवलं. तो ही तळ्याशी पोचला. आवाजाकडे लक्ष न देता तो ही पाणी प्यायला आणि बेशुद्ध होऊन जमिनीवर पडला. मग त्या दोघांना शोधत अर्जुन तिथे आला. आपल्या भावांची अवस्था पाहून तो आश्चर्यचकित झाला. त्यालाही एका विचित्र प्रकारच्या तहानेनं व्याकूळ केलं. तो पाण्याकडे ओढला जाऊ लागला आणि त्याने पाण्यात हात घातला.

परत तोच आवाज आला, "प्रथम माझ्या प्रश्नाचं उत्तर दे नाहीतर तुझी पण हीच अवस्था होईल." अर्जुनाला हे ऐकून फार संताप आला. तो म्हणाला, "हिम्मत असेल, तर समोर येऊन माझ्याशी लढ." असं म्हणून त्याने बाण काढला. पण आधी पाणी पिऊन पूर्ण ताकदीनिशी लढावे असा विचार करून तो पाणी प्यायला. पाणी प्यायल्याबरोबर तो देखील खाली कोसळला.

मग भीमानेही तोच आवाज ऐकला. "तू कोण मला आज्ञा करणारा?" असं रागानं म्हणून भीमही पाणी प्यायला आणि जमिनीवर बेशुद्ध पडला. अखेर युधिष्ठीर तिथे आला. आपल्या भावांची अवस्था पाहून त्याला रडूच कोसळले. तहानेने व्याकूळ झालेला युधिष्ठीरही तळ्याकडे निघाला. तेव्हा त्याच आवाजाने त्यालाही थांबवलं.



"तुझ्या भावांनी माझ्या बोलण्याकडे लक्ष दिलं नाही. आता निदान तू तरी माझ्या प्रश्नांची उत्तरं देऊन मग पाणी पी." हा यक्षाचा आवाज आहे हे युधिष्ठिराने ओळखलं आणि तो म्हणाला, "तू तुझे प्रश्न विचार. मी उत्तरे देईन." यक्षाने एकामागून एक प्रश्न विचारले आणि युधिष्ठीर त्यांची उत्तरे देत गेला:

"माणसाला आयुष्यभर कशाची साथ मिळते?"

"उत्साहाची."

"संकटसमयी माणसाला कोण वाचवतं?"

"साहस."

"यशस्वी होण्याची पहिली पायरी कोणती?"

"सततचा प्रयत्न."

"माणूस हुशार कसा होतो?"


"बुद्धिमान लोकांच्या सहवासाने."

"प्रवासात कशाचा उपयोग होतो?"

"शिक्षणाचा."

"सर्वात जास्त फायदा कशाने होतो?"

"निरोगी आयुष्याने."





"माणूस सगळ्यांचा आवडता कधी होतो?"

"घमेंड सोडल्यावर."

"अशी कोणती गोष्ट आहे की जी गेल्याने माणसाला आनंद होतो, दु:ख नाही?"

"राग. तो गेल्याने माणसाला आनंद होतो, दु:ख नाही."

"दु:खाचं कारण काय?"

"अपेक्षा आणि राग."

"पृथ्वीपेक्षा अधिक सहनशील कोण आहे?"

"आपल्या मुलांची देखरेख करणारी आई."

युधिष्ठिराने अशा अनेक प्रश्नांची ताबडतोब उत्तरे दिली. अखेर यक्ष त्याला म्हणाला, "तुझी उत्तरे ऐकून मी प्रसन्न झालो आहे. तुझ्या मेलेल्या भावांपैकी तू म्हणशील त्याला मी जिवंत करेन."

युधिष्ठीर म्हणाला, "नकुलाला जीवदान दे." यक्ष लगेच त्याच्यासमोर प्रगट झाला आणि म्हणाला, "भीम तर सोळा हजार हत्तीइतका बलवान आहे. अर्जुन धनुर्विद्येत प्रवीण आहे. त्या दोघांना सोडून तू नकुलासाठी जीवदान का मागितलंस?"

युधिष्ठीर म्हणाला, "माझ्या वडिलांना कुंती आणि माद्री अशा दोन पत्नी आहेत. मी कुंतीचा पुत्र आहे, म्हणून माद्रीच्या पुत्रासाठी जीवदान मागत आहे." युधिष्ठिराचा हा नि:पक्षपातीपणा पाहून यक्ष अतिशय प्रसन्न झाला आणि त्याने सर्वच भावांना परत जिवंत केले.

P. Saraswati   V. Vijayakanthi
L. S. Saraswathi   S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy



चला ओळखूया

आठ पाय चालतात आणि माझी दोन चाके फिरवतात
खटकेदार चालीनं निघते मी थडक थडक करत




आकाशात उडतं पण पक्षी नाही
ढगांमागे लपतं पण चंद्र नाही

दोन रेषांवर सरपटत जाते, सगळ्यांना मी नेते आणते
नदीवरून उडी मारते, जंगल दाखवते, डोंगरात घुसते
शिटी वाजवते, झुकझुक चालते, मुलांना तर मी फार आवडते



जितकी दामटाल तितकी पळेल, अशी ही गोष्ट
तिची साथ धराल, तर ठेवेल धष्टपुष्ट




नेहमी जातात बरोबर, पण दोस्त नाही
कधी नाही भेटत, पण शत्रूही नाही

बिनपायानी चालते आणि हात नसून पोहते
हिच्यात बसून आलात तर नदीपार घेऊन जाते



लहान-मोठ्या पन्नास जणांना घेऊन दौडत जाते
एकाच्याच मदतीनं सगळ्यांना घरी पोचवते



लाथ मारली तर गुरगुरते
नंतर मजेत फिरवून आणते



निरनिराळी ठिकाणं जोडते, मी जमिनीवरली रेघ
सगळे मला तुडवून जातात, हेच माझं दैव




तोंड नसून बोलतं, जीव नसला तरी गावोगावी जातं
सुख-दु:खाच्या गोष्टी करायला बिनपायांनी घरी येतं


माझी घंटी ऐकलीत की या माझ्याजवळ
मला उचला आणि बोला मनमुराद

राहते बसून एकाजागी, हिच्या पोटात माहिती जगाची
अशी ही एक अदभूत पेटी

शोधून काढेन तुमचं घर,
आणि देईन नवी खबर


पैसे देऊन विकत घ्या, मग काडीनं मला चिकटवा
देश-विदेशी मी जाणार, नीट ओळखा, मारू नका बाता





असा एक डबा, ज्यात आहे सगळं काही
चित्रपट, धारावाहिक, खेळ आणि बातम्या
पहा सगळं घरात बसून आपल्या


भल्या सकाळी येतो मी तुमच्या घरी
जगातल्या सगळ्या बातम्या आणि विचार देतो मी



हवेतून येणारं संगीत, पकडतं क्षणात
कान पिळला की ऐकवतं, असं यंत्र कोणतं?

जे काही म्हणाल ते राखून ठेवीन माझ्याकडे
हवं तेव्हा परत देईन, तुमच्या मर्जीप्रमाणे

पत्र, आगगाडी, होडी, पोस्टमन, रेडीओ, स्कूटर, रस्ता, आगगाडीचे रूळ, पोस्टाची पेटी, टेलिव्हिजन, बैलगाडी, टेपरेकॉर्डर, बस, टेलिफोन, पोस्टाचं तिकीट, वर्तमानपत्र, सायकल, विमान.



P. Saraswati V. Vijayakanthi
L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation
Marathi Sujata Godbole
Artist Uma Krishnaswamy

शौर्याची परीक्षा




जपानमध्ये एक वेगळ्याच प्रकारची शाळा होती. तिचे वर्ग होते आगगाडीच्या डब्यात. शाळेभोवती एक विस्तीर्ण बाग होती. तोतोचान नावाची एक मुलगी या शाळेत शिकत होती.

एकदा तोतोचानच्या शाळेत एक शिबीर भरलं. असेम्ब्ली हॉलमध्ये तंबू लावण्यात आले आणि रात्री सर्व मुलं तिथेच राहिली. मुख्याध्यापकांनी जाहीर केलं की, "एका रात्री आपण शौर्याची परीक्षा घेणार आहोत. ती कुहोन्बुत्सू मंदिरात होईल. ज्या मुलांना भूत बनायचं आहे, त्यांनी हात वर करा."

सात मुलं भूत बनण्यासाठी पुढे आली. ठरलेल्या दिवशी संध्याकाळी मुलं शाळेत जमली. ज्या मुलांना भूत व्हायचं होतं ते आपल्याबरोबर आपला पोशाखही घेऊन आले होते. ते सगळे पोशाख घालून तयार झाले आणि मंदिराच्या बागेत जाऊन लपले.

"आम्ही तुम्हाला इतके घाबरवून सोडू की तुम्हाला त्याची कायमची आठवण राहील!" जाता जाता ते म्हणाले. उरलेल्या तीस मुलांनी पाच पाच जणांचे गट केले. आणि थोड्या थोड्या वेळाने सगळे गट मंदिराकडे गेले. सगळ्यांना पहिल्याने मंदिरात जाऊन नंतर दफनभूमीच्या भोवती चक्कर मारून शाळेत परत यायचं होतं.

मुख्याध्यापकांनी समजावून सांगितलं की, "ही शौर्याची परीक्षा आहे हे जरी खरं असलं, तरी कोणाला जर त्याआधीच परत यायचं असलं तरी येता येईल." तोतोचान आपल्या आईकडून एक टॉर्च घेऊन आली होती. काही मुलं म्हणाली की त्यांना भुतांना पकडायचं होतं आणि त्यासाठी त्यांनी फुलपाखरं पकडायची जाळी आणली होती. काही म्हणाले की ते भुतांना बांधून ठेवणार होते म्हणून त्यांनी आपल्याबरोबर दोरी आणली होती.



मुख्याध्यापकांनी सर्वकाही नीट समजावून सांगेपर्यंत आणि मुलांचे गट तयार होईपर्यंत चांगलाच अंधार पडला होता. उत्साहाने गडबड करत सगळी मुलं शाळेबाहेर पडली. अखेर तोतोचानच्या गटाची बाहेर पडण्याची वेळ आली.



मुख्याध्यापकांनी सांगितलं की मंदिराशी पोचेपर्यंत त्यांना भूत दिसणार नाही. पण मुलांचा त्यावर विश्वास नव्हता. ते भीतभीतच मंदिराच्या दरवाजापर्यंत पोचले. देवांच्या आणि राजांच्या मोठाल्या मूर्ती द्वारपालासारख्या दिसत होत्या.

चांदणी रात्र होती पण मंदिराच्या आवारात चांगलाच अंधार होता. दिवसा मुलांना हे आवार खूप आवडत असे. पण रात्री आणि विशेषतः त्या रात्री ही जागा त्यांना भीतीदायक वाटू लागली.

वारा आला की झाडांमधून सळसळ असा आवाज येत होता. एक मुलगा "ओय ओय" असा ओरडला. कोणाचा तरी पाय एका मऊ वस्तूवर पडला आणि तो "भूत! भूत!" असा ओरडायला लागला. सगळे इतके घाबरले होते की आपल्या मित्राचा हात देखील भुताचा हात आहे असं त्यांना वाटायला लागलं होतं.

तोतोचाननं ठरवलं होतं की काही झालं तरी ती दफनभूमीपर्यंत जाणार नव्हती कारण तिथे भूत असण्याची बरीच शक्यता होती. शौर्याची परीक्षा कशी होते ते तर तिला आता समजलंच होतं. म्हणून तिला आता परत जायचं होतं. तिच्या गटातल्या इतर मुलांनीही तसाच विचार केला होता. म्हणजे हा निर्णय काही तिचा एकटीचा नव्हता म्हणूनही तिला आता बरं वाटत होतं. मग ते सगळेजण जमेल तितक्या जोरात पळत सुटले.

शाळेत आल्यावर त्यांना दिसलं की जे गट त्यांच्या आधी निघाले होते, ते त्यांच्यापूर्वीच शाळेत परत आले होते. तेव्हा त्यांना कळलं की दफनभूमीपर्यंत जाण्याचा धीर कोणीच केला नव्हता.

त्याच वेळी डोक्यावरून पांढरी चादर घेतलेला एक मुलगा रडत रडत तिथे आला. त्याच्याबरोबर एक शिक्षकही होते. भूत बनलेल्या मुलांमधला तो एक मुलगा होता. बराच वेळ तो दफनभूमीत वाट पहात बसला होता, पण कोणीच आलं नाही म्हणून तो घाबरला होता.



रडत रडत तो बाहेर आला. वाटेत त्याला एक शिक्षक भेटले आणि ते त्याला परत घेऊन आले होते.

काही मुलं त्याला शांत करण्याच्या प्रयत्नात होती, तेवढ्यात आणखी एक भूत एका मुलाबरोबर रडत रडत परत आलं. हे भूत दफनभूमीत लपून बसलं होतं. अचानक त्याला कुणाच्या तरी पळण्याचा आवाज आला. त्याला घाबरवण्यासाठी तो उडी मारून बाहेर आला आणि दोघांची टक्कर झाली. दु:ख आणि भीतीमुळे दोघेही एकत्रच पळत पळत परत आले होते. मुलांना त्यांच्या या गोष्टीची इतकी मजा वाटली की हळू हळू त्यांच्या मनावरील तणाव कमी होऊन ते जोरात हसू लागले. भूत देखील कधी हसत होतं तर कधी रडत होतं!

थोड्या वेळाने तोतोचानचा एक वर्गमित्र परत आला. त्याने वर्तमानपत्राची टोपी करून घातली होती. कोणीच त्याच्यापर्यंत गेलं नव्हतं म्हणून तो फार नाराज झाला होता. तो तक्रारीच्या सुरात म्हणाला, "मी किती वेळ तरी वाट पहात बसलो होतो." त्याच्या हाता-पायांना डास चावले होते आणि त्याला खाज सुटली होती.



कोणीतरी म्हणालं, "अरे हे बघा डास चावलेलं भूत!" आणि सगळे परत हसू लागले. मग पाचवीचे वर्गशिक्षक म्हणाले, "मी आता जाऊन राहिलेल्या इतर भुतांना घेऊन येतो." त्यांना काही भुतं रस्त्यावरच्या दिव्याखाली भेटली. तेव्हा समजलं की काही जण घाबरून घरी निघून गेले होते. ते त्या सगळ्यांना गोळा करून शाळेत घेऊन आले. त्या रात्रीनंतर मात्र मुले भुतांना कधीच घाबरली नाहीत. भुतं स्वत:देखील भितातच की!

तेत्सुको कुरोयुंगी

Katha Jharna 2008

P. Saraswati | V. Vijayakanthi

L. S. Saraswathi | S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

Marathi Sujata Godbole

Artist Original Illustrations

आठवणी

मी जेव्हा हायस्कूलमध्ये शिकत होतो, तेव्हा माझ्या वडिलांच्या टेबलावर मी एक पुस्तकं पाहिलं होतं. श्रावणाची आपल्या आई-वडिलांवर किती श्रद्धा होती त्याबाबत हे पुस्तक होतं. मी ते खूप आवडीने वाचलं होतं.

त्याच दिवसांत बायोस्केप मधून चित्रं दाखवणारे लोकही घरोघर येत असत. त्यात मी एक चित्र पाहिलं होतं. आपल्या दृष्टीहीन आई-वडिलांना एका कावडीत बसवून श्रावणबाळ त्यांना तीर्थयात्रेला घेऊन जात आहे असं ते चित्र होतं. ते पुस्तक आणि चित्र या दोन्हीचा माझ्यावर खूप प्रभाव पडला होता.



आपणही आपल्या आई-वडिलांची अशीच सेवा करावी अशी इच्छा माझ्या मनात निर्माण झाली. श्रावणबाळाच्या मृत्युनंतर त्यांनी केलेला विलाप मला आजही आठवतो.

त्याच दिवसांत आमच्या गावी एक नाटककंपनी आली होती. वडिलांची परवानगी घेऊन मी राजा हरिश्चंद्रावरील एक नाटक पाहिलं होतं. हे नाटकही मनाला फार भावलं होतं. परत परत ते नाटक पाहण्याची इच्छा होत होती. मनातल्या मनात तर मी ते नाटक शेकडो वेळा पाहिलं असेल!

राजा हरिश्चंद्रावर तर अनेक संकटे आली, पण तरीही तो नेहमी सत्यच बोलत असे. 'सर्वच लोक हरिश्चंद्र राजासारखे सत्यवचनी का नसतात' असा प्रश्न मला रात्रंदिवस पडत असे.

माझ्या आयुष्यातील आणखी एक घटनाही मी कधीच विसरु शकलो नाही. आजही आठवण झाली की मला पश्चात्ताप होतो.

हायस्कूलमध्ये असताना माझा एक मित्र होता. बरेच जण मला सांगत असत, "त्याच्या सवयी चांगल्या नाहीत. त्याची संगत सोड."

मी त्यांचं ऐकलं नाही. जसजसे दिवस गेले, तसा त्याचा माझ्या मनावर परिणाम झाला. लपून छपून धूम्रपान करण्याची मला सवय जडली. परंतु, लवकरच माझा अंतरात्मा जागा झाला. आपल्या चुकांचा मला पश्चात्ताप होऊ लागला.

मला वाटलं की वडिलांच्या समोर आपल्या चुकांची कबुली द्यायला हवी. पण त्यांच्यासमोर माझं तोंडच उघडेना. मग मी एका कागदावर ते सर्व लिहून काढलं. माझी चूक कबूल केली आणि त्याबद्दल शिक्षा द्यायला सांगितली. मी परत अशी चूक करणार नाही असं वचनही दिलं.



ते पत्र मी थरथरत्या हातांनी वडिलांना दिलं आणि त्यांच्यासमोर बसलो.

त्यांनी ते पत्र वाचलं आणि त्यांच्या डोळ्यांतून अश्रू येऊ लागले. पत्र लिहिलेला कागद भिजून गेला. काही वेळ ते डोळे मिटून स्वस्थ बसले. मग त्यांनी ते पत्र फाडून टाकले.

मी ही रडत होतो. त्यांचं दु:ख मला समजलं. त्या अश्रूंनी माझं पाप धुवून टाकलं. त्यांच्या प्रेमामुळे मी ही बदलून गेलो.

अहिंसा मी प्रथम माझ्या वडिलांकडूनच शिकलो. शिक्षेऐवजी प्रेमाने आपण एखाद्याचं हृदय जिंकू शकतो हे मला आता समजलं होतं.

सत्याचे प्रयोग व आत्मचरित्र

मोहनदास करमचंद गांधी

Katha Jharna 2008

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

Marathi Sujata Godbole

Artist S. P. Raju

विक्रमादित्याचे सिंहासन

पुरातन काळी भारतात उजैन नावाचं शहर खूप नावाजलेलं होतं. या शहरात कालिदासासारखे अनेक कवी व विद्वान रहात असत. इथले सम्राट विक्रमादित्य आपल्या न्यायप्रियतेमुळे सर्वदूर प्रसिद्ध होते. त्यांची उदारता आणि प्रामाणिकपणामुळे जनतेचं त्यांच्यावर अपार प्रेम होतं. ते त्यांना देवाप्रमाणे मानत असत.

इतिहासाची पानं उलटली गेली. अनेक शतके होऊन गेली. त्या कालावधीत अनेक नवी राज्ये आली आणि विलयालाही गेली. काळाबरोबर अनेक जुने महाल आणि इमारती जमिनीखाली गाडल्या गेल्या. लोक सम्राट विक्रमादित्यांना विसरूनही गेले.

एक दिवशी गवळ्याची काही मुलं एका ठिकाणी खेळत होती. तिथे आजूबाजूला नक्षीकाम केलेले खडकांचे तुकडे, खांब वगैरे गोष्टी पडल्या होत्या. जवळपास काही मातीचे ढिगारेही होते. त्यातला एक ढिगारा हिरवागार आणि सर्वात उंच होता.



खेळता खेळता एक मुलगा पळत जाऊन त्यावर चढून बसला. तो इतर मुलांना म्हणाला, "मी न्यायाधीश आहे. तुमचे खटले माझ्याकडे घेऊन या." सर्व मुलांना हा खेळ फारच आवडला. लगेच मुलांनी एकत्र येऊन एक काल्पनिक खटला तयार केला. दोन मुलं न्यायाधीशासमोर गेली आणि म्हणाली, "माननीय न्यायाधीश! माझ्या शेजा-यात आणि माझ्यात जमिनीवरून चाललेल्या वादाचा निकाल द्यावा."

तेव्हा मुलांना एक चमत्कार दिसला. खेळात जो मुलगा न्यायाधीश झाला होता त्याचा चेहरा खटला ऐकताच बदलला आणि तो खरोखरच न्यायाधीश असल्याप्रमाणे बोलू लागला. त्याने त्या खटल्याचा योग्य असाच निकाल दिला.

त्याचं बोलणं ऐकून सर्वच मुलं आश्चर्यचकित झाली. पण त्यांचा खेळ चालूच होता. आणखी एक खटला तयार करून ते परत न्यायाधीशाकडे गेले. यावेळेस त्या मुलाने असा निकाल दिला की जणू काही तो अनेक वर्षांपासून हेच काम करत होता. अशा प्रकारे मुलांचा खेळ तासनतास चालू होता. जेव्हा घरी जाण्याची वेळ झाली तेव्हा त्या मुलानं मातीच्या ढिगा-यावरून खाली उडी मारली. आणि तो परत आपल्या मित्रांसोबत नेहमीप्रमाणे हसू-खेळू लागला. तो दिवस मुलांच्या कायमचाच लक्षात राहिला.

त्यानंतर कधीही काही अडचण आली, तर मुलं त्याच मुलाला मातीच्या ढिगा-यावर बसवत आणि तो त्यांच्या अडचणीचं योग्य प्रकारे निरसन करत असे.

लवकरच ही गोष्ट गावभर पसरली. गावातले लोक देखील आपल्या समस्या घेऊन या मुलाकडे येऊ लागले. मातीच्या ढिगावर बसून त्याने दिलेले सर्व निकाल नेहमी योग्य असत. ही गोष्ट मग राजापर्यंत पोचली.

या मुलाची माहिती मिळाल्यावर राजाने अंदाज बांधला की, 'हा मुलगा बहुधा विक्रमादित्याच्या सिंहासनावर बसत असावा.' राजाने आपले नोकर पाठवून तो मातीचा ढिगारा खणून काढला.

राजाचा अंदाज बरोबरच होता. ढिगा-यातून एक सिंहासन बाहेर आलं. त्याच्यावर उडण्याच्या पवित्र्यात असलेल्या पन्नास प-यांच्या प्रतिमा होत्या.

गावात याने मोठीच खळबळ उडाली. सगळीकडे उत्साहाचं आणि सणा-समारंभाचं वातावरण पसरलं. एका मिरवणुकीतून सिंहासन दरबारात नेण्यात आलं. राजाने जाहीर केलं, "मी या सिंहासनावर बसून खटले ऐकत जाईन. त्यावेळी माझ्यावर विक्रमादित्याची कृपा असेल आणि मला योग्य निर्णय देता येईल."

राजाने सिंहासनावर बसण्यासाठी एक शुभ दिवस निवडला. मंगल वाद्ये वाजू लागली. राजा सिंहासनाकडे जाऊ लागला. तेवढ्यात परीची एक मूर्ती म्हणाली, "राजा थांब! जरा विचार कर. तू खरोखरच या सिंहासनावर बसण्यासाठी लायक आहेस का? तू कधी इतर राज्यांवर राज्य करण्याची इच्छा धरली नव्हतीस का?"





राजा म्हणाला, "हो. मी अशी इच्छा केली होती. मी या सिंहासनावर बसण्यासाठी लायक नाही."

"तू तीन दिवस उपवास करून ध्यान कर आणि मग परत ये." एवढं बोलून ती परी उडून गेली. सिंहासनावरील तिची जागा रिकामीच राहिली.

राजाने तीन दिवस उपवास केला आणि तो सिंहासनावर बसण्यासाठी जाऊ लागला. तेव्हा अचानक एक परी प्रकट झाली आणि म्हणाली, "तू कधी दुस-याचे धन मिळावे अशी इच्छा केली नव्हतीस का?" राजा म्हणाला, "हो, केली होती." त्याला परत ध्यान करायला सांगून ती परी अदृश्य झाली.

अशा प्रकारे १०० दिवस गेले. अखेर सिंहासनावर एकच परी शिल्लक राहिली. तिने राजाला विचारलं, "तुझं मन एखाद्या लहान मुलासारखं निरागस आहे का?"

त्यावर राजानं उत्तर दिलं, "नाही". ते ऐकून परीने ते सिंहासन उचललं आणि ती आकाशात अदृश्य झाली. त्यानंतर ते सिंहासन कोणाला कधीच दिसलं नाही.

एक दिवस राजा एकटा बसला असताना विचार करू लागला. सिंहासनामागील रहस्य आता त्याच्या लक्षात आलं. ज्याचं मन लहान मुलासारखं निर्मल, निरागस असेल, तोच प्रामाणिक असू शकेल. म्हणूनच विक्रमादित्याच्या ज्या सिंहासनावर कोणी राजा बसू शकला नाही, त्यावर एक गवळ्याचा मुलगा बसू शकला. आणि त्याला योग्य तो निर्णयही देता आला.

भगिनी निवेदिता

यांच्या एका गोष्टीवर आधारीत


Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Marathi Sujata Godbole

Artist Uma Krishnaswamy



तीन दिवस दृष्टी मिळाली तर...

हेलन केलर या महिलेला जन्मापासून दिसत नसे, एकू येत नसे आणि बोलताही येत नसे. स्पर्श करूनच त्या जगातली प्रत्येक गोष्ट समजून घ्यायला शिकल्या. त्यासाठी त्यांना अपार कष्ट करावे लागले. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य इतरांच्या सेवेसाठी खर्ची घातले. त्यांच्या एका लेखातील काही भाग येथे दिला आहे.

बरेचदा माझ्या मनात विचार येतो की प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यातील काही दिवस जर त्याची पाहण्याची आणि ऐकण्याची क्षमता नाहीशी झाली, तर ते एक वरदान ठरेल. अंधारात त्याला दृष्टीचं महत्त्व समजेल. स्तब्धतेमध्ये त्याला ऐकण्यात काय आनंद असतो याची जाणीव होईल.

कधी कधी मी माझ्या मित्र-मैत्रिणींना विचारते की ते दिवसभरात काय पाहतात? नुकतीच माझी एक मैत्रीण जंगलात बराच वेळ फिरून परत आली. मी तिला विचारलं की तिनं काय काय पाहिलं? तिचं उत्तर होतं, "काही खास नाही."

मी विचार केला, 'हे कसं शक्य आहे? एक तासात देखील लक्षात ठेवावं असं काहीच कसं दिसलं नाही?'

मला दिसत नाही, पण केवळ स्पर्शानं मला ज्यात स्वारस्य आहे अशा शेकडो लक्षात ठेवण्याजोग्या गोष्टी मी शोधून काढते. पानाचा नाजुकपणा मला जाणवतो. काही झाडांची साल किती मुलायम असते ते माझ्या लक्षात येतं. काही झाडांची खरखरीत सालदेखील मला मोहवते.

वसंत ऋतूत नव्या कळ्या आल्या आहेत की नाही हे पाहण्यासाठी खूप आशेने मी झाडांच्या फांद्यांना स्पर्श करून पाहते. कधी कधी नशिबात असेल, तर एखाद्या लहानशा झाडावर हात ठेवला की एखाद्या पक्ष्याच्या मधुर गाण्याची धडकन मला जाणवते.

कधी कधी या सर्व गोष्टी पाहण्याची मला अतीव इच्छा होते. केवळ स्पर्शज्ञानानं मला जर एवढा आनंद मिळतो, तर हे प्रत्यक्ष पाहता आलं तर मला केवढ्या सौंदर्याचा अनुभव घेता येईल!





मला जर फक्त तीन दिवसांसाठी दृष्टी मिळाली तर मला काय काय पहायला आवडेल याचा मी मनातल्या मनात विचार करून ठेवला आहे.

ज्या लोकांनी आपल्या मैत्री आणि प्रेमानं माझं आयुष्य जगण्यासारखं बनवण्याचा प्रयत्न केला आहे, त्या सर्वांना मला पहिल्याच दिवशी भेटायला आवडेल. आपल्या डोळ्यांनी मित्राच्या हृदयात डोकावणं कसं असेल याची मला काहीच कल्पना नाही. मी केवळ त्यांच्या चेह-यावर माझ्या हाताची बोटं फिरवून त्यांची चेहरेपट्टी समजून घेऊ शकते. त्यांचा आनंद, दु:ख आणि इतर भाव देखील मला स्पर्शानं समजून घेता येतात.

त्यानंतर मला जी पुस्तकं वाचून दाखवली आहेत ती पहायला मला आवडेल. या पुस्तकांनीच मला मानवी जीवनातील खोल, गंभीर अर्थ समजावला आहे. मग मला माझ्या प्रामाणिक कुत्र्यांच्या डोळ्यात डोकावून पहायचं आहे.

दुपारी मी लांबवर फिरायला जाईन आणि निसर्गसौंदर्याकडे मुग्ध होऊन पहात राहीन. रंगांची उधळण कारणा-या सूर्योदयाची मी वाट पाहेन. मला वाटतं की त्या रात्री मला झोपच येणार नाही.






दुस-या दिवशी मी भल्या पहाटेच उठेन आणि रात्रीचा दिवस कसा होतो ते पहात बसेन. गाढ झोपेत बुडालेल्या पृथ्वीला सूर्याची किरणं कशी उठवतात ते पाहून अचंबित होईन.

हा दिवस मला जगाचा भूतकाळ आणि वर्तमानकाळ जाणून घेण्यात घालवायला आवडेल. माणसाची प्रगती कशी होत गेली ते ही मला समजून घ्यायचं आहे. त्यासाठी मला संग्रहालयात जावं लागेल.



त्यानंतर मला कलासंग्रहालयात जायला आवडेल. तिथे ठेवलेल्या देव-देवतांच्या मूर्तींना मी स्पर्शाद्वारे चांगल्या प्रकारे ओळखते. ज्या ज्या गोष्टी मला केवळ स्पर्शाद्वारेच माहित आहेत, त्या आता मला डोळ्यांनी पहायच्या आहेत. या दिवशी मला मनुष्याने निर्माण केलेल्या कलेच्या माध्यमातून त्याच्या अंतरात्म्यात डोकावून पहायचं आहे. चित्रांची दुनिया मला अनुभवता येईल.

दुस-या दिवशी संध्याकाळी मला नाटक किंवा सिनेमा पहायला आवडेल. नृत्याचं सौंदर्य किंवा नर्तकीची कोमलता याबद्दल मला फारस काही माहित नाही, पण जमिनीतून येणा-या स्पंदनातून मला लय आणि ताल यांची मजा समजते.



तिसरा दिवस आपापल्या कामात गढलेल्या सर्वसामान्य लोकांबरोबर घालवायला मला आवडेल. मी शहरातल्या एखाद्या गर्दीच्या ठिकाणी एका कोप-यात लोकांकडे पहात उभी राहिन आणि त्यांचा सर्वसाधारण दिनक्रम कसा असेल ते समजून घेण्याचा प्रयत्न करेन. त्यांच्या चेह-यावरील हास्य पाहून मला आनंद होईल. चेह-यावरचा दृढनिश्चय पाहून अभिमान वाटेल. दु:ख दिसलं तर करुणा वाटेल.

शहरातील गरिबांची वस्ती, कारखाने, मुलं खेळत असलेलं मैदान अशा सर्व ठिकाणी मी जाईन. सुख आणि दु:ख हे दोन्ही अनुभव घेण्यासाठी मी माझे डोळे उघडे ठेवेन म्हणजे लोक कशा प्रकारे काम करतात आणि जगतात हे मला समजेल. मला जे जे पहायचं आहे ते तीन दिवसांत पाहता येणार नाही याची मला जाणीव आहे. जेव्हा मी परत अंधारात जाईन, तेव्हा अजून किती तरी पहायचं राहिलं आहे याची मला जाणीव होईल.

मी तुम्हाला खात्रीनं सांगते की यापुढे आपल्याला दिसणार नाही असं जेव्हा तुमच्या लक्षात येईल, तेव्हा तुम्ही डोळ्यांचा असा वापर कराल की तसा तुम्ही पूर्वी कधीच केला नसेल. जे काही तुम्हाला दिसेल ते तुम्हाला आवडू लागेल. डोळ्यासमोर आलेल्या प्रत्येक गोष्टीकडे तुम्ही नीट लक्ष द्याल. ते आपल्या डोळ्यात साठवून ठेवाल. तेव्हा तुम्ही ख-या अर्थाने पाहू लागाल. सौंदर्याने परिपूर्ण असं जग तुमच्यासमोर उभं राहील.

मी तर पाहू शकत नाही, पण ज्यांना दिसतं त्यांच्यासाठी माझी एक सूचना आहे. तुम्ही डोळ्यांचा असा वापर करा की जणू काही तुम्हाला उद्यापासून काहीच दिसणार नाही. हाच विचार इतर सर्व इंद्रियांसाठीही लागू होतो. सुस्वर आवाज, पक्ष्यांची किलबिल, वाद्यांचा झंकार हे सर्व अशा त-हेने ऐका की जणू काही तुम्ही उद्यापासून बहिरे होणार आहात. सगळ्या गोष्टींना असा स्पर्श करा की जणू तुमची स्पर्शाची संवेदना उद्यापासून नाहीशी होणार आहे.

फुलांच्या सुगंधाचा असा अनुभव घ्या की जणू उद्यापासून तुम्हाला वासच येणार नाही. भोजनाचा प्रत्येक घास अशा चवीनं खा की जणू उद्यापासून तुम्हाला चव कळणारच नाही आहे. सर्व इंद्रियांचा पूर्ण उपभोग घ्या. मला खात्री आहे की सर्व संवेदनांमध्ये दृष्टीच सर्वाधिक सुख देणारी असेल.

Katha Jharna 2008

P. Saraswati V. Vijayakanthi

L. S. Saraswathi S. Rajalakshmi

Publisher Rajalakshmi Srinivasan Memorial Foundation

Marathi Sujata Godbole

Artist Original Illustrations